साप्ताहिक

# माणूस

४ मार्च ८४ | दोन रुपये




## काही आठवणी - ब्रेझनेव



## देवदासी प्रथा निर्मूलन पुनर्वसन

## संतदादा आणि त्यांचे विरोधक



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : तेविसावे

अंक : चाळीसावा

३ मार्च १९८४

किमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

संजय पवार

## अज्ञात आहुती

सुमारे ६–८ महिन्यांपूर्वीची गोष्ट.
फार खिन्न करणारी ..सुन्न करणारी.
त्रिवेंद्रम्–दक्षिण भारतात सफरीस आलेला एक गट.
शाळकरी पोरे–सूर्यप्रदेशात जन्मास आलेली.
चालली होती–तीन सागरांना भेटायला–कन्याकुमारीस !
अरुणाचल ते कन्याकुमारी–केवढा मोठा प्रवास.
...आणि ती दुःखद घटना घडली...
तिथे खळाळते ओढे सहजी पार करणारा ' तो '–
त्रिवेंद्रममध्ये बुडून मेला की बिचारा.
' तो '–' कोणीतरी '.. खरंच ' कोणीतरी ' कारण
अरुणाचलातील कोठला तरी इतकीच माहिती.
पोलीस चौकशी...पोस्टमार्टेम सर्व नित्याचे सोपस्कार.
अरुणाचलात...सूर्याच्या उगवत्या प्रदेशात वाढलेला ' तो '
तीन समुद्रांच्या साक्षीने निमाला.
.. दोन तीन दिवस एकच चित्र डोळ्यासमोर.
पोस्टमार्टेमनंतरचा ' तो '...आणि त्याबरोबरीने प्रश्न–
आपला मृत्यु कसा होणार ? कसा व्हावा ?
उत्तर सापडत नव्हते–आणि–
गेल्या महिन्यात अचानक तेही सापडले.
सत्यनारायणराव यांच्या रुपाने !
कोण हे सत्यनारायणराव ?
नाही हो–माहितीही नाही–भेटही कधी झालेली नाही.
गेली ४० वर्षे प्रकाशझोतात न येता तपस्या.
करता आहेत–इतकेच कळलेले.

शूचिंद्रम्–एकात्मता यज्ञाचा अखेरचा टप्पा.
गावात जंगी स्वागत–सडे–रांगोळ्या–दिव्यांची आरास–पुष्पवर्षाव.
आणि सभा...भावनांचे कल्लोळ, अंगारासारखे शब्द, स्फूर्तीप्रद आव्हाने !
सत्यनारायणराव–व्यासपीठावर तळपंता आहेत...
उत्कट भावनावेग हृदयात मावेना !
भाषणाची अखेर...आणि ती आयुष्याचीही अखेर !
...उत्तर सापडले. सत्यनारायणराव यांच्या रुपाने...उत्तर...
उत्तर ..आहुती–यज्ञातील–अज्ञात–पण तपःपुनीत !

७ फेब्रुवारी ८४

अजित कानिटकर
त्रिवेंद्रम.

# विश्व मराठी साहित्य संमेलन

## इ. स. २०००

मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाचा वाद यंदा खूपच गाजला. याचा एक अप्रत्यक्ष फायदा हा की, सिनेमाखेरीज काहीही न पाहणाऱ्या तमाम जनतेलासुद्धा, मराठी साहित्यसंमेलन असे काही घडते व त्याच्या अध्यक्षपदासाठी वयोवृद्ध मंडळीसुद्धा भांडतात (अद्यापी सिनेमा स्टाइलने नाही) हे वर्तमानपत्रावरून उडत उडत समजले. इ. स. २००० च्या उंबरठ्यावर आपण आहोत व या वर्षात सामान्य मनुष्य मंगळावर मधुचंद्रासाठी जाईल, यापासून, मनुष्यजात अणुयुद्धात नष्ट होईल इथेपर्यंत सर्व भाकिते (प्रोजेक्शन्स) केली जात आहेत. या मराठी साहित्यसंमेलनाच्या प्रसंगी इ. स. २००० साली अध्यक्ष निवडीच्यावेळी कोणचे वाद होतील या संबंधीचे हे प्रोजेक्शन आहे.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या पंधरा वर्षात एकंदर सामाजिक बदल फार झपाट्याने झाले. मध्ये १९८५ साली, अमेरिकेचे प्रेसिडेंट व रशियाचे पंतप्रधान हमरीतुमरीवर येऊन सर्वनाशाचा क्षण आला होता; पण इतर शहाण्या मंडळींनी त्यांच्या नजरेस आणून दिले की, मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासारखा अत्यंत महत्त्वाचा वाद कोर्टात जाऊन शांततेने सुटू शकतो तर अमेरिकेने व रशियाने आपली भांडणे याच पद्धतीने का सोडवू नयेत ? मुद्दा एवढाच की अणुयुद्ध टळले व जगराहटी पूर्ववत् सुरू राहिली मराठी साहित्याचे हे ऋण जगाने मान्य केले.

दलित साहित्याचा वाद, एक नामवंत दलित साहित्यिक अध्यक्ष झाल्यामुळे शमला. त्यानंतर भीतीकथा व रहस्यकथा ही लॉबी साहित्यसंमेलनात वेगाने जोरदार होऊ लागली. त्यांच्या पाठिराख्यांनी सप्रमाण असे दाखवून दिले की, वरिष्ठ काय किंवा दलित काय, शहरात व ग्रामीण भागात जे खपते ते हे साहित्य. हा वादसुद्धा शेवटी कोर्टात गेला. उच्चभ्रू साहित्याच्या कसोट्या कालबाह्य ठरत आहेत व जे लोक वाचतात ते साहित्य, असा क्रांतिकारी निर्णय न्यायाधिशांनी दिला. अध्यक्षपदाची माळ एका लोकप्रिय लेखकाच्या गळ्यात पडली. मधील काळात हिंदी सिनेमा व मराठी नाटके यांच्यामुळे लोकांच्या अभिरुचीत जो महत्त्वाचा बदल होत होता त्याचे प्रतिनिधित्व साहित्यपरिषदेपर्यंत पोहोचले. चुकीच्या कायद्यामुळे जे वाङ्मय चोरून छापावे व विकावे लागते त्यालाही योग्य न्याय मिळाला. 'ब्ल्यू फिल्मस्'चा चित्रपटमहोत्सव मुंबईत झाला व त्यानंतरच्या वर्षी, हे वाङ्मय भूमिगत राहून लिहिणाऱ्या महोदयांनी उघडपणे अध्यक्षपद भूषविले !

हा काळही झपाट्याने मागे पडला. ज्युनिअर के. जी. पासून इंग्लिश माध्यम असलेल्यांची दुसरी पिढी मोठी झाली. महाराष्ट्राच्या सर्व ग्रामीण भागात साखरकारखान्यावरोबर 'इंग्लिश मीडिअम'ही रुजली. अशी इंग्रजीची चलती सर्व महाराष्ट्रात झाली तरी पुराणातील संस्कृत नावे मुलांना ठेवण्याची परंपरा मात्र चालूच राहिली. त्यामुळे गौतम, भारद्वाज, विश्वामित्र, हरिश्चंद्र अशी नावे असलेली मुले शहरात तशीच खेडेगावातही दिसू लागली. या सर्व बदलांचा एक महत्त्वाचा फायदा असा झाला की, शहरी मराठी व ग्रामीण मराठी हा भेद लोपला. पुण्याचा गौतम रानडे, कोल्हापूरचा कौंतेय कुलकर्णी व वडगावचा भारद्वाज पोटमारे यांचे मराठी बोलणे व लिहिणे हे एकाच पद्धतीने होऊ लागले. या काळात वीस कलमी कार्यक्रमाची घोडदौड चालू राहिली व दारिद्र्य रेषेखाली कोणतीही व्यक्ती राहिली नाही. यामुळे मराठी साहित्यसंमेलनाच्या वेळी निघणारे नेहमीचे सर्व वाद संपुष्टात आले होते. हो, एक सांगवयाचे राहून गेले. मराठी साहित्यसंमेलन याचे नामांतर विश्व मराठी साहित्य संमेलन असे करण्यात यावे हा ठराव १९९५ साली एकमताने मंजूर झाला. असे म्हणतात की, दुखवट्याच्या ठरावाखेरीज एकमताने संमत झालेला संमेलनाच्या इतिहासातली हा एकमेव ठराव !

या सर्व सुधारणा होत असताना मराठी भाषेच्या अभ्यासात व प्रसिद्धीत जरूर ते फेरबदल होत होते. परीक्षेसाठी एक विषय म्हणून मराठी राहिली तरी त्यात पास होण्यावर मुलांचे वरील वर्गात जाणे अथवा भवितव्य अवलंबून राहिले नव्हते. पालक मुलाबद्दल कौतुकाने सांगत, 'पिंटुला बाकी सर्व विषयात ९९.९९ टक्के मार्क आहेत, मराठीत तेवढा फेल गेला.' एम. ए. ला मराठी विषय होता; पण पूर्वी संस्कृतचा पेपर इंग्लिशमधून लिहिला जाई तीच सवलत मराठीसाठीही मिळाली. पाच ओळी मराठीत लिहिण्याचा, पाच मार्कांचा एक ऐच्छिक प्रश्न तेवढा राहिला. रामदासांचे मनाचे श्लोक, तुकारामांचे अभंग, ज्ञानेश्वरी वगैरे उच्च अभ्यासासाठी लागणाऱ्या ग्रंथांवर इंग्रजीत गाईड्स उपलब्ध झाली होती. बदलता काळ ओळखून ज्या मराठी वृत्तपत्रांनी इंग्लिश जाहिरातींबरोबर इंग्लिशमधून बातम्या छापायला सुरुवात केली ती तगली. '५० वर्षांपूर्वी' एवढाच मजकूर मराठीत राहिला. खोटा अभिमान धरणारी इतर मराठी वृत्तपत्रे आपल्या मरणाने मेली !

या पार्श्वभूमीवर. इ. स. २००० मधील विश्व मराठी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाची चुरस सुरू झाली. एका मराठी विद्वानांचे नाव पूर्वभागातून सुचविले गेले. त्याला तोड म्हणून पश्चिमभागातून दुसरे नाव पुढे आले. एका विद्वानांनी जुन्या संतवाङ्मयाचे परिशीलन करून त्यावर अनेक इंग्रजी ग्रंथ लिहिले होते. दुसऱ्यांचा विषय साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष व वाङ्मय असा होता. नेहमीप्रमाणे उलटसुलट टीकास्त्रे सुटली. एकाने गौप्यस्फोट केला की, या विद्वानांचे सर्व लिखाण जुने वाङ्मय मराठीतून न वाचता झालेले आहे व यांना 'ज्ञानेश्वर' हा शब्दसुद्धा नीट लिहिता येणार नाही. दुसऱ्यांच्यावर टीका अशी झाली की, त्यांनी आपल्या ग्रंथात दिलेली माहिती, ही ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीने प्रसिद्ध केलेल्या अर्वाचीन मराठी वाङ्मयाची परिसूची' या ग्रंथावरून घेतली आहे. हा सर्व पत्रव्यवहार अर्थात इंग्रजीतूनच झाला.

यानंतर मात्र एक आत्मपरीक्षणाची व पश्चात्तापाच्या भावनेची मोठी लाटच उठली.

इंग्रजी माध्यमाने निर्माण केलेल्या परिस्थितीला दोष देण्यात आला व लोकमत असे पडले की, मराठी शुद्ध बोलणे व लिहिणे एवढी किमान अट अध्यक्षपदाच्या निवडीसाठी असलीच पाहिजे. हा वाद विश्वपातळीवर झाल्यामुळे इंग्लंडमधील साहित्यपरिषदेच्या शाखेपर्यंत पोहोचला. त्याचे चिटणीस एक अत्यंत उत्साही गृहस्थ होते. त्यांनी इंग्लंडमध्ये कसून शोध केला व अशी माहिती मिळविली की, मेकॉलेसाहेबांचे (ज्यांनी हिंदुस्थानात इंग्रजी शिक्षणाची मेढ रोविली) खापरपणतू हे ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीत मराठीच्या 'खुर्ची'चे प्राध्यापक होते. मराठी वाङ्मयाच्या प्रेमाने त्यांनी आपटे हे उपनाव घेतले व मुलाचे नाव नारायण ठेविले. त्यांनीही आक्सफर्डमध्येच मराठीचा व्यासंग वाढविला. त्यांचे चिरंजीव हरी हे सध्या ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीत मराठीचे प्रोफेसर व अभ्यासू संशोधक आहेत. या सर्वांनी केलेल्या परिशीलनाचा लाभ घेऊनच सध्या महाराष्ट्रात अनेक मराठीचे पीएचडी होत आहेत. हरी नारायण आपटे (मेकॉले) यांचे मराठी बोलणे, लिहिणे हे शुद्ध जुन्या पुणेरी वळणाचे आहे.

या सूचनेवरून प्रथम उलट–सुलट टीका झाली; पण या निवडीने मराठीचा झेंडा समुद्रपार होऊन राज्यकर्त्यांच्या देशातच रोविला गेला. ही मराठी अस्मितेला अभिमानास्पद गोष्ट आहे. या भावनेतून ऑक्सफर्डचे हरी नारायण आपटे (मेकॉले) यांची इ. स. २००० साली, पुणे येथे भरणाऱ्या विश्व मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून एकमताने निवड झाली.

–प्रि. खं. कुलकर्णी

# अनवट

## साठ वर्षांनंतर संमती

भारतात सध्या केंद्र-राज्यसंबंधावर राजकीय, शुद्ध वैचारिक मंथन बरेच चालू आहे. केंद्रसरकारला राज्यांच्या कायदे करण्यावरही कसे नियंत्रण ठेवता येते याचे नुकतेच एक उदाहरण कर्नाटकात घडले.

'कर्नाटक विवाह कायदा' हे विधेयक १९७६ मध्ये विधानसभेने संमत केले. राष्ट्रपतींच्या संमतीसाठी त्याला ७ वर्षे थांबावे लागले ! घटनेच्या २०० व्या कलमानुसार राज्यविधानसभेने संमत केलेले विधेयक राज्यपालांना नाकारता येते. मात्र दुसऱ्या वेळी विधानसभेने विधेयक संमत केल्यास राष्ट्रपतींना त्याला मान्यता द्यावीच लागते. यावर केंद्राचे एजंट समजले जाणारे राज्यपाल विधेयकाला संमती किंवा नकार काहीच देत नाहीत. ते राष्ट्रपतींकडे पाठवून देतात. या कलमातील तरतुदीनुसार राष्ट्रपती कितीही काळ ते घोंगडे भिजत ठेवू शकतात. त्यांच्यावर कालाचे बंधन नाही. अशा रीतीने १९७६ च्या विधेयकाला जुलै १९८३ मध्ये राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली असे प्रकाशात आले.

खरं तर हा कायदा सर्वच राज्यांनी करावा असा आहे. सर्व प्रकारच्या सर्व विवाहांची नोंदणी झालीच पाहिजे अशी तरतूद यात आहे तसेच, हुंडा घेण्यासाठी अधिक शिक्षा, भपकेबाज लग्नसमारंभावर कर, पाच हजारपेक्षा जादा खर्च असल्यास 'चैनीचे कर' या प्रकारची तरतूद आहेच. आंतरजातीय विवाहाला उत्तेजन व लग्नात जातीय पंक्तिप्रपंच नसावा अशाही या कायद्यात तरतुदी आहेत.

## 'मुझे मेरे पतिसे बचाओ !'

राजस्थानात भरतपूर जिल्ह्यातील बयाना गावची घटना. तेथील एक 'नेताजी', लक्ष्मीनारायण वैद्य यांनी तेरा वर्षांपूर्वी आशादेवी या मुलीशी लग्न केले. नेताजी आता ६५ वर्षांचे तर आशादेवी २४ वर्षांची! गेल्या वर्षीच्या १० जूनपासून नेताजींनी आशाला खोलीत कोंडून ठेवले. फास देण्याचा प्रयत्न केला. 'माँ नही बन सकी' या कारणामुळे तिचा छळ होत होता. या बाईने हस्ते-परहस्ते पोलिसात रिपोर्ट केला. ते समजल्यावर तर तिला घरात कोंडून तिचे जेवण बंद केले ! पोलिसांनीही काही कारवाई केली नाही. आशादेवीने आता उच्च न्यायालयात रिट अर्ज केलाय–'मुझे मेरे पतिसे बचाओ, वह मुझे कभीभी मार डालेगा !'

## उडोनी स्वामी गेला

प्रिय वाचकहो (इ. इ.) वाचन सोडून थोडे आकाशात पहा बरे ! एखादे टुमदार विमान घरघरतेय का ? त्यातून फुले उधळली जात आहेत काय ? त्या विमानातून एक गंभीर, मायाळू चेहरा दिसतोय का ?

आमच्या वाचकांना संभ्रमात न ठेवता आम्ही हे सांगतो की, या विमानात कुणी स्वामी विष्णुदेवानंद ऊर्फ फ्लाईंग स्वामी आहेत. पंजाब प्रश्नावर देशभरात सामंजस्य, शांतता सलोखा (वगैरे) व्हावा म्हणून स्वामीजी ९ फेब्रुवारीपासून आपल्या विमानातून भारताची शांतीयात्रा करीत आहेत. मुंबई–गोवा मार्गे कन्याकुमारी व तेथून परत हृषिकेश (उ. प्र.) असा त्यांचा २५ एप्रिलपर्यंतचा शांतीदौरा आहे.

विनोबा–गांधी-विवेकानंद असल्या भुक्कड पदयात्रिकांमुळे काही साध्य होत नाही. हे स्वामी इंटरनॅशनल आहेत. ते उडतच राहतात. नेहमीप्रमाणे कॅनडा, अमेरिका, बहामा वगैरे देशात तीस वर्षांपासून त्यांचे आश्रम आहेत. जगात शांतता (वगैरे) स्थापन व्हावी म्हणून त्यांच्या विमानयात्रा चालू असतात. १९६६ मध्ये इजिप्त–इस्रायल युद्ध चालू असताना स्वामीजी सुएझ कालव्यावरून उडत (विमानातून) गेले. (त्यामुळे ते युद्ध थांबले.) १९७१ मध्ये भारत–पाक युद्धानंतर दिल्ली ते लाहोर असे उड्डाण केले. त्या वेळी त्यांनी सरहद्दीवर फुले व शांततापत्रके टाकली. आयर्लंडमध्ये

बेलफास्टवरूनसुद्धा उड्डाण केले. त्या वेळी त्यांच्या विमानात पीटर सेलर्स हा खरोखरीचा विनोदी नट होता. स्वामींनी कडी केली ती १९८३ च्या सप्टेंबरमध्ये. पश्चिम व पूर्वजर्मनीला तोडणाऱ्या बर्लिन भिंतीवरून विमानमार्गे ते उडाले. नेहमीप्रमाणे फुले टाकली. 'पक्ष्याला ज्याप्रमाणे सीमांचे बंधन नाही तसेच माझे आहे.' असे स्वामी म्हणतात. ग्रहगोलांच्या नुसत्या भ्रमणाचा परिणाम होत असेल तसा स्वामींच्या विमानभ्रमणाचा होत असावा!

स्वामीजींनी आपल्या शिष्यांमार्फत युरोपात जागतिक हिंसाचाराचा निषेध म्हणून शीर्षासने करवून मोर्चा काढला! अणुयुगात जग हे आपल्या डोक्यावर आहे, ते परत सुलटे होऊन पायावर यावे याचे प्रतीक आहे ते!

आपल्याला ही युक्ती कशी सुचली नाही? म्हणून उलटचा हेगेलेला सरळ (सुलटे) करतो म्हणणारा मार्क्स तर स्वामींना पाहूनच लज्जित होत्साता पळून जाईल.

---

## निकोटिन वाढवा

---

सिगारेटच्या बाबतीत नेहमीच परस्परविरोधी विधाने व संशोधन केले जाते. सिगारेटमध्ये निकोटिन हे हानिकारक द्रव्य असल्याने ती आरोग्यास धोक्याची असते. मात्र हायडेलबर्ग विद्यापीठातील (प. जर्मनी) डॉ. फर्डिनांद श्मिड्ट म्हणतात की, सिगारेटमधील निकोटिनचे प्रमाण वाढवा, म्हणजे माणसं कमी सिगारेट पितील. शौकिनाला हव्या तेवढ्या प्रमाणात निकोटिन पाहिजे असते म्हणून तो जास्त सिगारेट्स ओढतो. एका सिगारेटमुळेच त्याच्या शरीराची निकोटिनची गरज भागत असेल तर तो जास्त सिगारेट्स घेणार नाही. त्यामुळे सिगरेटमधील कार्बन मोनाक्साईड व इतर घातुक द्रव्यांचे प्रमाण कमी करून निकोटिन या एकाच (घातुक!) द्रव्याचे प्रमाण वाढवावे असे ते म्हणतात! सिगारेटमधील फिल्टर तोंडाचा, पोटाचा कॅन्सर रोकण्यासाठी काही उपयोग होत नाही असा त्यांचा दावा आहे.

दरम्यान अमेरिकेतल्या संशोधकांनी तंबाखूत उच्च प्रतीचे प्रोटीन असते असे सांगून त्याचा तसा उपयोग सुरू केला आहे. सिगारेटविरोधी मोहिमेमुळे लोक या उच्च प्रोटीनचा उपयोग करणार नाहीत अशी भीती त्यांना वाटते!

---

## सौदीअरेबियात पाकसैनिक

---

परस्पर देशांतर्गत सुरक्षेसाठी पाकिस्तान आणि सौदी अरेबियाचा एक करार नुकताच झाला आहे. याचाच भाग म्हणून अनेक हजारो पाक सैनिकांची पथके नुकतीच हाज यात्रेच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी जेद्दाला गेली होती असे लंडनच्या संडे टाईम्सने म्हटले आहे.

हाजयात्रेसाठी येणाऱ्या यात्रेकरूंच्या वाटेत इराणी अतिरेक्यांच्या हस्तक्षेपामुळे अडचणी निर्माण होण्याची भीती असल्याने तीन महिन्यांच्या सुरक्षाव्यवस्थेसाठी पाक सैनिकांची पथके सौदीअरेबियाने मागवली होती. या कारवाईच्या बाबतीत इराणला पूर्णपणे अंधारात ठेवण्यात आले होते. जेद्दाला गेलेले पाक सैनिक सौदी अरेबियन सरकारच्या नगरपालिकेचे कर्मचारी म्हणून काम करीत होते.

मुख्यत: शरीरसंरक्षक आणि दंगल काबूत आणण्याच्या कामासाठी पाक सैनिकांना बोलावले आहे. यावर्षी १५ हजार इजिप्शियनांना पोलीस म्हणून लपवून ठेवले असल्याचा सौदी अरेबियाने इन्कार केला असला तरी यंदा पाकिस्तानी सैनिक आणायच्या घटनेविषयी त्या सरकारची काहीही प्रतिक्रिया नाही.

—संजय

☐


## राजहंसचे आगामी प्रकाशन

फाळणी नाकारली तरी रक्तपात होतो
स्वीकारली तरीही तो टळत नाही.
अब्राहम लिंकनने ह्यातला पहिला पर्याय पत्करला.
त्याच्या अजरामर राजकीय जीवनाची कथा.


अब्राहम लिंकन
फाळणी टाळणारा महापुरुष
वि.ग.कानिटकर



भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित होत असलेली
पहिली डिलक्स आवृत्ती.
मोठा क्राऊन आकार
पृष्ठे : सुमारे ४००
मूळ किंमत : रु. १५०/- किमान

पुस्तक १ जूनला प्रकाशित होईल.

राजहंस प्रकाशन १०२५ सदाशिव पेठ, पुणे. ४११ ०३०.



# मुंबापुरी

परवा एक बुजुर्ग पत्रकार मित्र भेटले. म्हणाले–येत्या महिन्या–दोन महिन्यांत अंतुले एकदम फॉर्मात येणार आहेत. तेव्हा बाकी सगळं बाजूला ठेव आणि हा माणूस काय काय करतो ते पहा. वॉच अंतुले !

गोष्ट खरी आहे; पण अंतुलेंवर आमचं लक्ष काही आजपास्नं नाही. आम्ही आज कित्येक महिने त्यांच्याकडे डोळे लावून बसलो आहोत. तेच काही करत नाहीत त्याला आम्ही काय करणार ?

मागे वसंतदादा मुख्यमंत्रीपदी आरूढ झाले तेव्हाची अंतुल्यांची प्रेस–कॉन्फरन्स पक्की स्मरणात आहे. मरीनड्राइव्हवरच्या त्यांच्या त्या आलिशान घरात जवळजवळ चार–पाच डझन पत्रकार कसे आवळून–चिवळून बसले होते !

अंतुले संतापलेले दिसत होते. तेव्हा काही तरी गौप्यस्फोट होणार असा सगळयांचाच कयास होता. अंतुलेही पक्क्या गुरूचे चेले आहेत. त्यांनी पत्रकारांना थेट अखेरपर्यंत झुलवत ठेवलं. कधी एकदम टोकावर यायचं अन मग एकदम ढील सोडायची असा फक्कड खेळ चालला होता. क्षणभर वाटायचं की, अंतुले आता पक्ष सोडल्याची घोषणा करतील. दुसऱ्याच क्षणी अंतुले इंदिरा गांधींना एक जबरी मुजरा ('मी त्यांचा सैनिक आहे' वगैरे) ठोकायचे. अंतुल्यांची अभिनयशक्ती तोबा आहे. आवाजाचा चढ–उतार, डोळयांचे भाव, हातांच्या हालचाली या सगळयात एक जबरदस्त मॅग्नेटिजम आहे. 'ही ऑलवेज मेक्स अ गुड कॉपी' हे जरी खरं असलं तरी या कॉपीचा इंट्रो आता बदलायला हवा !

□

राजकारण्यांनी वादळं उभी करावी हे कळण्यासारखं आहे; पण राजकारण्यांवर आधारित चित्रपटानेही धुळवड उडवावी म्हणजे भलतंच इंटरेस्टिंग आहे !

'इन्किलाब' हा प्रचलित राजकारणावर आधारित चित्रपट खूप दिवसापास्नं गाजतोय. राजकीय विषयावरच घेतलेला राजेशपंत खन्नाचा 'आज का एमएलए' हा चित्रपट म्हणजे अमिताभच्या 'इन्किलाब' ला एक आव्हानच होतं.

अमिताभने 'इन्किलाब' रेकॉर्ड वेळात पूर्ण करून 'आज का एमएलए'ला टक्कर दिली. इथवर सगळं ठीक होतं. नंतर रिलीज होण्यापूर्वी सेन्सॉरवाल्यांनी काड्या सुरू केल्या. निर्मात्याच्या नाकी बुडबुडे आले. अमिताभने दिल्लीत जाऊन 'सबकुछ' बंदोबस्त करून 'इन्किलाब'ला हिरवा कंदील मिळवून दिला !

आता अमिताभ थोडीशी उसंत घेतो न घेतो तोच सेन्सॉरची कात्री पुन्हा कचकचू लागलीये. 'इन्किलाब'मधले काही सीन्स जरा 'जादा' (विशेषतः अखेरीस अमिताभ सगळयांना गोळया झाडून ठार मारतो तो सीन) वाटल्यामुळे सेन्सॉर-बोर्डाने काही नवे 'कट्स' सुचवले आहेत आणि या नव्या हुकुमाची तामिली बरोबर झाली पाहिजे अशी सक्त तंबीही दिली आहे. आता आली का पंचाईत !

च्यायला–इतका मोठा अमिताभ अन् त्याचं हे कात्रीवाले ऐकत नाहीत म्हणजे काय ? या पिक्चरसाठी अमिताभने आपल्या भाजलेल्या हाताचीही पर्वा केली नाही. बा अमिताभा, आता एक मोलाचा सल्ला ध्यानात ऐक ! तुझे दिल्लीश्वरांशी फार जवळचे संबंध असतील; पण तेही शेवटी राजकारणीच ना ! तेव्हा आता ताकही आस्ते आस्ते फुंकून पीत जा, हे काही खरं नाही !

□

मुंबापुरीतील थंडी सध्या अधिक बोचरी वाटण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आयुक्त द. म. सुखथनकर ह्यांनी सादर केलेले महापालिकेचे अंदाजपत्रक. वृत्तपत्रांनी हे अंदाजपत्रक जाहीर होण्यापूर्वी २४ कोटी रुपयांचे अधिक कर लादले जातील असा तर्क लढविला होता; पण सुखथनकरांनी ५७ कोटी रुपयांचे कर सुचविले आहेत. यात पाणीपट्टी, चाकपट्टी, अग्नीकर ह्या सर्व करांत वाढ करण्यात आली आहे. पेट्रोल आणि डिझेलवर त्यांनी सुचविलेल्या जकातीसाठी त्यांना राज्यशासनाची अनुमती घ्यावी लागेल. असो.

महापालिका निवडणुका आता तोंडावर आल्याने नगरसेवक ह्या करवाढीला मान्यता देण्याची मुळीच शक्यता नाही. स्थायी समितीचे सभासद तर आता आकड्यांची उलटापालट करून हे तुटीचे अंदाजपत्रक शिलकी अंदाजपत्रक करतील; पण अशी बाहेरून रंगरंगोटी करून भिंतीला गेलेले तडे लपायचे नाहीत !

या करवाढीची खरी भीती असते ती मुंबापुरीतील मध्यमवर्गालाच. कारखानदार कोर्टात जाऊन करांची थकबाकी वाढवितात आणि 'कर नाही त्याला डर कशाला ?' अशी परिस्थिती असल्याने झोपडपट्टीवाल्यांनाही ह्या करवाढीचे सोयरसुतक नसते. महापालिकेच्या आणि सरकारच्या जमिनीवर असलेल्या झोपडपट्ट्यांकडून महापालिकेला एकूण १४ कोटी रुपये येणे आहे. आता नगरसेवकांची संख्या १४० वरून १७० वर गेल्याने ही थकबाकी अधिकच वाढेल !

ह्या अंदाजपत्रकाने पत्रकारांची मात्र घोर निराशा केली. दर वर्षी अंदाजपत्रक सादर केले जाते तेव्हा स्थायी समितीचे अध्यक्ष पत्रकारांना जेवण घालतात; पण ह्या वर्षी द. म. सुखथनकरांच्या भाषणाखेरीज हातात काहीच पडले नाही. ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरताच पत्रकार कक्षात एकच शोककळा पसरली ! □

## महापौर–मॉस्कोचे

मॉस्कोचे महापौर व्हलादमिर प्रॉमिस्लॉव्ह तीन दिवसांच्या भेटीसाठी गेल्या सोमवारी मुंबापुरीत आले. साम्यवादी

देशांतून आलेल्या ह्या महापौरांची रहाण्याची व्यवस्था मुंबई महानगरपालिकेने एका थ्री स्टार हॉटेलमध्ये केली; पण ती पसंत न पडल्याने ते दोन तासांतच ओबेरॉय शेरेटन ह्या पंचतारांकित लॉजिंग-ब्रोडिंगमध्ये गेले.

प्रॉमिस्लॉव्ह ह्यांच्याकडून ज्या काही गमतीदार गोष्टी कळल्या त्यापैकी एक म्हणजे रशियाचे प्रेसिडेंट आंद्रोपॉव्ह जेव्हा मृत्यू पावले तेव्हा संपूर्ण देशाने केवळ पाच मिनिटे काम थांबविले. त्यानंतर मात्र सारे व्यवहार सुरळीत सुरू झाले.

आम्ही त्यांना सांगितले की, येथे मुंबापुरीत महापालिकेच्या सर्व समित्या संपूर्ण दिवस तहकूब करण्यात आल्या. त्यांच्या एका अधिकाऱ्याने आम्हाला सांगितले की, मॉस्को महापालिका (तिला सिटी सोव्हिएट असे म्हणतात) मात्र तहकूब करण्यात आली नाही.

रशियात 'सब भूमी सरकारकी' असा प्रकार असल्याने अनधिकृत बांधकाम ही संकल्पनाही त्यांना समजावून देणे आम्हाला फार जड गेले.

▫

साम्यवादी देशातील लोकशाहीबद्दल एक किस्सा आहे. व्हलादमिर प्रॉमिस्लॉव्ह ह्यांना आम्ही ओबेरॉयमध्ये भेटलो तेव्हा त्यांनी आम्हाला सांगितले की, मॉस्को महापालिकेचे एक हजार सदस्य गुप्त मतदान पद्धतीने निवडले जातात. हे सर्व सदस्य त्यांच्यामधूनच महापौरांची निवड करतात. मॉस्कोच्या महापालिकेची तसेच महापौरांचीही मुदत केवळ अडीच वर्षे आहे; पण स्वतः प्रॉमिस्लॉव्ह मात्र गेली २१ वर्षे महापौर आहेत !

आम्ही ह्याबद्दल आश्चर्य दाखविताच त्यांच्या दुभाषाने आम्हाला सांगितले की, प्रॉमिस्लॉव्ह लोकांत इतके प्रिय आहेत (त्यांना लोक प्रेमाने बहुधा व्हानिया किंवा प्रॉमिशा म्हणत असावेत) की लोक त्यांना पुन्हापुन्हा निवडून देतात. इतका कुशल मनुष्य असताना दुसऱ्या कुणाला निवडून देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे ते म्हणाले. बहुधा निवडणुकीत त्यांच्या विरुद्ध कुणी उमेदवारच उभा केला जात नसेल ! Choosing without a choice म्हणतात ते हे असे !

— विष्णू जयदेव

## मुक्काम दिल्ली

# झुणका-भाकर

त्या दिवशी पोस्टमनने एक छोटेसे सायक्लोस्टाइल केलेले परिपत्रक हातात दिले. असेल कुठल्या तरी कार्यक्रमाची निमंत्रणपत्रिका असे मनाशी म्हणत, मी परिपत्रक उघडले. 'ममिमंपप'ची ती कार्यक्रमपत्रिका होती... दिल्लीतील 'मराठा मित्र-मंडळाची परिवारपत्रिका.' दि. १८ फेब्रुवारीला शारदा संघाच्या रौप्यमहोत्सवानिमित्त 'आर्टिस्ट कम्बाइन' (ग्वाल्हेर) चा 'घाशिराम कोतवाल' चा प्रयोग होता. या नाटकाचे प्रयोग तसे पाहिलेलेच होते, त्यामुळे हा प्रयोग वेळेअभावी जरी पहायला मिळाला नाही तरी फारसे बिघडणार नाही अशी त्याच वेळी मनाची समजूत पटवून दिली.

दि. १९ फेब्रुवारीला जो कार्यक्रम होता त्यावर मात्र नजर खिळून राहिली. कार्यक्रमाचे नाव होते 'झुणका-भाकर.' हा कार्यक्रम म्हणजे एक चटकदार नाव दिलेला दुसरा–तिसरा कुठलाही कार्यक्रम नसून अगदी वाच्यार्थाने 'झुणका-भाकर' भोजनाचाच कार्यक्रम होता. शुल्कही अगदी नाममात्र म्हणजे मोठ्यांना ४ रुपये आणि छोट्यांना २ रुपये असे होते. या अस्सल मराठी पदार्थांचे नाव वाचल्यावरच, पोटभर जेवण झालेले असूनही तोंडाला पाणी सुटले! 'मन वढाळ वढाळ' असे बहिणाबाईंनी म्हटले खरे; पण त्या दिवशी मात्र मला 'जीभ वढाळ वढाळ' याची अनुभूती तीव्रतेने आली. महाराष्ट्रात असताना कऱ्हाड–सांगली–सोलापूर–कोल्हापूर वगैरे ठिकाणच्या टपोऱ्या, दाणेदार शाळूची खाल्लेली शुभ्र भाकरी आणि चमचमीत तेलातला चटकदार झुणका आठवू लागला. दिल्लीला आल्यापासून तशी ज्वारी कुठेही पहायला मिळाली नाही. जिकडे तिकडे गहू किंवा फार तर मका ! पंजाब–हरियाणातील गव्हाची येथे समृद्धी. गव्हाची रोटी, तंदुर रोटी, मैद्याचे भटुरे, कुल्चे हे येथील लोकांचे मुख्य खाणे. 'मकईकी रोटी' आणि 'सरसूका साग' (मोहरीच्या पाल्याची पातळ भाजी) हे पंजाबी लोकांचे खास 'पंजाबी' खाणे. अगदी महाराष्ट्रातल्या 'झुणकाभाकरी' प्रमाणे. अशा प्रदेशात येऊन राहिल्यानंतर इथल्या उपलब्धतेप्रमाणे खाण्यापिण्याच्या सवयी लावून घेणे, थोडेसे प्रादेशिकतेशी जुळवून घेणे, हे करावेच लागले, तरी सणावारांच्या निमित्ताने 'आपले' वाटणारे खास महाराष्ट्रीय पदार्थ केल्याशिवाय राहवत नाही !

१९ फेब्रुवारीच्या रविवारी मात्र रोजच्या स्वयंपाकातून सुट्टी मिळणार होती. इतकेच नव्हे तर अस्सल महाराष्ट्रीय भोजन मिळणार होते याचे मनाला सुख होत होते. त्या दिवशी नेमकी संकष्टीचतुर्थी आली होती; पण इथे आल्यापासून चतुर्थीचा उरलासुरला उपवासही सोडून दिला होता, याचे समाधान होत होते. ज्यांचा उपवास होता त्यांच्यासाठी फराळाची खास व्यवस्था करण्यात आली होती. शिवाय त्यांना आपली 'झुणका–भाकर' हुकली असे वाटू नये म्हणून एक विशेष भेट (पाकिटातून झुणका-भाकर) देण्यात येणार होती !

मंडळाच्या जागेत म्हणजे 'चौगुले शिशुविहार' या शाळेच्या आवारात मंडप घातला होता. टेबलांच्या रांगा आणि त्यावर शुभ्र मेजपोस पसरलेले. मोठमोठ्या डिशेसमधून पदार्थ ठेवण्यात आले होते. लसणाची लालभडक चटणी, झुणका, बाजरीच्या गरमगरम भाकरी, भात, बटाटेमटरचा रस्सा आणि कणीदार साजुक तूप ! दुसऱ्या बाजूच्या टेबलावर वरीचा भात, शेंगदाण्याची आमटी, साबुदाण्याचे वडे असे रुचकर पदार्थ उपवासाच्या मंडळींसाठी ठेवलेले. 'बुफे' पद्धतीने भोजन चालले होते. पदार्थ संपतील तसे पुन्हा डिशेसमधून भरभरून आणले जात होते. शाळेतील शिक्षिका मोठ्या हौसेने काम करीत होत्या. आत आचारी स्वयंपाक करीत होते. मंडळातील भगिनीही मदत करीत होत्या. ठिकठिकाणी त्या स्वादिष्ट जेवणाचा आणि फराळाच्या पदार्थांचा आस्वाद घेत घोळक्यांनी मंडळी गप्पा मारीत होती.

असे हे कार्यक्रम म्हणजे मराठी माणसांना एकत्र आणणारी निमित्तेच असतात. आपआपल्या व्यवसायात गुरफटलेली, निरनिराळ्या विभागात राहणारी ही मराठी माणसे एकत्र येण्यासाठी आणि त्यांच्या विचारांची देवाण-घेवाण होण्यासाठी दिल्लीतील अशी मंडळे फार मोलाची कामगिरी करतात !

महाराष्ट्रापासून दूर–हजार–दीड हजार किलोमीटर दूरवरच्या या राजधानीत महाराष्ट्रातील अनेक ठिकाणांहून आलेले लोक राहतात. त्यांना आपल्या मायभूमीची ओढ लागलेली असते. वेगळ्या भाषेच्या, वेगळ्या आचार-विचारांच्या प्रदेशात इथे या मराठी माणसाला सुरुवातीला आपले काही तरी हरवले आहे असे वाटू लागते. इथल्या वेगळेपणाशी जुळवून घेताना सूर सापडत नाही...काही तरी चुकतंय् असे वाटू लागते. सणा–वारांच्या निमित्ताने तर ही जाणीव प्रकर्षाने होते. पंचांगात किंवा मराठी कॅलेंडरमध्ये पाहिल्याशिवाय तर काही काही सणांचा पत्ताच लागत नाही ! व्यवसायांत गुंतलेल्यांना कधीकधी हे सण हुलकावणी देऊन निघूनही जातात. अशा परिस्थितीत मराठी लोकांना अनेक निमित्तांनी एकत्र आणून मराठी मेळाव्यात कार्यक्रम झाले की, या मराठी माणसाला खूप खूप समाधान लाभते. हरवलेले गवसल्याचा आनंद होतो. वर्षभर असे कार्यक्रम सणवार, प्रसंग, जयंती, पुण्यतिथी अशा अनेक निमित्तांनी घडत असतात.

'मराठी मित्रमंडळ' ही दिल्लीतील अशीच एक जुनी संस्था आहे. हिची स्थापना १९४६ साली करोलबागेतील मराठी मंडळींनी एकत्र येऊन केली. ह्या संस्थेचे वैशिष्टय असे की, 'मराठी' हा एक आवश्यक विषय म्हणून ८ व्या इयत्तेपर्यंत शिकवणारी 'चौगुले शिशुविहार' ही एकमेव शाळा दिल्लीत त्यांनी सुरू केली. ही शाळाही इतर शाळांप्रमाणेच इंग्लिश माध्यमातून शिक्षण देणारी असली तरी 'मराठी' विषय हा आवश्यक म्हणून फक्त येथेच शिकवला जातो. श्री. विश्वासराव चौगुले यांनी शाळेला ५०,००० रु. देऊन मदत केल्यामुळे शाळेसाठी जागा घेणे मंडळाला शक्य झाले. येथे अमराठी मुलेही मराठी विषय आवडीने शिकतात.

दिल्लीत अशा अनेक महाराष्ट्रीय संस्था सध्या आपआपले कार्यक्रम घडवत असतात. पैकी महाराष्ट्रीय स्नेहसंवर्धक समाज ही आद्य संस्था आहे. हिची स्थापना होऊन ६२ वर्षे पूर्ण झाली. सुरुवातीला दिल्लीत जे थोडेफार मराठी लोक आले होते त्या सर्वांनी मिळून ही संस्था स्थापन केली. कालांतराने अंतर दूर दूर असल्यामुळे त्या त्या विभागात महाराष्ट्रीय संस्था स्थापन झाल्या. उत्तर दिल्ली महाष्ट्र समाज, महाराष्ट्र मंडळ मोतीबाग, प्रबोधिनी भजनी मंडळ, श्री विठ्ठलमंदिर संस्थान, राणी लक्ष्मी भगिनी समाज, महाराष्ट्र मंडळ रामकृष्णपुरम, राणी लक्ष्मी भगिनी समाज, चतुर्थीमंडळ, वनिता विकास मंडळ इत्यादी अनेक महाराष्ट्रीय संस्था सध्या दिल्लीत आहेत. वर्षभरात साजरे करण्यासारखे सण, प्रसंग ते मोठ्या उत्साहाने साजरे करतात. गणेशोत्सव, हळदीकुंकू, टिळकपुण्यतिथी, कोजागरी, चैत्रगौरी, मकरसंक्रात, वार्षिक सहल, गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी बालवाडी, वाचनालय, खेळ, वक्तृत्व व इतर स्पर्धा इत्यादी कार्यक्रम ह्या संस्था आपआपल्या मर्यादेत घडवून आणतात. काही ठिकाणी ह्या संस्था सुरुवातीला जितक्या कार्यशील होत्या तितक्या आता राहिल्या नाहीत, काहींचा उत्साह मात्र 'शुक्लेंदुवत् वर्धिष्णु' आहे !

काही असले तरी आपल्या प्रदेशाला दुरावलेल्या मराठी लोकांनी एकत्र येऊन या निमित्ताने एकमेकांना भेटण्याचे आणि आनंदसोहळा साजरा करण्याचे महत्त्व येथे फार आहे आणि ते तसे साजरे होतात ही समाधानाची गोष्ट आहे.

'मराठी माणसे ही 'कलहशील' म्हणून प्रसिद्ध असली आणि बाणेदारपणा त्यांच्या ठिकाणी असला तरी 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' हा येथील पंजाबी रक्ताचा एक गुणही त्यांनी हळूहळू आत्मसात करावा आणि सर्वांचीच उन्नती साधावी असे आवर्जून वाटते !'

—ललिता मिरजकर

---

" विकासकार्याचा खरा अर्थ लोकांचा विकास इतर कुणी, सरकारने किंवा खाजगी संस्थांनी घडवून आणणे असा नसून लोकांना विकासासाठी सिद्ध करणे, त्यांच्यामध्ये विकासक्षमता निर्माण करणे असा आहे. असे झाले नाही तर विकासाचे प्रयत्न आणि परोपकार यात फरक उरणार नाही. म्हणजे कार्यकर्त्याला शेवटी झगडावे लागणार आहे ते समाजाच्याच काही विकासविन्मुख प्रेरणांशी. हा संदेश या पुस्तकात स्पष्ट आहे आणि तेच त्याचे मोल आहे. "

डॉ. स. ह. देशपांडे
अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

# श्रीग्रामायन

लेखक : श्री. ग. माजगावकर
राजहंस प्रकाशन, पुणे
मूल्य : पंचवीस रुपये

---

## वसंतदादा आणि त्यांचे विरोधक

# महाराष्ट्र कॉंग्रेस ( इं ) मधील लाथाळ्यांचा अन्वयार्थ

अभय गोखले

महाराष्ट्र इंदिरा कॉंग्रेसमधील अंतर्गत लाथाळ्यांना आता ऊत आला आहे. उरणच्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा आपली डागळलेली प्रतिमा उजळण्यासाठी उपयोग करणारे माजी मुख्यमंत्री अंतुले आता मुख्यमंत्री वसंतदादा पाटलांविरुद्ध उघडपणे दंड थोपटून उभे आहेत. इतके दिवस पडद्याआडून हालचाली करणाऱ्या अंतुल्यांना उरणचे आंदोलन हे वरदानच ठरले आहे. उरण हे अंतुल्यांच्या रायगड जिल्ह्यात असले तरी तेथील आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांबद्दल अंतुले जो कळवळा दाखवत आहेत तो राजकीय हेतूने प्रेरित होऊन हे सर्वांना माहीत आहेच. अंतुले, बाबासाहेब भोसले, रामराव आदिक, कांबळे, बाबाराव काळे, नरेंद्र तिडके यांच्या जोडीला केंद्रीय मंत्री शंकरराव चव्हाण हेही वसंतदादांवर टीकेचे आसूड ओढण्यास सिद्ध झाले आहेत. अर्थात या सर्व शागीर्दांना, वसंतदादांना त्रास देण्याचे वरून आदेश नसले तरी त्या बाबतीत त्यांना वरून आडकाठीही होणार नाही. संजय गांधींचा राजकारणात प्रवेश झाला तेव्हापासून कोणत्याही राज्यातील आपल्या मुख्यमंत्र्याला कधीही स्थिरता लाभू द्यायची नाही हे इंदिरा कॉंग्रेसचे सूत्र बनून गेले आहे. त्याचबरोबर तो मुख्यमंत्री जर राज्यातील बहुसंख्य जमातीचा असेल तर कोणत्याही परिस्थितीत त्याला वरचढ होऊ द्यायचे नाही हा अलिखित ठराव होऊन गेलाय.

राज्याराज्यांतील बहुसंख्यांकांचे वर्चस्व मोडून काढण्याकरिता, संजय गांधींचे पक्षात वर्चस्व वाढल्यावर, त्या त्या राज्यात अल्पसंख्य जमातीचा नेता मुख्यमंत्री म्हणून वरून पाठवायची प्रथा सुरू झाली. त्यानुसार महाराष्ट्रातील मराठ्यांचे खच्चीकरण करण्यासाठी अंतुले साहेबांना मुख्यमंत्री म्हणून वरून नेमण्यात आले. जर आमदारांच्यात मतदान घेण्यात आले असते तर अंतुले कधीच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनू शकले नसते! एखादा शुगरलॉबीचा नेता मुख्यमंत्रीपदावर आरूढ झाला असता. केवळ संजय गांधींच्या कृपेनेच अंतुल्यांना मुख्यमंत्रीपद मिळाले. हाच निकष लावून मग मध्यप्रदेशात अर्जुनसिंग राजस्थानमध्ये पहाडिया, गुजराथमध्ये सोळंकी, कर्नाटकात गुंडुराव यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लावण्यात आली. ही सर्व संजय गांधींची माणसे होती. त्यातील अर्जुनसिंग व सोळंकी अजून त्या जागेवर आहेत तर पहाडिया, अंतुले व गुंडुराव या ना त्या कारणाने मुख्यमंत्रीपदावरून बाजूला झाले आहेत.

१९७८ मध्ये कॉंग्रेसची दोन शकले झाल्यावर महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांकरिता रेड्डी कॉंग्रेस व इंदिरा कॉंग्रेस एकमेकांविरुद्ध लढण्याकरिता मैदानात उभे राहिले त्या वेळेस जनता पक्ष केंद्रात सत्तेवर होता. यशवंतराव चव्हाण, शरद पवार, वसंतदादा पाटील इत्यादि नेते रेड्डी कॉंग्रेसमध्ये असल्याने विधानसभा-निवडणुकांत ते इंदिरा कॉंग्रेस व जनता पक्षावर सहज मात करतील असे वाटत होते. मात्र विधानसभेच्या निवडणुकीत कोणालाच बहुमत न मिळता जनता पक्षास विधानसभेत सर्वांत जास्त जागा मिळाल्या. बाबुराव काळे, नाशिकराव तिरपुडे, बाबासाहेब भोसले, रामराव आदिक, अंतुले, एन. के. पी. साळवे, वसंतराव साठे हे फारसे न नावाजलेले नेते इंदिरा कॉंग्रेसमध्ये राहूनसुद्धा इंदिरा गांधींना विदर्भाने हात दिला व त्यामुळे तो पक्ष विधानसभेच्या ६२ जागा जिंकू शकला. रेड्डी कॉंग्रेसने त्यापेक्षा थोडया जास्त जागा जिंकल्या; परंतु मतदारांनी त्यांची साफ निराशा केली. महाराष्ट्रातील कॉंग्रेसचे बहुतेक बडे नेते रेड्डी कॉंग्रेसमध्ये गेल्याने महाराष्ट्रात इंदिरा कॉंग्रेसचे पानिपत होईल हा रेड्डी कॉंग्रेसच्या नेत्यांचा होरा साफ चुकीचा ठरला! इंदिरा गांधी जनता राजवटीतही आपला प्रभाव बराच राखून होत्या.

### मराठा लॉबीचा दणका

जनता पक्ष सत्तेवर येऊ नये म्हणून मग आपापसातील हेवेदावे विसरून रेड्डी कॉंग्रेस व इंदिरा कॉंग्रेसने संयुक्त मंत्रिमंडळ बनवले. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री तर नाशिकराव तिरपुडे (उपमुख्यमंत्री) अशी तडजोड करण्यात आली. जनता पक्षात मुख्यमंत्रीपदाकरिता समाजवादी व जनसंघ घटकांत जोरदार संघर्ष झाल्यानेच संयुक्त कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ सत्तेवर येऊ शकले. मात्र दोन्ही कॉंग्रेसचा हा हनिमून फार काळ टिकणारा नव्हता. केवळ जनतापक्ष सत्तेवर येऊ नये या नकारात्मक भूमिकेतून ते एकत्र आले होते. थोड्याच दिवसांत मंत्रिमंडळात कुरबुरी सुरू झाल्या. इंदिरा कॉंग्रेसतर्फे वसंतदादांवर डायरेक्ट टीका होऊ लागली. नाशिकराव तिरपुडयांसारखा हटवादी व जनमानसात फारसे स्थान नसलेला नेता उपमुख्यमंत्रीपदी असल्याने दोन कॉंग्रेसमध्ये फार काळ सामंजस्याचे वातावरण रहाणे शक्यच नव्हते,

परंतु वसंतदादांचे मंत्रिमंडळ कोसळले ते दोन कॉंग्रेसमधील भांडणांमुळे नव्हे तर यशवंतराव चव्हाणांचे शिष्य व वसंतदादांच्या मंत्रिमंडळातील एक मंत्री श्री. शरद पवार यांनी जनता पक्षाशी बोलणी करून आपल्या बऱ्याचशा अनुयायांसह वसंतदादा मंत्रिमंडळाचा पाठिंबा काढून घेतला. त्या बदल्यात जनतापक्षाच्या पाठिंब्याने मुख्यमंत्री बनण्याची त्यांची आकांक्षाही पूर्ण होणार होती. महा-

राष्ट्रातील काँग्रेस कधी काळी सत्ताभ्रष्ट होईल असे स्वप्नातही खरे वाटले नसते ते सत्यात घडून आले. महाराष्ट्र हा पूर्वीपासूनचा काँग्रेसचा बालेकिल्ला, तो पार उध्वस्त झाला ! शरद पवारांच्या नेतृत्वाखालील पुरोगामी लोकशाही आघाडीचे बिगरकाँग्रेसी सरकार प्रथमच महाराष्ट्रात अस्तित्वात आले. या सरकारमध्ये सर्वांत जास्त जोर अर्थातच जनता पक्षाचा होता. मराठा लॉबीमध्ये दोन तट पडल्यानेच सत्तेवरून काँग्रेसला उडवणे शक्य झाले.

जनता पक्षामधील अनेक घटक व काँग्रेसमधून फोडून आणलेले आमदार यांना दीर्घकाळ एकत्र ठेवणे ही तारेवरची कसरत होती. सुदैवाने शरद पवारांनी ते काम यशस्वीरीत्या पार पाडले. मुख्यमंत्री म्हणून त्यांची कारकीर्दही फारशी वाईट झाली नाही, जनतापक्षातील बड्या नेत्यांच्या आपापसातील लाथाळीने जनता पक्ष केंद्रातून सत्तेवरून फेकला गेला तरीसुद्धा काही काळ शरद पवार ह्यांचे मंत्रिमंडळ सुरळीतपणे काम करत होते. १९८० मध्ये इंदिरा गांधी पुन्हा प्रचंड मताधिक्याने निवडून आल्या. आता वसंतदादा वगैरे मंडळी त्यांच्या कळपात आलेली होती. शरद पवार हे मात्र निर्धाराने इंदिरा गांधींच्या विरोधातच राहिले. शरद पवार मंत्रिमंडळात मंत्रिपद उपभोगलेल्या शंकरराव चव्हाणांनीही मग इंदिरा गांधींशी जमवून घेतले. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांत इंदिरा काँग्रेस लोकसभेच्या निवडणुकीप्रमाणे चांगल्या मताधिक्याने निवडून आली. संजय गांधींच्या कृपेने अंतुले हे महाराष्ट्राचे पहिले मुसलमान मुख्यमंत्री बनले ! हा महाराष्ट्रातील मराठा-लॉबीला मोठा दणका होता; परंतु त्यांच्यात दोन तट पडल्यानेच त्यांना अंतुलेंना स्वीकारणे भाग पडत होते. हा शुगरलॉबीलाही मोठा धक्का दिलेला होता. बहुतेक बड्या मराठा नेत्यांना लोकसभेकरिता तिकिटे देऊन त्यांची परस्पर वाट लावण्यात आली होती. वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते, शंकरराव चव्हाण हे लोकसभेत गेल्याने त्यांचा बिगरमराठा मुख्यमंत्र्याला फारसा त्रास होणार नव्हता.

### दादाच कायम – पण स्थैर्य ?

संजय गांधींचा भरभक्कम पाठिंबा हा आपले शासन स्थिर राखण्याकरिता मुख्यमंत्री अंतुले यांना पुरेसा होता. त्यांनी आपल्या कारकीर्दीत काही जनहिताचे निर्णय धडाक्याने घेतले व त्याकरिता कोणाचीही पर्वा केली नाही. इंदिरा गांधी व संजय गांधींचा त्यांना पाठिंबा असल्याने जगातील कोणतीही शक्ती त्यांचे काहीही वाकडे करू शकणार नव्हती. मात्र अंतुल्यांचा फाजील उत्साह त्यांचा घात करून गेला ! प्रतिभाप्रतिष्ठानमधील त्यांचा तथाकथित भ्रष्टाचार उघडकीस आणला तो शुगरलॉबीवाल्यांनीच ! इंदिरा व संजय यांच्या पाठिंब्याने अंतुले आता शुगरलॉबीच्याही हात धुऊन पाठीशी लागले होते. त्यामुळे हळूहळू त्याची परिणती पूर्वीचे सर्व विरोधक एकत्र येण्यात झाली. त्यातच अंतुले यांना स्वतःच्या शक्तीबद्दल वेगळाच आत्मविश्वास वाटू लागल्याने त्यांना कोठे तरी लगाम घालणे इंदिरा गांधींना अगत्याचे वाटू लागले.

प्रतिष्ठान–प्रकरणावरून अंतुल्यांना मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा

एस्कॉर्ट ३५५
४७ व ३५ हॉर्सपॉवर्स ३३०

ट्रॅक्टर व स्पेअर पार्टस्चे अधिकृत विक्रेते
सारंग आटो इंजिनिअर्स अॅण्ड डीलर्स
नवीन मुंबई नाक्याचे जवळ, जुना आग्रा रोड,
नाशिक–४२२ ००१ ★ फोन नं. : ६४९४

- कुशल तंत्रज्ञाकडून त्वरित सेवा
- कमीत कमी खर्चात दुरुस्ती
- सर्व्हिसिंगची सोय
- पैशाची व इंधनाची बचत
- हजर स्टॉकमधे उपलब्ध.

" आता आमुचे एकच लक्ष
सामाजिक वनीकरणांतर्गत अगणित वृक्ष "

द्यावा लागल्याने इंदिरा गांधींना सुंठीवाचून खोकला गेला असे वाटले असेल. अंतुल्यांच्या बाबतीतील चूक त्या पुन्हा करणार नव्हत्या. मराठा जमातीला फार काळ डावलणे शक्य नव्हते; परंतु त्यातील एखादा मान्यवर पुढारी मुख्यमंत्रीपदी बसवणे म्हणजे तो शिरजोर होण्याचा धोका होता. मग जनमानसात फारसे स्थान नसलेल्या बाबासाहेब भोसल्यांना मुख्यमंत्रीपदी बसवण्यात आले. असे करून इंदिरा गांधींनी एका दगडात दोन पक्षी मारले. मराठा जमातीच्या माणसाला मुख्यमंत्री करून त्यांना दिलासा दिला आणि बाबासाहेब भोसल्यांसारख्या अनभिज्ञ माणसाला मुख्यमंत्री करून मंत्रिमंडळाची सर्व सूत्रे आपल्या हाती ठेवली. त्यामुळे व्हायचे तेच झाले. बाबासाहेब भोसल्यांसारखी अकार्यक्षम व्यक्ती मुख्यमंत्रीपदावर आल्यावर अनागोंदी कारभारास सुरुवात झाली. बाबासाहेबांचे पक्षावर नियंत्रण नसल्याने गटबाजीस ऊत आला. कांग्रेसपक्षात *लाथाळ्या व गटबाजी या गोष्टी काही नवीन नाहीत*; परंतु अंतुल्यांपासून या लाथाळ्यांनी उग्र स्वरूप धारण केले. अंतुल्यांच्या वेळेपासून मुख्यमंत्री व पक्षाध्यक्ष यांच्यात मतभेद वाढू लागले, तर बाबासाहेब भोसले व आता वसंतदादांच्या कारकीर्दीत हे मतभेद चव्हाट्यावर आलेत !

बाबासाहेब भोसले अकार्यक्षम ठरल्याने मग अखिल भारतीय इंदिरा कांग्रेसचे सरचिटणीस असलेल्या वसंतदादा पाटलांना नाइलाजाने इंदिरा गांधींनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी बसवले. वसंतदादा पुढे–मागे आपल्याला डोईजड होऊ शकतील हे त्यांना पुरेपूर माहीत होते; पण त्यांचा त्या वेळेस नाइलाज होता. अंतुले व भोसले यांनी महाराष्ट्र कांग्रेस (इं) ची होती नव्हती ती प्रतिष्ठा धुळीस मिळवली होती. तेव्हा त्यातल्या त्यात चांगली प्रतिमा असलेले वसंतदादाच त्या वेळेस त्यांच्यासमोर लायक उमेदवार होते; परंतु वसंतदादांना ज्या दिवशी मुख्यमंत्रीपदी बसवण्यात आले त्याच दिवशी इंदिराजींनी निर्णय घेतला की, वसंतदादा वरचढ होऊ नयेत म्हणून त्यांना कधीच स्वस्थता लाभू द्यायची नाही. वसंतदादांना नको असलेल्या असीर यांची महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस ( इं ) च्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. विधानसभेत निवडून येण्याची ताकद नसलेल्या रामराव आदिकांना उपमुख्यमंत्रिपदी नेमून त्यांचा खोडा वसंतदादांच्या गळयात अडकवण्यात आला. आपल्याला न आवडणाऱ्या माणसाला त्रास देण्याकरिता ज्यांचा उपयोग केंद्रातून करण्यात येतो किंवा ज्यांच्या उपद्रवाकडे केंद्राकडून कानाडोळा केला *जातो ती माणसे एका विशिष्ट वर्गातील असतात*. आज मुख्यमंत्री वसंतदादांना सतावणारे जे तथाकथित निष्ठावंत आहेत त्यातील किती लोक वसंतदादांच्या लोकप्रियतेशी जवळपास पोचू शकतील ? रामराव आदिक कधीच निवडणूक (विधानसभेची) जिंकलेले नाहीत. या संदर्भात महाराष्ट्रातून कोठूनही उभे राहून रामरावांनी जिंकून दाखवावे हे शालिनीताई पाटील यांनी त्यांना दिलेले आव्हान बरोबरच आहे. बाबुराव काळे, नासिकराव तिरपुडे, नरेंद्र तिडके हे सर्व जनमानसात स्थान नसलेले लोक इंदिरालाटेतही निवडणूक हरलेले आहेत. बाबासाहेब भोसले आगामी निवडणुकीत निवडून येतील किंवा नाही याची शाश्वती ते स्वतःही देऊ शकणार नाहीत! अंतुल्यांच्या पाठीमागे कोर्टाचा लफडा आहे. शिवाय अंतुले स्वतः काहीही म्हणोत; परंतु श्रीवर्धन मतदारसंघाबाहेरील इतर कोणत्याही मतदारसंघातून ते छातीठोकपणे निवडून येणार नाहीत !

तेव्हा अंतुले, बाबुराव काळे, बाबासाहेब भोसले, नरेंद्र तिडके, तिरपुडे, रामराव आदिक यांनी वसंतदादांविरुद्ध कितीही दंड थोपटले तरी त्याचा वसंतदादांच्या खुर्चीवर काहीही परिणाम होणार नाही. मात्र त्यांनी वसंतदादांविरुद्ध कितीही गदारोळ माजवला तरी त्यांच्याविरुद्ध वरून कारवाईही होणार नाही. कारण इंदिरा गांधींनाही तेच हवे आहे. मात्र ते त्यांना काळे, भोसले, तिरपुडे, रामराव आदिक यांच्यासारख्या जनमानसात फारसे स्थान नसलेल्यांकडून करून घ्यावयाचे आहे. कारण एकदा का शागीर्दांचे काम संपले की, मग त्यांना अडगळीत फेकून दिले तरी कोणी कुरकुर करणार नाही. असीर हे बाबासाहेबांप्रमाणे अकार्यक्षम व कल्पनाशून्य निघाल्यावर त्यांच्या जागी कांबळेंची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या *नियुक्तीमागे दलितांचा कळवळा दाखवायचा होताच*. शिवाय लोकप्रियतेच्या बाबतीत त्यांचे स्थान आदिक, भोसले, काळे यांच्याच रांगेत असल्याने त्यांना काबूत ठेवणेही शक्य होणार होते.

वसंतदादांना मुख्यमंत्रीपदी नेमणे ही इंदिरा गांधींनी केलेली एक तडजोड आहे. वसंतदादा, शरद पवार, यशवंतराव चव्हाण एकत्र आले तर ते आव्हान आपल्याला पेलवणार नाही हे इंदिरा गांधींना पुरेपूर माहीत आहे. शरद पवार व वसंतदादांना त्या कोणत्याही परिस्थितीत एकत्र येऊ देणार नाहीत. मुख्यमंत्रीपदी वसंतदादाच कायम रहातील. त्यांच्याविरुद्ध टीका करणाऱ्यांची तोंडे बंद केली जाणार नाहीत. गटबाजीस ऊत आला तरी तो इंदिरा गांधींना हवाच आहे. संघटना वरपासून खालपर्यंत खिळखिळी झाली आहे, त्याचे त्यांना काहीच सोयरसुतक नाही. वसंतदादांना त्यांना (इंदिराजींना) मुख्यमंत्रीपदी कायम ठेवायचे आहे; परंतु स्थैर्य मात्र लाभू द्यावयाचे नाही ! □

## साप्ताहिक माणूस

**मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन.**

**( अधिनियम ४ व नियम ८ अन्वये )**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | पुणे |
| २. | प्रकाशन काळ | : | साप्ताहिक |
| ३. | मुद्रक, प्रकाशक, संपादक नांव व पत्ता | : | श्री. ग. माजगावकर १०२५ सदाशिव पेठ पुणे ४११ ०३० |
| ४. | नागरिकत्व | : | भारतीय |
| ५. | प्रकाशन संस्थेचे नाव व तिच्या मालकांचे नांव व पत्ता | : | राजहंस प्रकाशन श्री. ग. माजगावकर दिलीप माजगावकर १०२५ सदाशिव पेठ, पुणे |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

दिनांक १ मार्च १९८४

प्रकाशकाची सही
श्री ग. माजगावकर

# आठवणी : लिओनिड ब्रेझनेव

**अनुवादक : डॉ. चं. रा. तळपदे.**

## एक : कुटुंब आणि कारखाना

कामगारांच्या एका मोठ्या वसाहतीमध्ये कामकरी कुटुंबात माझा जन्म झाला, त्या कुटुंबातच मी वाढलो व तेथेच माझ्या कामकरी जीवनाची उमेदवारीची वर्षे व्यतीत केली हे माझे एक सद्भाग्य आहे असे मी मानतो. माझ्या बाळपणीची अगदी सुरुवातीची व मनात राहून गेलेली एक जोरदार आठवण म्हणजे कारखान्याचा भोंगा. सकाळ होतेय न होतेय तोच माझे बाबा कारखान्यात वापरायचे कपडे घालून तयार व्हायचे आणि माझी आई त्यांना निरोप देण्यासाठी दारापर्यंत जायची आणि ते दाराबाहेर पडले की तेवढ्यात कारखान्याचा भोंगा व्हायचा. त्या भोंग्याचा आवाज असा काही दणदणित असायचा की, मला वाटायचे हा आवाज साऱ्या जगभर ऐकू जात असेल.

त्या वेळी रेडिओ नव्हता आणि कामकऱ्यांकडे घड्याळेही नसायची. कारखानाच त्यांना कामावर बोलवायचा. सकाळी साडेपाच वाजता पहिला भोंगा व्हायचा आणि दिवसपाळी सुरू झाली हे सांगणारा दुसरा भोंगा सहा वाजता व्हायचा. संध्याकाळी साडेपाच वाजता दिवसपाळी संपल्याचा व सहा वाजता रात्रपाळी सुरू झाल्याचा असे दोन भोंगे व्हायचे. त्या काळात कामेन्स्कोयेमधल्या आमच्या वसाहतीत पंचवीस हजार लोक राहात असत. त्या वसाहतीचेच पुढे ड्नेप्रोझर्झिन्स्क या औद्योगिक शहरात रूपांतर झाले. किती वाजले हे पाहाणे, आमची रोजची कामे, आमच्या सवयी व रीतीरिवाज, या साऱ्या काही गोष्टी म्हणजे थोडक्यात आमचे सारे जीवनच कारखान्याच्या भोंग्यावर अवलंबून होते.

बाबा घराबाहेर पडले की, घाईघाईने अंगावर कपडे चढवून, काहीसुद्धा खाणेपिणे न घेता, मी अनवाणीच त्यांच्या मागे धावायचा. त्यांना गाठल्यावर, त्यांनी माझा हात आपल्या हातात घेतला की मान वळवून मी मोठ्या अभिमानाने मागे पाहायचा— आता किती मी मोठा झालोय, कारखान्याला जाऊ लागलोय असेच जणू मला साऱ्यांना सांगावेसे वाटायचे. खरे म्हणजे त्या वेळी मी फक्त चार वर्षांचा होतो. आम्ही चालत असता, जवळपासच्या घरांतून, गल्लीबोळांतून इतर कामकरी यायला लागायचे. कामकऱ्यांची संख्या वाढत जायची आणि त्या साऱ्यांचा ओघ कारखान्याच्या दिशेने चालू लागायचा. या साऱ्यांचे कपडे ढगळ व मळलेले असायचे; पण त्यांच्याबरोबर चालत जायला फार मजा यायची !

हजारोंच्या संख्येत मोजता येण्यासारखा कामकऱ्यांचा हा ओघ ड्निपरनदीजवळील मार्केटहिलकडे चालू लागायचा. येथे आल्यानंतर बाबा माझा हात सोडून, मला घरी जायला सांगायचे व आपण पुढे चालायला लागायचे. थोडयाच वेळात ते कामकऱ्यांच्या गर्दीत मिसळून जायचे आणि तऱ्हतऱ्हेच्या टोप्यांच्या व हॅट्सच्या गर्दीत त्यांची टोपी मला काही ओळखता येत नसे. कामकऱ्यांचा हा सारा लोंढा कारखान्याच्या फाटकातून आत शिरलेला पाहिल्यावर मी घराकडे परत येत असे; पण सात वर्षांचा झाल्यावर, मी प्रथमतःच कारखान्याच्या फाटकातून आत शिरलो. बाबांचे जेवण त्यांना द्यायला मी कारखान्यात जाऊ लागलो.

कारखान्यात बारा–बारा तासांच्या दोन पाळ्या असत आणि काही कारणाने कामात व्यत्यय आला तर कामकरी हातातले काम पुरे करूनच बाहेर पडत. म्हणजे आधी बाहेर पडायची त्यांना परवानगी नव्हती. अशा वेळी कधीकधी अठरा तासांची एक पाळी व्हायची. कारखान्यात कॅन्टीन नव्हते आणि जेवणासाठी सुट्टी देण्याचा प्रघातही नव्हता. त्यामुळे घरून आणलेला डबा तसाच वेळ काढून, कामकरी घाईघाईत संपवीत. काही जणांचे जेवण घरून कोणी तरी घेऊन यायचे— कुणाची बायको, मुलगी किंवा बहीण-कामकऱ्याचे जेवण घेऊन यायची. मोठा झाल्यावर मला समजून आले की, माझ्या आई–बाबांची विवाहपूर्व भेट बागेत झाली नव्हती, फिरायला गेले असता झाली नव्हती, मित्रमंडळीत झाली नव्हती किंवा एखादा मनोरंजनाचा कार्यक्रम बघायला गेले असता झाली नव्हती, तर याच ड्निपर कारखान्याच्या लोखंडी कांबी तयार करण्याच्या विभागात काम करता करता झाली होती. (मनोरंजनाचे कार्यक्रम करता येतील

अशी एकही इमारत त्या काळात गावात नव्हती.)

रोलिंग मिलमध्ये माझे वडील मिलरचे जोडीदार म्हणून काम करायचे आणि भट्ट्यांवर डेनिस माझालोव नावाच्या एका वयस्कर माणसाची देखरेख असायची. चांगलेच मजबूत व जाडजूड, अबोल आणि कारखान्यात काम करणाऱ्या रशियन कामकऱ्याची सर्व वैशिष्टये अंगात असलेले माझालोव अजून माझ्या चांगलेच आठवणीत आहेत. ते पूर्वी निकोपोल गावी कामावर होते. तेथून आमच्या कारखान्यात येईपर्यंत त्यांच्या कुटुंबात किती तरी जणांची भर पडली होती. त्यांची तरुण कन्या नताल्या त्यांचे जेवण घेऊन यायची आणि झोतभट्ट्यांच्या परिसरात मिल २८० या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विभागात माझ्या बाबांची नताल्याबरोबर ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधात होऊन, ते दोघे विवाहबद्ध झाले. त्यांचा विवाह झाला त्या वेळी माझे वडील अठ्ठावीस वर्षांचे होते व आई वीस वर्षांची होती.

माझ्या कुटुंबाबद्दल मी आणखी काय माहिती देऊ शकणार? कामकऱ्यांच्या कुटुंबामध्ये आपली वंशावळ लिहून ठेवण्याचा प्रघात नव्हता. मला फक्त एवढे माहीत आहे की, माझे वडील इल्या याकोलेविच ब्रेझनेव यांनी १९०० साली ड्निपर मिल या कारखान्यात नोकरी धरली. कुर्स्क प्रांतातील स्ट्रेलेस्कोये जिल्ह्यांतल्या ब्रेझनेवो गावाहून ते ड्निपर कारखान्यात आले होते. आमच्या गावाचे व आमच्या कुटुंबाचे नाव बेरेग म्हणजे किनारा या नावावरून आले असावे किंवा बेरेच म्हणजे देखरेख करणे किंवा देखभाल करणे या क्रियापदापासून आले असावे. ज्या जमिनीपासून आपण अन्नधान्य पैदा करतो त्या जमिनीची देखभाल करणे ही शेतकऱ्याची जन्मजात प्रवृत्ती असते. त्या प्रवृत्तीला अनुलक्षून 'बेरेच'पासून ब्रेझनेव हे नाव आले असावे असे मला वाटते. आमचे शेतकरी शतकानुशतके ज्या भूमीवर राहात आले होते, त्या भूमीला त्यांच्या श्रमजात घामाचे, मेहनतीचे व रक्ताचे खतपाणी मिळाले होते; पण शतकानुशतके असे चालत राहूनही त्या शेतकऱ्यांना गरिबीचा शाप मिळाला होता. नाही तर माझ्या वडिलांना आपली शेतजमीन सोडून, रोजगारीच्या शोधार्थ कारखान्याकडे यावे लागले नसते.

जाता जाता आणखी एक माहिती द्यायची म्हणजे आमच्या कुटुंबाबरोबर आणखी एक गाववाला राहू लागला. आम्ही त्यांना आर्कोडीकाका म्हणत असू. ते माझ्या वडिलांचे नातेवाईक नव्हते; पण माझे वडील ज्या गावाहून आले होते त्याच गावाच्या परिसरातून ते आले होते. इतर कामकरी जसे नोकरीच्या शोधार्थ या कारखान्यात आले होते, तसेच तेही येथे आले होते. येथे आल्यावर त्यांची माझ्या बाबांबरोबर मैत्री जमली आणि ते आमच्या घरी राहू लागले. त्यांना लोखंड व पोलाद विभागात काम मिळाले आणि नंतर मावशीशी म्हणजे माझ्या आईच्या धाकट्या बहिणीशी त्यांचा विवाह झाल्यानंतर ते आमचे खरेखुरे कुटुंबीय झाले. आमच्या गावातच नाही तर इतर रशियन गावांतही एकाच आडनावाची बरीच माणसे असत असे वाटते.

तेव्हा जन्माने मी रशियन आहे आणि माझ्या सामाजिक स्तराचा विचार केल्यास मी श्रमजीवीवर्गात जन्मलो व वाढलो आणि परंपरेने मी पोलादकारखान्यातला कामकरी आहे. माझ्या वंशवेलीची मला एवढीच माहिती देता येणे शक्य आहे.

रशियन कामकरीवर्गाच्या वंशावळीची माहिती द्यायला ही योग्य जागा आहे असे मला वाटते. विसाव्या शतकाला सुरुवात झाली त्या सुमारास रशियन कामकरीवर्गाची वाढ व्हायला सुरुवात झाली, त्यामुळे आपापली गावे सोडून लोकांचे लोंढे कारखान्याकडे यायला सुरुवात झाली व लाखो लोकांच्या जीवनमानात कमालीचा फरक झाला. एखाद्या व्यक्तीच्या जीवनात झालेला फरक काही तरी आकस्मिक कारणाने झाला असे म्हणता येते; पण रशियात घडून येत असलेल्या औद्योगिक क्रांतीमुळे लाखो लोकांच्या जीवनात एकाच प्रकारचा फरक घडून आला. येकतारिनोस्लाव भागात म्हणजे सध्याच्या ड्नेप्रोपेट्रोवस्क भागात माझे आईवडील आले व दक्षिण रशियात राहू लागले, हे कोणत्याही आकस्मिक कारणाने घडले नाही. रशियाच्या औद्योगिक क्रांतीचा तो एक परिणाम होता.

दक्षिण रशियाच्या या प्रदेशात डॉनबास येथे कोळशाच्या खाणी होत्या आणि क्रिवाइरॉग येथे लोखंडाच्या खाणी होत्या. ही दोन्ही ठिकाणे रेल्वेने जोडली होती आणि शिवाय ड्निपर नदी हा एक उत्तम जलमार्ग होता. क्रिवाइरॉगमधील लोहखनिज येझिट्सा व ब्रिआन्स्क येथल्या लोखंडी अवजारे करणाऱ्या कारखान्यात आणण्याची चांगली सोय होती. हे सगळे फायदे आणि अत्यंत कमी खर्चाचा, कधीही संपुष्टात येणार नाही असा रशियन मजूरवर्ग यामुळे रशियन धनिकवर्गच नाही तर परदेशी धनिकवर्गसुद्धा या प्रदेशात आला. ड्निपर कारखाना फ्रेंच, पोलिश व बेल्जियन धनिकांनी उभारला होता. या परकीय संपत्तीला रशियन लोक 'कॅपिटल' हा शब्द वापरत असत. कॅपिट म्हणजे गोळा करणे या रशियन शब्दापासून 'कॅपिटल' हा शब्द आला होता. जास्तीत जास्त नफा मिळवून, संपत्ती गोळा करत राहायचे या प्रवृत्तीला अनुलक्षून हा शब्द होता. ड्निपर कारखाना सुरू झाल्यानंतर फार झपाट्याने वाढला. १८८७ मध्ये कामेन्स्कोये हे फक्त दोन हजार लोकवस्तीचे गाव होते, ते १८९६ मध्ये अठरा हजार लोकवस्तीचे शहर झाले. ही आकडेवारी मी लेनिनच्या 'रशियातील भांडवलशाहीचा विकास' या पुस्तकातून घेतली आहे. त्या पुस्तकात लेनिनने म्हटले आहे– 'पूर्वी ज्या प्रकल्पांच्या वाढीला खूप वर्षे लागत, तेच प्रकल्प आता दहा–एक वर्षांत पुरे होतात.' कामगारचळवळीत बरीच वर्षे काढल्यानंतर, या विषयाचा अभ्यास करीत असता, ते उत्कृष्ट पुस्तक माझ्या वाचनात आले. तेव्हा दक्षिण रशियातील धातुविषयक कारखानदारीचा लेनिननी किती सूक्ष्म व संपूर्ण अभ्यास केला आहे ते माझ्या लक्षात आले. संपूर्ण देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासाचे विश्लेषण करीत असता, जगातील श्रमजीवीवर्गाच्या या महान पुढाऱ्याने आमचा प्रदेश अभ्यासायला घेतला. पूर्वीच्या कामेन्स्कोये गावाचा भूतकाळ आणि वर्तमानकाळ त्यांनी अभ्यासला व भविष्यकाळात या गावाचे भवितव्य काय असेल याचाही त्यांनी अंदाज घेतला. लेनिनच्या या पुस्तकाचा माझ्यावर खूप प्रभाव पडला असे माझी आठवण सांगते.

१८८० च्या सुमारास सेंट पीटर्सबर्ग, मॉस्को, कीव्ह, पर्म आणि व्लॅडिमीर हे रशियन प्रांत तंत्रज्ञानाच्या दृष्टीने इतर रशियन प्रांतांहून खूप प्रगत होते; पण १८९० साल उजाडेपर्यंत येकतेरिनो-

स्लाव प्रांताने जुन्या औद्योगिक केंद्रांना तंत्रज्ञानाच्या बाबतीत मागे टाकले होते व राजधानीच्या शहराच्या खालोखाल या प्रांताची प्रगती होती. १८८० ते १८९० या दहा वर्षांत 'बाष्पबळाचा वापर' उरल प्रांतात पूर्वीच्या जवळजवळ सहापट झाला, तर दक्षिण रशियात हा वापर पूर्वीच्या जवळजवळ सहापट झाला. उरल प्रांतातील उद्योगधंदे लोणारी कोळशावर अवलंबून होते तर दक्षिण रशियातील उद्योगधंदे दगडी कोळसा वापरत होते. लोहखनिजापासून लोखंड मिळवताना, भट्टीत थंड हवेचा झोत सोडण्याची पद्धत सोडून, भट्टीत हवेचा झोत सोडण्याआधी तो अगोदरच वरच्या तपमानास नेण्याची पद्धत दक्षिण रशियातील कारखानदारांनी उचलली होती व लोखंडाचे पोलादात रूपांतर करण्यासाठी पूर्वीची पद्धत सोडून, नवीन व अधिक कार्यक्षम पद्धती त्यांनी अवलंबल्या होत्या.

आपल्या अभ्यासातून लेनिननी असा निष्कर्ष काढला की, 'दक्षिण रशिया आता प्रगतीच्या मार्गावर आहे. उरल प्रांतातील उद्योगधंदे जुने व परंपरेला चिकटून आहेत तर दक्षिण रशियातील उद्योगधंदे सुरू होऊन फार थोडा वेळ झालेला आहे तरी ते जोमाने प्रगती करून घेताहेत. शुद्ध भांडवलशाहीच्या आधाराने गेल्या काही वर्षांत येथे उभे राहिलेले उद्योगधंदे कोणत्याच परंपरेला धरून नाहीत, कोणतेच सामाजिक किंवा राष्ट्रीय कर्तव्य जाणत नाहीत आणि फायदा करून घेण्याच्या बाबतीत जनतेच्या कोणत्याही विशिष्ट थरांना त्यांनी वगळले नाही.'

हे सर्व मी पुढे माझ्या विद्यार्थीदशेत वाचले व समजावून घेतले; पण लेनिननी ज्या घटनांसंबंधी लिहिले आहे त्या घटना माझ्या लहानपणात मी पाहिल्या आहेत आणि तेव्हापासून त्या माझ्या ध्यानात राहिल्या आहेत. विविध भाषांतून चाललेल्या संभाषणांचे आवाज, रशियाच्या वेगवेगळ्या प्रांतांतून चालत आलेल्या थकल्या-भागल्या व कारखाना पाहिल्यावर दिपून गेलेल्या शेतकऱ्यांचे लोंढे, कामगारांना राहण्यासाठी उभारलेल्या कामचलाऊ वस्त्या, झोत-भट्ट्यांची व उघड्या तोंडाच्या भट्ट्यांची बांधणी आणि लोखंड व पोलादाची मोठ्या प्रमाणावर निर्मिती करणाऱ्या रोलिंग मिल या साऱ्या गोष्टी मला अगदी तपशीलवार माहीत आहेत. ड्निपर कार-खान्यातली रोलिंग मिल दक्षिण रशियातल्या इतर रोलिंग मिलहून खूप मोठी होती व आमच्या वसाहतीत ती इतर सर्व इमारतींहून मोठी व अधिक उंच होती. या ड्निपर मिलच्या कामकाजाभोवती आमचे जीवनचक्र फिरत असायचे आणि कारखान्यातल्या काम-गारांच्या मुलांप्रमाणे मला माहीत होते की, आपणसुद्धा आपल्या वडिलांप्रमाणे याच कारखान्यात जाणार आहो आणि त्यांच्याच-प्रमाणे धगधगत्या भट्टीजवळ काम करणार आहो. आपण याहून काही तरी वेगळे करावे हा विचार आमच्या वसाहतीतल्या कोणा-च्याही डोक्यात आला नाही. कारखान्याच्या कामकाजाचा आवाज खूप दूरवर ऐकू यायचा आणि कारखान्याच्या अस्तित्वाची आठवण करून द्यायचा. हा कारखाना हेच माझे जीवन होणार आहे, ही गोष्ट त्या वेळी मला माहीत झाली होती.

हा कारखाना साधनसामुग्रीच्या बाबतीत सुसज्ज आहे असे त्या काळात मानत असत; पण सध्याच्या कारखान्यात रोलर कन्व्हेयर व लिफ्टिंग टेबल्स असतात तशी यंत्रसामुग्री त्या कारखान्यात नव्हती. रेल्वेने खनिज आले की, फावडी वापरून माणसे लोहखनिजाचा डबा खाली करत. भट्टीमध्ये कोळसासुद्धा कामकरी फावड्यांनी आत टाकत असत. एक मरतुकडा घोडा लोखंडाच्या काळपट गोळ्यांनी भरलेली गाडी ते तापवायच्या भट्टीकडे ओढत घेऊन जायचा आणि या भट्टीवर माझे डेनिस आजोबा घामाघूम होऊन काम करीत असत. या भट्टीत तापून तापून श्वेततप्त झालेले अर्धा-एक टन वजनाचे लोखंडाचे गोळे बाहेर आले की, त्यात आकडी अडकवून ते ओढत ओढत रोलिंग मिलकडे नेण्याचे काम कामकरीच करत असत. ते तप्त गोळे एका खाचेतून दुसऱ्या खाचेत नेत नेत, शेवटच्या खाचेत त्यातील लांबट कांबीसारखा गोळा आला की, ती तप्त कांब सांडशीने धरून, धातु थंड करायच्या जागी नेत असत.

रुंद खांद्याचा एक उंच कामकरी कपड्यावरून एप्रन चढवून व पायात वेगळे बूट घालून, लालभडक तप्त लोखंडाची कांब आली रे आली की, तिला पकडायच्या तयारीत उभा असायचा. हातात सांडशी धरून उभा व शरिराचे सारे स्नायू ताठरलेले असा तो कामकरी मला अजूनही आठवतो. सापासारखे फूत्कार टाकत तप्त लोखंडाची कांब पुढे आली की, तिला लगेच सांडशीत पकडून तो कामकरी तिला एका हिसक्यासरशी दुसऱ्या रोलरवर फेकून द्यायचा. हे करीत असताना या माणसाच्या अंगात राक्षसी शक्ती आहे असे वाटायचे. तो कामकरी दुसरा–तिसरा कोणी नसून, माझे बाबाच असत.

त्यांचे जेवण घेऊन मी ते काम करत असत तेथपर्यंत जायचा. मला पाहिल्यावर बाबा अर्कादीकाकांना किंवा आमच्या शेजारी



राहाणारे लुका किंवा तेथं असलेल्या दुसऱ्या एखाद्या कामकऱ्याला हाक मारायचे व आपले काम त्यांच्यावर सोपवून हात धुवायचे, तोंडावर पाण्याचा हबका मारायचे आणि तेथून बाहेर पडायचे बाहेर आल्यावर उन्हाने त्यांचे डोळे दिपल्यासारखे व्हायचे. मग ते तेथल्या खुरटलेल्या गवतावर बसून जेवण घ्यायचे. काहीही न बोलता. ते जेवण संपवायचे. कधीकधी ते आपला खरखरीत हात माझ्या डोक्यावरून फिरवून घरी सारे काही ठीक आहे ना, आई कशी आहे असे विचारायचे. त्यांचे जेवण अगदी ठराविक पद्धतीने संपायचे. 'आता चालू लाग.' असे त्यांनी म्हटले म्हणजे त्यांचे जेवण झाले असे मी समजत असे. आता यानंतर त्यांना किती काम करावे लागणार आहे याची मला कल्पना नसल्याने, मी माझ्या मित्राबरोबर उड्या मारत, कारखान्याच्या धूर ओकणाऱ्या चिमणीकडे जात असे. या चिमणीशी कारखान्याचा पसारा संपत असे.

कारखान्याचा पसारा संपत असे त्या हद्दीवर विलोची दाट वाढलेली झुडपे होती. त्या झुडपांतून वाट काढत आम्ही ड्निपरनदीकडे जात असू. आम्ही जात असू त्या जागी नदीचा किनारा खूप उंच व उभ्या चढणीचा होता. किनाऱ्याजवळच्या उंचवट्यावर उभे राहिले की, समोर विस्तीर्ण वनश्री दिसायची. खाली नदीचे फिक्कट निळे पाणी दिसायचे. नदीमध्ये हिरव्यागार झुडपांनी भरल्याने हिरवे हिरवे दिसणारे एक बेट होते आणि त्याच्या पलीकडे दृष्टी फेकल्यास सारे काही दाट निळसर धुक्याने झाकून टाकलेय असे वाटायचे. आम्हा मुलांना ती नदी, तिच्या काठची कुरणे आणि नदीच्या समोरच्या तीरावरची निकोलायेवका आणि कुरिलोवका ही गावे म्हणजे सारे जग वाटायचे!

पण शेवटी बालपण ते बालपणच. ड्निपरनदीच्या काठावर आले की, आम्हाला आनंदी आनंद वाटायचा. आम्ही उभ्या चढणीच्या उतारावरून खाली धावत धावत जायचे, काठावरच्या पाण्यात डुबकी मारायचे आणि पोहत पोहत नदीतल्या त्या बेटावर जाऊन यायचे; पण हा खेळ आम्हाला वसंतऋतूत करता येत नसे. तेव्हा बेटावरची झुडपे पाण्याखाली असण्याएवढा पूर आलेला असायचा आणि नदीचा पलीकडचा तीर दिसतसुद्धा नसे. या वेळी मला गोगोल या सुप्रसिद्ध लेखकाच्या एका वाक्याची आठवण येते. गोगोलने लिहिलेय– 'ड्निपरनदीच्या मध्यापर्यंत उडत जाईल असा पक्षी क्वचितच असेल......' मला वाटते त्यांनी ड्निपरनदीचे केलेले हे वर्णन त्यांच्या लहानपणीच्या आठवणीतून आले आहे.

आपले बालपण आठवणे हा एक अत्यंत सुखद अनुभव आहे; पण आठवणी लिहिताना जी चूक बरीचशी माणसे करतात ती चूक मला करायची नाही. आपले बालपण अतिशय सुखात गेले असे म्हणून ते आपल्या बालपणाचे वर्णन करतात, याचे कारण एकच आणि ते म्हणजे या काळात ते स्वत: बाल असतात! ¤

# दोन : इस्क्रा, ठिणग्या

आम्हा कामकऱ्यांच्या वसाहतीला 'खालची वसाहत' म्हणत असत. त्या वसाहतीच्या अकस्योनोव रस्त्यावर आमचे कुटुंब राहात असे. तेथे माझा १९ डिसेंबर १९०६ रोजी जन्म झाला. माझा जन्म झाला त्याच घरात व त्याच खोलीत माझा भाऊ याकोव व भगिनी व्हेरा यांचाही जन्म झाला.

वसाहतीतल्या रहिवाशांच्या आध्यात्मिक गरजा पुरवण्यासाठी आमच्या वसाहतीत दोन 'ऑर्थोडॉक्स' चर्चेस, एक कॅथॉलिक चर्च, एक लुथेरियन प्रार्थनाघर व एक ज्यू लोकांचे सिनेगॉग होते. ही प्रार्थनाघरे वसाहतीतल्या रहिवाशांच्या सर्व प्रकारच्या आध्यात्मिक गरजा पुरवत असत. दुसरी सांस्कृतिक केंद्रे कारखान्याच्या फाटकापाशी होती. 'स्ट्रिगुलिन मधुशाळा', 'स्मिर्नोव्हची मधुशाळा' यासारख्या किती तरी मधुशाळा व मद्याची विक्री करणारी सरकारी दुकाने रहिवाशांना सांस्कृतिक खाद्य पुरवत असत.

आमच्या वसाहतीच्या नैर्ऋत्येच्या बाजूला 'वरची कॉलनी' होती. ही कॉलनी आमच्या वस्तीहून अजिबात वेगळी होती. व्यवस्थापकीय कर्मचारी तेथल्या ऐसपैस, आरामशीर दुमजली घरात राहात असत. कारखान्याच्या निरनिराळ्या छोट्या–मोठ्या धुराड्यांतून बाहेर पडणारा धूरसुद्धा त्या कॉलनीच्या बाजूला जात नसे. धुराड्यांतून धूर बाहेर पडल्यावर त्याने कोठे जायचे ही दिशाही ठरलेली होती. तो नेहमी आमच्या कामकरी वस्तीच्याच दिशेने यायचा. मोठा झाल्यावर मग माझ्या लक्षात आले की, ड्निपर प्रदेशातली वाऱ्याची दिशा अभ्यासूनच या दोन वस्त्या बांधल्या होत्या. त्यामुळे माझ्या लहानपणी मला नेहमी धुरकटलेले आभाळ पाहायला मिळाले. धुरामुळे आमच्या घरावर काजळीचा एक थर नेहमीच बसलेला असायचा.

कामकऱ्यांना किंवा त्यांच्या मुलांना या वरच्या कॉलनीत जायला सक्त बंदी होती. तेथे संध्याकाळच्या वेळी विजेचे दिवे लागत, न्युमॅटिक टायर असलेल्या गाड्या तेथे येत आणि त्यातून महत्त्वपूर्ण वाटणारे रुबाबदार, सुसंस्कृत स्त्री–पुरुष बाहेर पडत. तेथे येणारी माणसे ही काही तरी वेगळ्याच प्रकारची वाटत. खाऊन-पिऊन तुंदिलतन दिसणारी, नीटनेटक्या राहाणीची ती माणसे वागायला उद्धट असावी असे वाटत असे. मखमली कॉलर असलेला आपल्या गणवेषाचा कोट व त्या कोटाशी शोभणारी टोपी घातलेला इंजिनियर कामकऱ्यांबरोबर कधीही हस्तांदोलन करीत नसे; पण कोणी इंजिनियर किंवा फोरमन रस्त्यात दिसला तर कामकऱ्याने डोक्यावरची टोपी उचलून त्याला योग्य तो आदरभाव दाखवावा हे अगदी अपेक्षित होते. तसा अलिखित नियमच होता म्हणा ना. म्युनिसिपल पार्कच्या जाळीदार दरवाजामागे उभे राहून, आम्ही कामकऱ्यांची मुले बागेत चालू असलेल्या बॅंडच्या तालावर फिरणारी स्वच्छ पकड्यातली माणसे पाहात असू.

**खाऊनपिऊन तुंदिलतनु दिसणारी, नीटनेटक्या राहाणीची ती माणसे...**

वर्तमान परिस्थिती समजावून घेऊन तिचे आकलन करण्यासाठी भूतकाळातली परिस्थिती कशी होती ते समजावून घेतले पाहिजे.

'कामेन्स्कोये कारखान्यात असलेली खडतर परिस्थिती इतरत्र कोठे तरी पाहायला मिळेल असे वाटत नाही.' आमच्या वस्तीमध्ये वाटलेल्या एका बोल्शेव्हिक पत्रकात म्हटले आहे, 'कोणतीही सुट्टी न घेता, वर्षभर सतत काम चालू राहते आहे असे कोठे तरी आहे का? जेवण घेण्यासाठी थोडीशीसुद्धा सुट्टी न घेता, बारा बारा तास व प्रसंगी अठरा ताससुद्धा कामकऱ्यांना काम करावे लागते असा दुसरा एखादा कारखाना आहे का? कारखान्याच्या डागडुजी-साठी व कारखान्यातील यंत्रसामुग्रीच्या समायोजनेसाठी कामकऱ्यांचा पगार कापणे हा प्रघात कोणी तरी ऐकला आहे का? आमच्या श्रमावर मिळणाऱ्या नफ्यावर, आमचे रक्तशोषण करणाऱ्या मालक-वर्गाचे समाधान होत नाही. आम्हा कामकऱ्यांना शिक्षा करण्याची एकही संधी ते सोडत नाहीत. सर्व प्रकारच्या घाणीत आम्ही काम करत असतो, आमच्या धन्यांचे खिसे भरण्यासाठी आम्ही राबतो; पण शेवटी आम्ही भुकेलेच राहातो, आमचे पोट काही भरत नाही.'

दक्षिण रशियातील कामकऱ्यांचा क्रांतिकारी इतिहास आता सर्वांना माहीत झालेला आहे. सोशल. डेमोक्रॅटिक गट (समाजवादी लोकशाही गट) हा १८८५ मध्ये प्रथमत: त्या भागात उदयाला आला. या गटाने कामेन्स्कोये शहरात बरेच विधायक कार्य केले. त्यानंतर लेनिनचे इस्क्रा (ठिणगी) हे वर्तमानपत्र आमच्या वस्ती-मध्ये नियमितपणे दिसू लागले. लेनिनच्या सांगण्यावरून आय्. के. लाल्यन्ट्स, व्ही. पी. नोगिन, व्ही. ए. शेलगुनॉव, एम. जी. त्सखा-काया, आर. एस. झेम्ल्यॅचको, व्ही. व्ही. व्होरोवस्की, पी. एन. लेपे-शिन्स्की, जी. के. ओर्जानिकिड्झे यासारख्या त्याच्या शिष्यांनी व सहकाऱ्यांनी या प्रदेशात कार्य केले. ज्यांनी जाणूनबुजून हेतुपुरस्सर क्रांतीचा मार्ग चोखाळला त्या अगणित कार्यकर्त्यांतून मला तीन बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांची नावे मुद्दाम सांगावीशी वाटतात.

श्रमजीवी कामकऱ्यांच्या उद्धाराकरिता लढा देणारी येकतेरिनो-स्लाव संस्था आयव्हॅन बाबुष्किन यांनी १८९७ मध्ये स्थापन केली. ज्यांच्याबद्दल पक्षाने अभिमान बाळगावा असा एक लोकप्रिय नेता असे लेनिननी बाबुष्किनचे वर्णन केले आहे. यासारखी माणसे देशाला मिळाली नसती तर गुलामांचा व भूदासांचा देश म्हणून रशिया ओळखला गेला असता. बाबुष्किनसारख्या लोकांच्यामुळे रशियन लोकांना पिळवणुकीपासून आपली सुटका करून घेता आली.

बाबुष्किनच्या कार्यकर्त्या सहकाऱ्यांतून ग्रिगोरी पेट्रोवस्की क्रांति-कारी चळवळीत आला, बाबुष्किन हा क्रांतिकारक कामगार-नेता. ज्या कारखान्यात टर्नर म्हणून काम करीत होता, त्या कारखान्याने, त्याचे नाव आपल्या नावात समाविष्ट करून घेतले आहे. आता तो कारखाना बाबुष्किन कारखाना म्हणून ओळखला जातो. आमच्या पक्षाचे पेट्रोवस्की एक प्रमुख पुढारी होते. त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी येरुतारिनोस्लाव या गावाचे नाव ड्नेप्रोपेट्रोवस्क असे ठेवले आहे.

निकिफोर व्हिलिनॉव्ह या तिसऱ्या नेत्याचे नाव मला या ठिकाणी घ्यावेसे वाटते दुसऱ्या दोन नेत्यांइतकी यांना प्रसिद्धी मिळाली नाही; पण तेसुद्धा एक झुंजार नेते होते व क्रांतिकारी चळवळीसाठी त्यांना आपल्या प्राणाचे मोल द्यावे लागले. १९०३ च्या उन्हाळ्यात रशियाच्या साऱ्या दक्षिण प्रांतात कामगारांच्या हरताळाची एक जबरदस्त लाट आली, तेव्हा ते येकतारिनोस्लावमधील इस्क्रा RSDLP समितीचे सभासद झाले. पक्षात ते मिखेल झावोड्स्की (झावोड म्हणजे फॅक्टरी किंवा कारखाना यावरून हे नाव तयार केले आहे.) या नावाने ओळखले जात. ते एक कुशल फिटर व सच्चे कार्यकर्ते होते.

RSDLP च्या दुसऱ्या अधिवेशनाच्या वेळी पक्षात फूट पडल्याची बातमी आमच्याकडे आली. तेव्हा आपण बोल्शेव्हिक असल्याचे व्हिलिनॉव यांनी ताबडतोब जाहीर केले. त्यांनी त्या वेळी लेनिनना या प्रश्नासंबंधी खूप लांबलचक पत्र लिहिले; पण त्या पत्राला लेनिनने पाठवलेले उत्तर त्यांच्या हाती पडण्याआधी, त्यांना कैद करून सायबेरियाला पाठवले होते; पण लेनिननी त्यांच्या पत्राचे उत्तर पाठवले होते. व्हिलिनॉवचे पत्र व त्या पत्राला लेनिननी पाठवलेले उत्तर ही दोन्ही पत्रे CPSU मार्क्सवाद–लेनिन-वाद संस्थेच्या मध्यवर्ती समितीच्या अभिलेखागारात समाविष्ट करण्यात आली आहेत. लेनिननी पाठविलेल्या पत्रावर त्यांची पत्नी क्रुपस्काया यांनी आपल्या हस्ताक्षरात '२२/१२ रोजी मिशा झावोड्स्कीला पाठवले" असे लिहिले आहे.

याशिवाय आमच्या पक्षाच्या संस्थापकाने म्हणजे लेनिननी... शहरातल्या एका साधारण कामगाराने पत्रात व्यक्त केलेले मत, त्यांनी प्रसिद्ध केलेल्या 'A letter to a comrade on our organisational talks' (संघटनात्मक कार्याबद्दल झालेल्या बोलण्यासंबंधी सहकाऱ्याला पत्र) या पुस्तिकेत समाविष्ट केले आहे. यानंतर सहा वर्षांनी पॅरिसमध्ये लेनिन व व्हिलोनॉव यांची भेट झाली तेव्हा बोलता बोलता क्रुप्स्कायांच्या तोंडून उद्गार आले की येकतारिनोस्लावमधील मिशा झावोड्स्की नावाच्या एका काम-गाराने काही चित्तवेधक पत्रे पाठवली होती. तेव्हा व्हिलोनॉवनी स्मितपूर्वक सांगितले, 'झावोड्स्की तो मीच!' त्यानंतर त्या साऱ्या पत्रांचा उलगडा झाला.

क्रांतिकारकांच्या नेहमीच्या मार्गाने व्हिलोनॉवचा प्रवास चालू होता. अटक, एकांतवासाची शिक्षा, तुरुंगवास, तुरुंगातून पलायन, पुन्हा अटक व हद्दपारी या मार्गाने ते पुढे जात होते. तुरुंगातल्या खास दमट खोल्यांत त्यांना ठेवण्यात आले. वारंवार करण्यात आलेल्या मारहाणीमुळे त्यांच्या फुफ्फुसास इजा पोचली व तरुण वयातच क्षयाची भावना झाली. तरीसुद्धा त्यांचे कार्य चालू होते व ते पक्षाचे एक प्रमुख संघटक व प्रचारक झाले. १९७५ सालच्या क्रांतीमध्ये ते कामगारप्रतिनिधींच्या समारा येथे भरलेल्या सोव्हि-यटचे अध्यक्ष होते. त्या वेळी ते फक्त बावीस वर्षांचे होते.

क्षयासारख्या जीवघेण्या दुखण्याने त्यांना घेरल्यानंतर देशत्याग करून ते काप्री बेटात राहायला गेले. तेथे त्यांना पक्षाच्या निर-निराळ्या विभागांमध्ये संघर्ष चालू असल्याचे आढळले. तो अत्यंत कठीण काळ होता आणि त्या वेळी घडत असलेल्या घटनांचा परि-णाम ध्येयाविषयी उडालेल्या वैचारिक गोंधळात दिसून आला. ऑट्झोविस्ट किंवा ईश्वरनिष्ठ 'एम्पिरिओमोनिस्ट' आणि इतर विभागांत वैचारिक गोंधळ चालू होता. वैचारिक वादविवादापेक्षा

कार्यावर जास्त भर देणाऱ्या क्रांतिकारकाला या वैचारिक गोंधळातून मार्ग काढणे फार कठीण होते. तेव्हा त्यांनी लेनिनच्या विचारांचा पाठपुरावा करण्याचे ठरवले. लेनिननी मॅक्सिम गॉर्कीना या संबंधात लिहिलेले एक पत्र अस्तित्वात आहे. त्या पत्रात त्यांनी मिखेल झावोड्स्कीबरोबर केलेल्या दीर्घ चर्चेचा उल्लेख केला आहे व कामगारवर्ग आपला स्वतःचाच पक्ष निर्माण करील असा विश्वास प्रगट केला आहे. त्या पत्रात लेनिननी म्हटले आहे– 'देशत्याग करून बाहेर गेलेल्यांच्या विचारावरून वाटते त्यापेक्षा फार लवकर कामगार आपला स्वतंत्र पक्ष निर्माण करतील असे वाटते. काही व्यक्तिविषयक घटना आणि वरवर दिसून येणाऱ्या काही गोष्टी यावरून जी कल्पना होते, त्यापेक्षा अधिक लवकर असा पक्ष निघेल याची मला खात्री आहे. मिखेलसारखी माणसेच नव्या पक्षनिर्मितीची हमी होत.'

बाबुष्किन, पेट्रोवस्की, व्हिलोनॉव व त्यासारखे हजारो कार्यकर्ते पक्षात होते त्यामुळे नव्या पक्षनिर्मितीची हमी देता येत होती. रशियाच्या कामकरीवर्गाने लेनिनचे पुढारीपण का मान्य केले व सारेजण बोल्शेव्हिक पक्षात का सामील झाले हे समजण्यासाठी पक्षाला आपले सर्वस्व समर्पित करणाऱ्या या झुंजार नेत्याबद्दल चार शब्द लिहिले आहेत. १९०५ च्या क्रांतीमध्ये ड्निपर कारखान्यातील कामकऱ्यांनी कार्याचा खूप मोठा वाटा उचलला. इव्हानोव्होव्होझ्नेसेन्स्क, पीटर्सबर्ग, मॉस्को, कीव्ह, येकतारिनोस्लाव्ह, लुगान्स्क आणि इतर मोठमोठ्या शहरांमध्ये कामगार-प्रतिनिधींच्या सोव्हिएट स्थापन झाल्यानंतर कामेन्स्कोयेतील कामगारवसाहतीत कामगार–प्रतिनिधींची सोव्हिएट स्थापन करण्यात आली. बोल्शेव्हिक सभासदांनी त्या सोव्हिएटला अगदी सुरुवातीपासून कार्याची दिशा दाखवली. कारखान्यातील आय्. एम. बेसेडॉव या वीजतंत्र्याला त्या सोव्हियटचे अध्यक्ष निवडण्यात आले. यादवी युद्ध संपल्यानंतर ते नगर सोव्हिएटचे अध्यक्ष झाले आणि त्यानंतर आमच्या कारखान्याचे संचालक झाले. त्या काळात मी त्यांना बऱ्याच वेळा भेटलो आहे.

१९०५ सालच्या पहिल्या रशियन क्रांतीचा प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतरही कामगारांचा लढा चालू राहिला. मोठ्या प्रमाणावर धरपकड आणि कामगारचळवळीचे ध्येय ठरविण्याच्या बाबतीत वैचारिक अस्थिरता येऊनही मेन्शेव्हिकना व सोशालिस्ट क्रांतिकारकांना आमच्या प्रदेशात महत्त्वाच्या जागा मिळवता आल्या नाहीत. लढ्याचे क्षेत्र वाढत गेले आणि भूमिगत कार्यकर्त्यांचे कार्य सतत चालू राहिले. सरकारी आदेशाविरुद्ध मे–दिनाचे कार्यक्रम आणि हरताळ यशस्वी करण्यात आले. उदाहरणार्थ ४ जुलै १९१२ च्या प्राव्हदाच्या अंकातल्या बातमीपत्राप्रमाणे – 'काल कामेन्स्कोये कारखान्यात राजकीय सभा घेण्याच्या आरोपाखाली बावीस लोकांना पोलिसांनी पकडले आहे.' यानंतरच्या बातमीपत्रात प्राव्हदाने कामेन्स्कोये कारखान्यात बत्तीस कामकऱ्यांना पकडल्याचे म्हटले आहे. अशा तऱ्हेने धरपकड होत असूनही कामकरीवर्गाची लढाऊवृत्ती राज्यकर्त्यांना दडपता आली नाही.

आमच्या कारखान्यात १९१६ मध्ये वाटलेल्या पत्रकात म्हटले होते– 'देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत शस्त्रधारी उठाव झाला, दुसऱ्या निकोलस झारच्या जराजीर्ण निरंकुश हुकुमशाहीचा नाश केला आणि तिच्या भग्नावशेषांच्या ऐवजी लोकशाहीवादी प्रजासत्ताकराज्य स्थापन केले तरच आम्हाला मानवसंहाराच्या भयानक कृत्यांची पुनरावृत्ती टाळता येईल...... आमच्या संघर्षात राज्यातले सारे घटक एकत्र यावेत, कारण एकी हेच बळ आहे.'

अर्थात त्या काळात मी हे किंवा ह्यासारखी पत्रके वाचत नव्हतो. तारुण्यात पदार्पण न केलेल्या अप्रगल्भ मुलांना मेदिनाच्या सभेला नेत नसत आणि कामगारचळवळीविषयीची प्रत्येक गोष्ट आम्हाला कळली होती असे नाही किंवा त्या झगड्याचे विविध पैलू समजण्याइतका आमच्या बुद्धीचा पल्लाही नव्हता; पण आता वर्णन केलेल्या वातावरणात मी वाढलो. कामगारचळवळीचे विचार आणि आकांक्षा अगदी सुरुवातीपासून माझ्या जवळपास वावरत होत्या. वडीलधाऱ्या माणसांचे बोलणे ऐकून व संप केल्यानंतरच्या कठीण परिस्थितीत ते कसे वागत ते पाहून मी ते विचार आणि आकांक्षा ग्रहण केल्या– आत्मसात केल्या. अगदी लहान वयातच कामकऱ्यांची उत्तमोत्तम वैशिष्ट्ये माझ्या लक्षात आली.

कामकरी अतिशय मेहनती असतो, त्यास अपार धीर असतो, अंगावर घेतलेल्या कामाची त्याला पुरी माहिती असते आणि ते काम नीट व्यवस्थितपणे पूर्ण करण्याची त्याला सवय असते. झारशाहीमध्ये पिळवणूक अगदी वरच्या सीमेपर्यंत पोचली असतानासुद्धा कसे तरी काम पार पाडणे त्याला पटत नव्हते. कारण त्याला आपल्या कौशल्याची पुरेपूर जाण होती आणि आपल्या स्वतःच्या कार्याबद्दल त्याच्या मनात योग्यसा अभिमान होता. मानवाने गोळा केलेली जवळजवळ सारी संपत्ती कामगाराच्या मजबूत हातांनी निर्माण केलेली आहे; पण अपेक्षित लोभाच्या आशेने त्याच्या स्वत्वावर आक्रमण केलेले नसते आणि त्याच्या ठायी दान देण्याची वृत्ती, पराक्रम आणि न्याय मिळावा अशी तीव्र इच्छा असते. तो युक्तिबाज असतो, त्याची ग्रहणशक्ती तीव्र असते, मन तरतरीत असते आणि वृत्ती विनोदी असते. तो दृढनिश्चयी, धीट आणि खरा मित्र असतो व क्षणार्धात आपल्या सहकाऱ्यांना मदत करण्यासाठी धावायची त्याची तयारी असते. कारखान्याचा भोंगा कामगारांना कामावर बोलवत असतो, एवढेच नाही तर त्या भोंग्यामुळे कामगारात एकीची भावना, परस्परांबद्दल आपुलकीची भावना आणि समाजहितसंबंधाची जाण निर्माण होते. त्यामुळे वेगवेगळ्या वयांची, वेगवेगळ्या अनुभवांतून गेलेली, भिन्न भिन्न रीतिरिवाज आणि राष्ट्रीयत्व असणारी लाखो श्रमजीवी माणसे एकत्र येऊन एक जबरदस्त, एकसंध, शक्तिशाली व खऱ्या अर्थाने क्रांतिकारक गट निर्माण होतो व तसा तो आमच्या देशात निर्माण झाला.

या श्रमजीवीवर्गात माझा जन्म झाल्याने मी त्या गटातलाच आहे आणि त्याच श्रमजीवीवर्गाच्या वातावरणात मी वाढलो आहे. अगदी रक्ताच्या नात्याने माझा त्या वर्गाशी संबंध आहे असे म्हटले तरी चालेल. माझे वडील अगदी शेवटपर्यंत कामगार राहिले. माझे

**भोंगा कामगारांना कामावर बोलवत असतो, एवढेच नाही तर . . .**

आजोबा, मामा व काका कामगार होते आणि कामावर जाण्याचे माझे वय झाल्यावर मी कारखान्यात जाऊ लागलो. माझ्यामागून माझा भाऊ, माझी वहीण, माझ्या बहिणीचे यजमान कारखान्यात कामावर जाऊ लागले. आपल्या घराजवळच्या कारखान्यात ब्रेझनेव कुटुंबाने कित्येक वर्षे कामगार म्हणून काम केले आहे. त्या कारखान्याच्या कामगारवर्गात आमची नावे अजूनही सापडतील.
¤

## तीन : वडील आणि आई

आता जरा जास्त तपशिलात जाऊन मी माझ्या कुटुंबाची माहिती देणार आहे. कारण कुटुंबाच्या एकंदर वातावरणामध्ये माणसाची वागणूक आणि त्याची जीवनाकडे पाहाण्याची दृष्टी यांची कारणे सापडतात. झारशाही दडपणुकीचा सारा भार माझ्या मातापित्यांना सहन करावा लागला आणि त्यांच्या आयुष्याचा बराचसा भाग अडचणींना तोंड देण्यात गेला; पण घरामध्ये त्यांचे संबंध अत्यंत सुखासमाधानाचे होते.वादविवादांचे प्रसंग त्यांना कधी-कधी टाळता आले नाहीत; पण आम्हा मुलांना ते प्रसंग कधी जाणवले नाहीत व रागावून त्यांनी आवाज चढवलाय असे कधी झाले नाही.

माझे वडील अबोल व कडक स्वभावाचे होते. त्यांनी आम्हा मुलांना लाडाने शेफारून ठेवले नाही आणि माझ्या आठवणीप्रमाणे त्यांनी आम्हाला कधी शिक्षाही केली नाही. आम्हाला शिक्षा करण्याचे कधी कारणच उद्भवले नाही. मातापित्याबद्दल मनात आदरबुद्धी बाळगूनच आम्ही वाढलो. माझे वडील उंच व सडसडीत होते आणि कारखान्याच्या रोलिंग मिल विभागातल्या कामगाराप्रमाणे चांगले मजबूत होते. त्यांची चेहरेपट्टीही चांगली सुरेख होती आणि त्यांचे डोळे पाहाणाराचे लक्ष वेधून घ्यायचे. आपला चेहरा नीटनेटका राखण्यासाठी ते नेहमी काळजी घेत. कामावर न जाता घरी असले तरी त्यांनी दाढी केलेली असायची. झकपक व ठाकठीक राहण्याचा ते नेहमी प्रयत्न करीत आणि त्यांना झकपक व ठाकठीक राहाणारी माणसे आवडत. त्यांच्या या सवयी आमच्यामध्ये उतरल्या आहेत. त्यांचा स्वाभिमान नेहमीच जागृत असायचा. ते कधीही लपवाछपवी करीत नसत. त्यांची वागणूक सरळ व खंबीरपणाची असल्याने मित्रमंडळीत त्यांना मान होता. ते पाहून आम्हा मुलांना फार बरे वाटायचे.

'काही करायचे तू वचन दिले असशील, तर दिलेला शब्द पाळ!' असे माझे वडील मला सांगायचे. 'मनात जर काही शंका असतील तर त्या सांगून टाक. एखादी गोष्ट करायला भीती वाटत असेल तर ती करू नकोस; पण एकदा ती केल्यावर मात्र कच खाऊ नकोस. आपण केलेली गोष्ट बरोबर आहे, याची खात्री असेल, तर शेवटपर्यंत त्या गोष्टीला धरून राहा, तिचा पाठपुरावा कर !' ते मला जे काही सांगत, त्याप्रमाणे ते वागले. त्यांचे बोलणे व कृती यात कधीही फरक आढळला नाही.

कामेन्स्कोयेमध्ये भिन्न भिन्न प्रकारचे लोक होते. कारखान्याच्या अधिकारीवर्गात फ्रेंच, बेल्जियन आणि पोलिश लोक होते. कामकऱ्यांमध्येसुद्धा कांही पोलिश लोक होते; पण बहुतेक कामकरी जवळपासच्या गावांतले म्हणजे युक्रेनियन होते; आणि त्यामध्ये येलेट्स, कुरर्क, ओरेल आणि कालुगा प्रदेशातील शेतकऱ्यांचा जास्त भरणा होता. माझे वडील कामकऱ्यांमध्ये कोणताच भेदभाव करीत नसत. म्हणजे कामकरी कोणत्या देशाहून किंवा प्रांतातून आला आहे हे न पाहाता तो कामकरी काय काम करतो यावरून ते कामगारांचा वर्ग ठरवत. माझ्या आठवणीप्रमाणे त्या दिवसांत एखाद्या पोलीस अधिकाऱ्याचा किंवा एखाद्या श्रीमंत व्यापाऱ्याचा मुलगा रशियन असला तरी परका वाटायचा आणि कामकऱ्यांची आम्ही मुले पोलिश किंवा रशियन असलो तरी आम्हा मुलांना एकमेकांबद्दल जवळीक वाटायची.

राज्यक्रांती झाल्यानंतर कारखान्यात बारा तासांच्या पाळीऐवजी आठ तासांची पाळी सुरू झाली आणि दिवसातून आठ-आठ तासांच्या तीन पाळ्यांची प्रथा सुरू झाली. तेव्हा माझ्या वडिलांना फोरमन करण्यात आले. त्यांनी रोलिंग मिलमध्ये खूप वर्षे काम केले होते आणि एक कुशल कारागीर असा त्यांचा लौकिक होता; पण फोरमनच्या या नवीन कामासाठी नुसता अनुभव असून चालत नव्हते. अंगावर सोपवलेल्या कामासंबंधी संपूर्ण माहिती असणे भाग होते. वेगवेगळ्या आकाराचे किती लोहगोळे तयार करायचे आहेत हे सांगून उघड्या भट्टीकडून किती लोखंडाची व पोलादाची मागणी करायची, त्यासाठी कोणत्या प्रकारचे पोलाद वापरायचे, भट्टीची उष्णता फुकट जाऊ नये म्हणून एकंदरीत कामावर कोणत्या प्रकारचे नियंत्रण ठेवायचे इत्यादि कामे त्यांना करावी लागत. ते करत होते त्या कामासाठी एखादा इंजिनियर असणे भाग होते; पण कित्येक वर्षांच्या अनुभवाच्या आणि नैसर्गिक बुद्धिमत्तेच्या जोरावर ते हे फोरमनचे काम करीत असत.

सोव्हियट राज्यपद्धती सुरू झाल्यानंतर, पेलिन रस्त्यावर कारखान्याने कामगारांसाठी बांधलेल्या नवीन घरांमध्ये आम्ही राहू लागलो. त्या घरात आम्हांला तळमजल्यावर दोन खोल्यांचा ब्लॉक मिळाला होता. त्या खोल्यांपैकी एक खोली माझ्या बाबांनी काकांना वापरायला दिली. काकांचे व आमच्या कुटुंबाचे नीट जमत असे आणि आम्ही आनंदात दिवस काढत होतो. खूप पाहुणे यायचे, गाणे-बजावणे व्हायचे आणि मध्यरात्रीपर्यंत गप्पागोष्टी होत. घरी आलेल्या पाहुण्याला खाऊ-पिऊ घातल्याखेरीज आई त्याला परत जाऊ देत नसे. ट्रायट्झनाया स्टेशनजवळ आमचे घर होते आणि त्या काळात तो भाग शहरापासून दूर आहे असे समजत असत. आमच्या घरामागे मोकळे आवार होते. गवत वाढलेल्या त्या आवारात अकेशियाची झाडे होती आणि झाडांवरच्या पक्ष्यांच्या गायनाने सकाळचे स्वागत व्हायचे.

माझे वडील एक कुशल कामगार म्हणून प्रसिद्ध झाले होते. सर्वसाधारणपणे समाजात त्यांना चांगला मान होता. आपल्या मुलांना शिक्षण देऊन त्यांनी मार्गी लावले होते. आम्ही सारेजण कामावर जात होतो, कौटुंबिक जबाबदाऱ्या उचलत होतो आणि वडिलांनी आता सुखासमाधानात दिवस घालवायला हरकत नाही असे वाटत होते; पण एकाएकी ते आजारी पडले आणि साठी उलटायच्या आधीच त्यांनी इहलोक सोडला !

अगदी शेवटपर्यंत माझे वडील कारखान्याच्या कामकाजात रस घेत असत. देशात आणि जगात काय चालले आहे याकडे त्यांचे सतत लक्ष असे. त्यांच्याबरोबर झालेला एक संवाद माझ्या अजून लक्षात आहे. तो संवाद कितीदा तरी माझ्या बोलण्यात आला आहे आणि तो या आठवणींच्या निमित्ताने लिहून ठेवावा असे वाटते. एके दिवशी कामावरून परत आल्यानंतर, काम करताना घडलेल्या घटना मी त्यांच्या कानावर घालू लागलो; पण त्यांचा काही तरी वेगळाच विचार चालू होता. त्यांनी माझ्या गप्पांचा ओघ थांबवला.

'ल्योन्या, जगातला सर्वांत उंच पर्वत कोणता ?'

'ॲव्हरेस्ट.'

'तो किती उंच आहे ?'

मी दचकलो. माझ्या भूगोलाच्या ज्ञानाची ते अशी परीक्षा का घेताहेत ?

'मला नक्की माहीत नाही.' मी म्हणालो; 'पण तो साधारण नऊ हजार मीटर उंच आहे......आज ही माहिती तुम्हाला कशाला पाहिजे ?'

'आणि इफेल-स्तंभ किती उंच आहे ?'

'मला वाटते तीनशे मीटर.'

बाबा बराच वेळ गप्प होते. मनातल्या मनात त्यांचे काही तरी गणित चालू होते. थोडया वेळाने ते म्हणाले, 'मला वाटते ल्योन्या, आपल्याला याहून उंच स्तंभ बांधायला सांगितला तर आपण तो बांधू शकू. आपल्याला साधारण सहाशे मीटर उंचीचा पोलादी स्तंभ बांधता येईल.'

'पण बाबा, हा स्तंभ कशासाठी बांधायचा ?'

'त्या स्तंभाच्या अगदी वरच्या टोकाला एक आडवी पट्टी टाकायची. त्या पट्टीवर आपल्याला हिटलरला फासावर चढवता येईल. मग आसपासच्या कित्येक मैलांवरच्या प्रदेशातल्या लोकांना, युद्धपिपासु लोकांचे काय होते ते समजून येईल. हिटलर हा कदाचित एकटाच युद्धपिपासु नसेल. दुसरेही काही जण त्याच्यासारखे असतील. त्यांनाही हिटलरच्या जोडीला फासावर चढवायला हरकत नाही. कशी काय आवडते तुला माझी कल्पना ?'

सारे आयुष्य त्यांनी कामकरी म्हणून काढले होते आणि त्यांच्या डोक्यात असले विचार आले होते. ते सुद्धा केव्हा ? युद्ध सुरू व्हायच्या किती तरी आधी, आमचा अंतिम विजय होण्याच्या आधी, न्यूरेम्बर्गचा खटला होण्याआधी आणि त्या खटल्यात नाझी नेत्यांना जगाच्या न्यायालयात अपराधी ठरून, शिक्षा होण्याआधी त्यांच्या डोक्यात हे विचार घोळत होते. त्यांनी मार्क्सवादाचा अभ्यास केला नव्हता; पण त्यांना कामगार-चळवळीमागचे महान सत्य जाणवले होते, फॅसिस्ट विचारपद्धतीचा धोका त्यांनी ओळखला होता आणि संभाव्य युद्धाबद्दलची साऱ्या कामकरीवर्गाची प्रतिक्रिया त्यांनी अचूक शब्दात मांडली होती.

माझी आई-नातल्या डेनिसोवना-आपल्या पतीच्या निधनानंतर खूप वर्षे मागे राहिली. नेटाने व धीराने काम करणे आणि एकदा काम हाती घेतल्यानंतर ते पुरे होईपर्यंत त्याचा पिच्छा पुरवणे हे गुण मी तिच्यापासून उचलले असे माझे कुटुंबीय म्हणत असत. आलेल्या अडचणीला हसत तोंड देणे, मनमिळाऊपणा, जवळपासच्या लोकांच्या कल्याणार्थ झटणे हेही गुण तिच्याकडूनच माझ्याकडे आले. ती अगदी शेवटपर्यंत काम करत राहिली. तिनेच आमचे पालनपोषण केले, आम्हाला खाऊपिऊ घातले, आमचे कपडेलत्ते धुतले. आम्ही आजारी पडलो तेव्हा आमची शुश्रूषा केली. या साऱ्या आठवणींमुळे त्या स्त्रीने आई म्हणून आपली कठीण व कधीही न संपणारी कर्तव्ये ज्या प्रकारे परिश्रमपूर्वक व स्वतःकडे मोठेपणा न घेता पार पाडली त्याबद्दल माझ्या मनात सदैव आदराचीच भावना राहिली आहे.

त्यानंतर झापोरोझाय, द्नेप्रोपेट्रोवस्क, मोल्डाविया आणि कझाखस्तान येथे काम करत असता, माझ्या आईला भेटण्याची एकही संधी मी सोडली नाही आणि तिच्याबद्दल माझ्या मनात मुलाला आईबद्दल असावी तशी आदराची भावना कायमची राहिली आहे. त्याहीपुढे जाऊन मी असे म्हणेन की, ज्या आईने त्याला जन्म दिला, त्याचे पालनपोषण केले, त्याला वाढवले तिच्याबद्दल जर एखाद्या माणसाच्या मनात आदरबुद्धी नसेल असा माणूस माझ्या दृष्टीने नालायक आहे, त्याबद्दल माझे मत कधीच अनुकूल राहाणार नाही. लोक आपल्या मातृभूमीवर उगाच प्रेम करीत नाहीत. जो मनुष्य आपल्या आईला विसरतो आणि तिचा त्याग करतो, तिच्यापासून दूर होतो, तो मनुष्य आपल्या मातृभूमीचा सुपुत्र असणारच नाही !

नंतर मी मॉस्कोमध्ये काम करू लागलो, तेव्हाही ती माझ्याकडे मॉस्कोला येऊन राहायला तयार नव्हती. ती पेलिन रस्त्यावरच्या आमच्या जुन्या घरात राहात होती. आपली बहीण व बहिणीचा नवरा यांच्याबरोबर ती जुन्या दोन खोल्यांच्या फ्लॅटमध्ये अपुऱ्या जागेच्या अडचणी सोसत राहिली होती. माझ्या मावशीचे यजमान तोपर्यंत इंजिनियर होऊन कारखान्यात फोरमन झाले होते. CPSV-च्या (कम्युनिस्ट पार्टी ऑफ सोव्हियट युनियनच्या) मध्यवर्ती समितीच्या चिटणिसाच्या आईने अशा दोन खोल्यांच्या जागेत राहावे याचे स्थानिक अधिकारीवर्गाला वैषम्य वाटून त्यांनी तिला मोठा, सर्व सुखसोयी असलेला मोठा फ्लॅट देऊ केला. तोपर्यंत द्नेप्रोझरझिन्स्क शहराने घरबांधणीचा मोठा कार्यक्रम हाती घेतला होता व पुरा करीत आणला होता; पण माझ्या आईने नव्या जागेत जायला साफ नकार दिला. ती आपल्या जुन्या फ्लॅटमध्येच राहात होती. हातात बाजारबॅग घेऊन ती स्वतःच बाजारहाट करायची आणि रांगेतली आपली जागा सोडून, पुढे येऊन माल घ्यायला तिला कोणी सांगितले तर ती रागवायची. ती पूर्वी जसे घर चालवायची तसेच उत्तरायुष्यातही चालवायची आणि आल्या-गेल्याचे आदरातिथ्यही पूर्वीप्रमाणेच करायची. 'नुडल्स' वापरून ती जे खाद्यपदार्थ तयार करायची, तसे चविष्ट नुडल्सयुक्त खाद्यपदार्थ मला दुसरीकडे कोठेही खायला मिळाले नाहीत. संध्याकाळी, वापरून जुने झालेले कपडे घालून, डोक्यावरून शाल घेऊन ती दरवाजाजवळच्या बाकावर अंगणात बसून शेजाऱ्यांशी गप्पागोष्टी करायची.

**लोक आपल्या मातृभूमीवर उगाच प्रेम करीत नाहीत. जो मनुष्य . . .**

ब्रेझनेवच्या आईबरोबरच्या ओळखीचा फायदा घ्यावा असे वाटणारे काही लोक होते. ते आपल्या तक्रारी आणि अर्जविनंत्या घेऊन तिच्याकडे यायचे व त्या तिने माझ्या कानांवर घालाव्या असे त्यांचे म्हणणे असायचे. आईला मध्यस्थी घातले म्हणजे आपले काम होईल असे त्यांना वाटायचे. ती अशा प्रसंगी जे चातुर्य दाखवायची व आपली सद्बुद्धी वापरून, मोठेपणाचा आव न आणता मार्ग काढायची त्याचे मला आश्चर्य वाटते. या गोष्टी तिने मला कधी आपण होऊन सांगितल्या नाहीत. त्या मला इतरांकडून कळल्या. माझ्या कारभारात हात घालायचा आपल्याला काही अधिकार नाही असे तिला वाटायचे. माझे तिच्यावर प्रेम होते, तिला मी मानत होतो याची तिला पूर्ण कल्पना होती; पण तिने सांगितले म्हणून मी कोणाला राहायला फ्लॅट मिळवून दिला तर ज्याने तिला भेटण्याचा विचारसुद्धा केला नाही किंवा ज्याला तिला भेटता आले नाही, त्याला बाजूस सारून हे काम करावे लागेल, त्यावर अन्याय होईल हे तिला माहीत होते आणि बाजूस सारल्या जाणाऱ्या त्या बिचाऱ्याला खरोखरच जागेची जास्त गरज असेल असे तिला वाटायचे. एकंदर व्यवहाराकडे बघण्याचा तिचा हा दृष्टिकोन होता. तेव्हा अशा प्रसंगी तिचे उत्तर एकच असे–'हे माझे दोन हात आहेत,' असे म्हणून ती आपले कामाने खरबरीत झालेले हात पुढे करायची. 'या हातांनी करण्यासारखे काही काम असेल ते मला सांगा, मी ते करीन; पण त्याने काय करावे, काय निर्णय घ्यावा हे मी त्याला सांगणार नाही. तेव्हा माफ करा मला !'

१९६६ साली ती माझ्याबरोबर मॉस्कोमध्ये राहायला आली. आपली नातवंडे, पतवंडे बघण्याचे भाग्य लाभण्याइतके तिला आयुष्य देवाने दिले. तिने सुखासमाधानात शांतपणे जीवनाचा उपभोग घेतला, सदसद्विवेकबुद्धीची टोचणी लागावी असे तिने काहीही केले नव्हते व केले नाही. तिच्या माहितीच्या व्यक्तींनी तिच्यावर प्रेम केले आणि आदर व्यक्त केला. तिच्या मुलावर लोकांनी व पक्षाने विश्वास व्यक्त केला त्याचा तिला अभिमान वाटायचा आणि हातातली कामे आटोपून तिच्याबरोबर चार गोष्टी करायला, तिचा प्रेमळ आवाज ऐकायला आणि तिच्या स्नेहपूर्ण, पाणीदार डोळ्यांकडे पाहायला मला फार आवडायचे.

□

## चार : विजयाचे दिवस

माझ्या मातापित्यांना लिहिता-वाचता येत होते हे मी अजूनपर्यंत सांगितले नाही. माझ्या आईला लिहिता-वाचता येत होते एवढेच नाही, तर तिला वाचनाची खूप आवड होती. तिच्या तरुणपणी, आमच्या कामगारवस्तीत अशी स्त्री क्वचितच आढळून यायची. आम्हा मुलांना योग्य शिक्षण देण्याच्या निश्चयापायी माझ्या मातापित्यांना काय श्रम पडले हे मला मोठा झाल्यानंतर समजून आले; पण आम्हा मुलांना शिकवायचेच असा त्यांचा विचार होता व तो त्यांनी अमलात आणला. वयाच्या नवव्या वर्षी मी कामेन्स्कोयेमधील ग्रामर स्कूलमध्ये दाखल झालो–म्हणजे त्या शाळेचा विद्यार्थी होण्याइतकी माझी तयारी तोपर्यंत करून घेतली होती. त्या शाळेच्या अधिकाऱ्यांनी त्या शाळेत मला प्रवेश दिला आहे यावर माझ्या आईचा विश्वास बसेना व आमचे शेजारीपाजारीही माझ्या शाळाप्रवेशाने आश्चर्यचकित झाले.

पूर्वी कामगारांच्या मुलांना 'ग्रामरस्कूल'मध्ये घेत नसत. मला त्या शाळेत प्रवेश मिळाला तेव्हा कामगारांच्या मुलांच्या प्रवेशावर बंदी नव्हती; पण प्रवेशाला मुक्तद्वार होते अशीही स्थिती नव्हती. प्रवेशासाठी दरवाजाला बारीकशी फट ठेवावी व त्या फटीतून प्रवेश करायचा तसा माझा शाळाप्रवेश होता. वाढत्या उद्योगधंद्यांच्या गरजांमुळे व रशियातील क्रांतिकारी घटनांचा परिणाम म्हणून कामगारांच्या मुलांना ग्रामरस्कूलमध्ये प्रवेश देण्याचा निर्णय घेतला गेला. तरीसुद्धा आम्हा कामगारांच्या मुलांना एक खास वेगळी प्रवेश-परीक्षा द्यावी लागे. त्या परीक्षेत उत्तम गुण मिळविणारालाच ग्रामरस्कूलमध्ये प्रवेश मिळायचा. अशा तऱ्हेने फार तर पंधरा मुलांतून एकालाच प्रवेश मिळायचा. मला प्रवेश मिळाला त्या वर्षी तर कामगारांच्या फक्त सात मुलांना ग्रामरस्कूलमध्ये दाखल होता आले शाळेतील बाकीचे सर्व विद्यार्थी वरच्या कॉलनीत राहणाऱ्या अधिकाऱ्यांची, श्रीमंत व्यापाऱ्यांची आणि कारखाना चालवणाऱ्या शासनाधिकाऱ्यांची मुले होती. आम्हाला सरकारी शिष्यवृत्तिधारक म्हणत; पण आम्हाला सरकारी शिष्यवृत्ती मिळायची असा अर्थ त्यातून कोणी काढू नये. आम्ही अभ्यासात फार उत्तम प्रगती दाखवली तर आम्ही भरलेल्या शिक्षण-शुल्कातून बराचसा भाग आम्हाला परत मिळायचा. शाळेचे शिक्षणशुल्क फारच मोठे होते. दरवर्षी चौसष्ट सुवर्णरुबल इतके ते शुल्क होते. चांगल्या चांगल्या कुशल कामगारांनासुद्धा एवढा पगार मिळत नसे. तेव्हा कितीही इच्छा असली तरी एवढे जबरदस्त शुल्क माझ्या वडिलांना सहजासहजी देता येत नव्हते.

माझ्या इतर सर्व मित्रांप्रमाणे मीसुद्धा अभ्यासात खूप प्रगती करून दाखवली. काही तरी नवीन आपण शिकतो आहोत ही कल्पना माझ्या अभ्यासाच्या मुळाशी होती. दुसरे, माझ्या शालेय प्रगतीवर बाबांचे फार बारीक लक्ष असे आणि तिसरे, अभ्यासात चांगली प्रगती न दाखवून चालण्यासारखे नव्हते. चांगली प्रगती करून न दाखवल्यास, शाळेला कायमचा रामराम ठोकावा लागेल या भीतीपायी आम्ही अभ्यास करत असू

वरच्या कॉलनीतल्या मुलांना ज्या तऱ्हेची वागणूक मिळायची ती आम्हाला मिळणाऱ्या वागणुकीहून अगदी भिन्न होती. त्यामुळे आमचा अभिमान डिवचला जायचा आणि शिक्षण घेण्याचे बौद्धिक सामर्थ्य आमच्यामध्ये आहे हे सिद्ध करायला आम्ही धडपड करीत असू. शाळेकडून चांगली वागणूक मिळते त्या श्रीमंत कुटुंबातील मुलाइतकेच बुद्धिसामर्थ्य आमच्यात आहे हे सिद्ध करण्यासाठी आमची ही धडपड असायची.

कोवालेविच नावाचे इतिहास-शिक्षक आम्हाला फार आवडत. त्यांना आपला विषय चांगला अवगत होता. त्यांनी आम्हाला झारबद्दलची माहिती दिली. तशीच राझिन आणि पुगाचेवबद्दलचीही दिली. त्यांच्याच तोंडून मी प्रथमतः डिसेंब्रिस्ट गटाने झारशाही-

विरुद्ध केलेल्या उठावाची माहिती ऐकली आणि चेर्निशेवस्की आणि हर्झेन ही नावे ऐकली. त्यांनी आम्हाला विचार करायला आणि समाजाच्या विकासाचे नियम समजावून घ्यायला शिकवले. शिक्षण संपल्यानंतर बऱ्याच वर्षांनी माझ्या लक्षात आले की, अधिकृत अभ्यासक्रमापलीकडे जाऊन त्यांनी आम्हाला बऱ्याच गोष्टी शिकवल्या. आमचा हा आवडता शिक्षक बोल्शेव्हिक आहे आणि बोल्शेव्हिक पक्षाचा गुप्त सभासद आहे याचा आम्हाला पत्तासुद्धा लागला नाही. त्यांना डेनिकिनच्या लष्कराने गोळ्या घालून ठार केले, त्यावेळी आम्हाला हे माहीत झाले. सध्या द्नेप्रोझरझिन्स्कमध्ये त्यांच्या नावाचा एक रस्ता आहे. सध्याच्या तरुण पिढीला कोवालेविच कोण होते हे कदाचित माहीत असणार नाही, म्हणून ही माहिती मी येथे दिली आहे.

१९१७ सालचा फेब्रुवारी महिना कामेनस्कोयेमध्ये खूप गाजला. दूर कोठे तरी झालेल्या खूप मोठ्या गडगडाटाचा ध्वनी कानावर यावा तसे आम्हाला कामेनस्कोयेमध्ये वाटले. सरंजामशाही कोसळली होती. युद्ध मात्र चालू राहिले होते. खाद्यपदार्थ मिळवण्यासाठी दुकानापुढच्या रांगा लांबच लांब होत्या. जमिनीची मालकी जुन्या जमीनदारांच्याच हाती होती आणि कारखाने पूर्वीप्रमाणेच धनिक कारखानदारांच्या मालकीचे होते. आमच्या वसाहतीत वरच्या कॉलनीतले लोक खालच्या कॉलनीतल्या आम्हा कामगारांकडे तुच्छतेची दृष्टी बाळगून होते– त्यांच्या मनात भविष्यकाळाबद्दल थोडीशी धाकधूक होती एवढेच. मालक मालकच राहिले होते आणि कामगार कामगारच राहिले होते.

त्या वर्षाच्या ऑक्टोबरचे दिवस माझ्या स्मृतीमध्ये कायमचे राहिले आहेत. माझ्या स्मृतिफलकावर ते जणू काय कोरले गेले आहेत असे म्हणता येईल.

एक दिवस कारखान्याचा भोंगा अनपेक्षितरीत्या खूप मोठ्याने वाजला. त्या आवाजाने जणू काय काळाचे अनेक भाग झाले होते आणि भोंग्यानंतर काळ पुढे चालू लागला होता. नेहमीच्या भोंग्यापेक्षा भोंग्याचा हा आवाज काही तरी वेगळाच होता व तो आवाज कानी पडताच आम्ही आमच्या वडीलधाऱ्या माणसापाठोपाठ कारखान्याकडे धावत सुटलो. जवळजवळ सारे शहर कारखान्याकडे येत होते. आपापली कामे तशीच अर्धवट टाकून कामगार कारखान्याबाहेर येत होते. अनिष्ट वाटावा असा गोंगाट होत होता आणि हा हा म्हणता सारा चौक विक्षुब्ध मनःस्थितीत असलेल्या लोकांनी भरला. त्यामध्ये युद्धआघाडीवरून परतलेले, मेंढ्यांच्या कातडीच्या टोप्या घातलेले जखमी सैनिक होते. मधून मधून डोक्याला रुमाल बांधलेल्या स्त्रिया दिसत होत्या; पण गर्दीतील बहुतेक लोक आमच्या लोखंड व पोलाद कारखान्यातले कामगार होते. काही तरी विजय मिळवल्याचा आनंद लोकांच्या चेहऱ्यांवर दिसत होता.

तेथेच लगेच भरलेल्या सभेत कामेनस्कोयेतील बोल्शेव्हिकांचा पुढारी एम्. आय. अर्सेनिचेव यांचे भाषण झाले. ते कारखान्याच्या बॉयलरशॉपमध्ये काम करीत असत आणि तरुण वयातच क्रांतिकारी चळवळीत भाग घेऊ लागले होते, पत्रके छापून काढत होते आणि ती वाटत होते. त्यानंतर पोलिसांची वक्रदृष्टी त्यांच्याकडे वळल्यावर ते कामेन्स्कोये सोडून पेट्रोग्राडला गेले आणि तेथे भूमिगत राहून त्यांनी खूप उपयुक्त काम केले; पण सरतेशेवटी सायबेरियाला हद्दपार होण्याची त्यांच्यावर पाळी आली. १९१७ मध्ये ते लेनिनला फिनलंड स्टेशनवर भेटले आणि तेथे लेनिननी दिलेले सुप्रसिद्ध भाषण त्यांनी ऐकले. 'क्रांती चिरायु होवो !' या शब्दांत लेनिननी आपल्या भाषणाचा शेवट केला होता. राज्यक्रांतीनंतर सुरू झालेल्या यादवी युद्धात अर्सेनिचेव श्वेत सैनिकांच्या गोळ्यांना बळी पडले. मी ज्या संस्थेत धातुकाम शिकायला सुरुवात केली, त्या संस्थेला मिखेल अर्सेनिचॉवचे नाव दिले आहे.

त्या दिवशीच्या कामेनस्कोयेच्या सभेत अर्सेनिचॉवनी श्रमिक जनतेने मिळवलेल्या महान विजयाचे वर्णन केले व सोव्हियटच्या दुसऱ्या अखिल रशियन काँग्रेसच्या अधिवेशनाची माहिती दिली आणि जगातील पहिले कामगार-शेतकरीवर्गाचे सरकार स्थापन झाल्याचे व त्या सरकारचे प्रमुख व्हॅडिमीर इलियच अल्यानॉव म्हणजे लेनिन असल्याचे जाहीर केले. लेनिनच्या नावाचा उच्चार होताच लोकांत खळबळ उडाली आणि त्यांनी मोठ्या आनंदाने व उत्साहाने विजयघोषणा केल्या. त्या सभेत लाल निशाण आकाशात फडफडू लागल्याचे पाहिल्यावर माझ्या हृदयाचे ठोके क्षणभर थांबल्यासारखे झाले, हे मला चांगले आठवते.

आपल्याआधीच्या पिढीने जे काही मिळवलेय, जे काही केलेय किंवा ज्याची रचना केलीय त्या सर्वांचा वारसा तिच्या पुढच्या पिढीला मिळतो आणि तेथून पुढची वाटचाल सुरू होते आणि विकासाची एक नवीन पातळी ती प्राप्त करून घेते. तरुण पिढीला असे कधीकधी वाटते की, सर्व महत्त्वाच्या गोष्टी मागेच घडून आल्या आहेत. राज्यक्रांती, यादवी युद्धातल्या निरनिराळ्या लढाया, रशियासारख्या महान देशाच्या समाजवादी पुनर्रचनेची वर्षे आणि महायुद्ध काळातील शौर्यकृत्ये या साऱ्या गोष्टी मागेच होऊन गेल्या आहेत असे वाटते. सध्याच्या मुलामुलींना असे वाटणे साहजिकच आहे; पण ज्या वेळी ते आपल्या वडीलधाऱ्या माणसांकडून कार्याची धुरा आपल्याकडे घेतील तेव्हा त्यांना कठीण परिस्थितींना व कसोट्यांना तोंड द्यावे लागणार आहे आणि मोठमोठी कार्ये पुरी करायची आहेत असे आढळून येईल.

राज्यक्रांती घडवून आणणारी झुंजार पिढी, पहिली पंचवार्षिक योजना पुरी करणारे कामगार आणि महायुद्धात भाग घेणारे सैनिक यांची जागा योग्य प्रकारच्या माणसांनी घेतली आहे हे पाहायला मला फार बरे वाटते. पूर्वी कधीही नव्हती अशा व्याप्तीची कामे आपण यंग कम्युनिस्ट लीगवर सोपवू शकतो आणि या जगात जे काही घडतेय त्याबद्दल त्यांना वैयक्तिक जबाबदारीची जाण आहे. त्यांच्यावर सोपवलेले प्रत्येक काम ते तारुण्यसुलभ स्फूर्तीने व गतिशीलतेने पुरे करू पाहातात. साम्यवादावर निष्ठा ठेवून ही तरुण माणसे वाढताहेत, पक्षाचे कार्य, आमच्या महान पुढाऱ्यांनी सुरू

**लेनिनच्या नावाचा उच्चार होताच लोकांत खळबळ उडाली आणि त्यांनी....**

केलेले कार्य आणि ऑक्टोबर राज्यक्रांतीचे आदर्श यांना वाहून घेण्याची त्यांची तयारी आहे.

शारदीय आकाशाच्या धूसर पार्श्वभूमीवर राज्यक्रांतीचा लाल झेंडा फडकत असल्याचे आठवले की, माझ्या मनात या साऱ्या गोष्टी येतात. आमच्या कामगारवसाहतीत आलेला तो ऑक्टोबर महिना माझ्या आठवणीतून कधीच जाणार नाही. आमच्या कारखान्याच्या नंबर एकच्या झोतभट्टीच्या अगदी वरच्या टोकावर त्या दिवशी लाल झेंडा उभारला होता.

## अद्वितीय लोखंडी स्मारक

माझ्या तारुण्यातल्या त्या युगप्रवर्तक वर्षामध्ये समाजाचे जीवन खूप मोठ्या जटिल समस्यांनी ग्रासले होते. ड्निपर कारखान्यातील कामगारांना किती तरी संकटांना तोंड द्यावे लागले. मध्यवर्ती राडाच्या सरकारची जागा जर्मन लष्कराने घेतली. त्यांची जागा पेटल्युराने घेतली आणि १९१९ च्या जानेवारी महिन्यात लाल लष्कराच्या घोडदलाने पेटल्युराच्या सैनिकांना कामेनस्कोयेमधून हाकलून दिले; पण सहा महिन्यांनंतर श्वेत सैनिक कामेनस्कोयेमध्ये घुसले आणि त्यांच्यापाठोपाठ माखनो आणि ग्रिगोऱ्येव यांच्या टोळ्या तेथे आल्या. सर्व तऱ्हेचे हलकेसलके लोक सत्तास्थानावर आले. स्वनिर्णायक युक्रेनियन, मेन्शेव्हिक, कॉन्स्टिट्यूशनल डेमोक्रॅट सोशालिस्ट रेव्होल्यूशनरी आणि अराजक माजवणारे पुढारी या सर्वांनी कामगारांच्या सभांतून आपापल्या वक्तृत्वाचे प्रदर्शन केले. त्या दिवसात आम्हाला प्रात्यक्षिकांच्या स्वरूपात राजकीय शिक्षण मिळाले आणि अगदी थोड्या कालावधीत आमच्यामध्ये परिपक्वता आली.

या ठिकाणी मला आणखी एक गोष्ट सांगावीशी वाटते. आमचे शहर एक औद्योगिककेंद्र होते व शहरातील बहुतेक लोक कामगार होते. त्यामुळे घडून आलेली क्रांती आमचीच आहे म्हणजे आम्हीच ती घडवून आणली आहे, बोल्शेव्हिक पक्ष आमचा पक्ष आहे आणि सोव्हिएटचे सामर्थ्य ही आमची शक्ती आहे असे आम्ही मानत होतो. आपण कुठचा पक्ष स्वीकारायचा हा प्रश्न ड्निपर कारखान्यातल्या कामगारापुढे मुळीच नव्हता. माझे वडील साम्यवादी पक्षाचे सभासद नव्हते– खरे म्हणजे ते कुठल्याच पक्षाचे सभासद नव्हते; पण क्रांती झाल्यापासून त्यांनी बोल्शेव्हिक पक्षाला पाठिंबा दिला. पुढे मी जेव्हा यंग कम्युनिस्ट लीगचा सभासद झालो आणि नंतर साम्यवादी पक्षाचा सभासद झालो तेव्हा माझ्या मातापित्यांनी त्या प्रसंगांचे मोठ्या आनंदाने स्वागत केले.

क्रांतीनंतरच्या अडचणीच्या काळात, यादवीयुद्ध नुकतेच संपले होते तेव्हा एक अद्वितीय लोखंडी स्मारक आमच्या कारखान्याने घडवले. ते स्मारक ड्नेप्रोझर झिन्स्कच्या एका मोठ्या चौकात अजूनही आहे. एका उंच स्तंभावर पुराणकथेतला प्रोमेथ्यॉस दाखवला आहे. प्रोमेथ्यॉसला बंधनात ठेवणाऱ्या शृंखला तुटल्या आहेत आणि त्याला सतावत राहणारा गरुडपक्षी पराभूत होऊन त्याच्या पायांशी पडला आहे असे त्या स्मारकात दाखवले आहे. हे स्मारक प्रतीकात्मक असून त्याचा अर्थ अगदी उघड आहे व माझ्या तरुणपणी प्रत्येकाला तो समजला होता. द्विशीर्ष गरुड हे प्रतीक असलेली झारशाही कशी पराभूत झाली व जीवनदायी ज्योती, लोखंड व पोलादकारखान्यातल्या कामगारांच्या हाती कशी आली हे आम्हा सर्वांच्या आठवणीत होते. ज्याने स्वर्गातून अग्नी चोरून आणला व माणसाच्या हाती कायमचा दिला त्या महापुरुषाच्या स्मरणार्थ आमच्या कामगारांनी हे धातुशिल्पातले काव्य निर्माण केले होते. ते धातुशिल्प प्रोमेथ्यॉसच्या स्मरणार्थ होते, तितकेच ते कामकरीवर्गाच्या स्मरणार्थही होते.

नंतर एक महान दिवस माझ्या जीवनात उजाडला. पंधराव्या वर्षी मी कामकरी झालो. कामेनस्कोयेच्या ग्रामरस्कूलची पुनर्रचना करण्यात आली होती आणि त्याचे नवीन नाव फर्स्ट लेबर स्कूल असे होते. त्या स्कूलचा अभ्यासक्रम पुरा केल्याचे प्रमाणपत्र घेऊन मी शालेय जीवनास रामराम ठोकला. कुटुंबाच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने मी नोकरी करणे भाग होते. लोखंड व पोलादकारखान्यात मी स्टोकर म्हणून लागलो. भट्टीत वेळोवेळी कोळसे टाकून, ती प्रज्वलित ठेवण्याचे काम माझ्याकडे होते. त्यानंतर मी फिटर म्हणून काम करू लागलो. स्टोकरचे व फिटरचे काम शिकायला मला फार वेळ लागला नाही. कारखान्याच्या वातावरणातच मी वाढलो होतो. कारखान्यातला घणघणाट, यंत्रांची घरघर, तापलेल्या लोखंडाचा उग्र वास या साऱ्या गोष्टी माझ्या परिचयाच्या होत्या व मला त्या आवडतही असत.

सरतेशेवटी माझ्या उपस्थितीसाठी कारखान्याचा भोंगा वाजण्याचा दिवस उजाडला आणि मी माझ्या वडिलांबरोबर दिवस–पाळीला गेलो व इतर कामकऱ्यांसारखा कामावर रुजू झालो. काम करून माझे अंग आंबून निघाले. श्रमाने घामाघूम झालो; पण मनातून मात्र मी आनंदलो. त्यानंतर दुसरा आनंदाचा क्षण मी त्याच दिवशी अनुभवला. घरी आल्यावर कोळसा उडून काळपट पडलेला जर्सी मी अंगातून काढला आणि माझे हातपाय धुण्यासाठी आईने माझ्या हातावर थंड पाणी ओतले. आई माझ्या वडिलांच्या हातावर ते कामावरून घरी आल्यावर पाणी ओतत असे, तसेच तिने माझ्या हातावर पाणी ओतले. मी हातपाय, तोंड धुतले आणि डोके वर केले, तो तिच्या सदय डोळ्यात मला अश्रू दिसले !

'काय झाले आई ?' मी विचारले.

'आनंदाश्रू आहेत ते, ल्योन्या, आनंदाश्रु. आता तूसुद्धा कमवायला लागलास !'

ही घटनासुद्धा मी पूर्वी केव्हा तरी सांगितली आहे; पण ती घटना मला पुन्हा सांगावीशी वाटली. माझे गुरुजन आणि कारखान्यात ज्या वयस्कर माणसांबरोबर मी काम केले, त्या साऱ्या जणांना विसरणे मला शक्य नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वांचा ठसा माझ्या स्मृतिपटलावर कायमचा उमटला आहे. माझ्या प्रथम व्यवसायाचे त्यांनी मला शिक्षण दिले, जीवन जगण्याची अवघड कला मला शिकवली आणि कामकऱ्याचे शक्तिकेंद्र आणि आत्म्याचे सौंदर्य कशात आहे हे मी त्यांच्याकडूनच शिकलो.

अशा प्रकारची विद्यापीठे कधीही स्मृतिआड जात नाहीत ! □

**( कम्युनिस्ट पार्टीमध्ये प्रवेश, लेनिनचा प्रभाव, समाजकार्याला सुरुवात, दुसरे महायुद्ध या कालखंडातील ब्रेझनेव्ह यांच्या आठवणी पुढील अंकात. )**

मुक्काम सौंदत्ती

# देवदासींची यात्रा, मोर्चा आणि चर्चा

दिनांक सोळा फेब्रुवारी, माघपौर्णिमा. सौंदत्तीच्या यल्लमादेवीच्या यात्रेचा दिवस. नवस बोलण्या–फेडण्याचा दिवस. आणि देवीला मुली सोडण्याचा दिवस गावोगावहून भरपूर लोक येतात आणि एरवी शांत असणारा यल्लमाचा डोंगर उदंऽऽ उदंऽऽ उदहच्या गजराने जिवंत होतो. ह्या यात्रेचा सोहळा तसा पाच–सहा दिवस चालतो; पण माघपौर्णिमेच्या दिवशी यात्रेचं वातावरण चांगलंच जाणवायला लागतं.

या यात्रेची सुरुवात होते डोंगराकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या कुंडापासून. या कुंडाच्या परिसरात बऱ्याच देवदासी त्यांचे जग (देवीचा मुखवटा इत्यादी असलेली मोठ्या आकाराची टोपली) घेऊन ठिकठिकाणी बसलेल्या होत्या. काही ठिकाणी बाया, पुरुष कुंडात स्नान करत होते. स्नान केलेल्यांना काही देवदासी निंबाचा पाला बांधून देत होत्या. हा ' मान ' देवदासींचाच असतो आणि या कामासाठी प्रत्येक गावच्या यात्रेकऱ्यांबरोबर त्यांच्या गावची देवदासी आणली जाते. ज्या गावाहून देवदासी आणल्या जात नाहीत त्यांच्यासाठी हे काम गुरवमंडळी करतात. या गुरवांनी कुंडाच्या परिसरात तंबूच उभारलेले होते आणि ज्या कामासाठी देवदासी सव्वा रुपया दक्षिणा घेतात त्याच निंब बांधण्याच्या कामासाठी हे गुरव अडीच रुपये उपटतात !

स्नान केल्यामुळे ओलेकिच्च अंग, कपडे, चेहेऱ्यावर ओघळणाऱ्या केसांच्या बटा, कुडकुडणारं शरीर आणि त्यावर निंबाचा पाला बांधलेल्या या बाया दिसतातही वेगळ्या. काही बायांना विचारलं, ' निंब कशासाठी बांधलाय ?', तर ' नवस फेडण्यासाठी ' एवढंच उत्तर देण्यात आलं. या निंब बांधण्यात चार–पाच वर्षांच्या मुलामुलींपासून अगदी वृद्ध बायांचा आणि पुरुषांचाही समावेश होता.

देवीचे जग घेऊन बसलेल्या एका देवदासीला विचारलं, ' तुला देवाला का सोडलं ?'

' जट आली म्हणून. '

' जटेचं ओझं होत नाही का ?'

' देवीची जट, त्याचं कसलं आलंय ओझं !' तिनं उत्तर दिलं.

' जट साफ करता येते हे माहीत आहे का ?'

' जट साफ करता येते हे माहीत आहे आणि देवीला सोडायचं नाही हा कायदाबी माहीत आहे; पण मला समजण्याअगोदरच मला सोडलं होतं, ' तिनं सांगितलं.

निंब नेसून ज्याप्रमाणे नवस फेडला जातो, त्याचप्रमाणे नवस फेडण्याचा दुसरा प्रकार म्हणजे दंडवत घालणे. सचैल स्नान करून स्त्री–पुरुष दंडवत घालत घालत देवीच्या डोंगरावरून मंदिरापर्यंत जातात. वरून उन्हाचा चटका, चढणीचा रस्ता, यामुळं एखाद्या तासाचं अंतर कापायला तीन–चार तास तरी लागतात. शेवटच्या टप्प्यात तर ती बाई–पुरुष स्वतःचं स्वतः उभंही राहू शकत नाहीत. इतरांनी त्यांना हात द्यावा लागतो. तरी नवस पुरा केला जातोच !

देवीचा जग डोक्यावर असलेली देवदासी आणि तिच्यामागं तिच्या गावचे यात्रेकरी अशी यात्रा देवीच्या मंदिराकडे जाते. उदंऽऽ उदंऽऽ च्या गजरातच यात्रा डोंगर चढते. डोंगर उतरणाऱ्या यात्रेकरूंची गर्दी, त्यातच रस्त्याच्या कडेने बसलेले भिकारी, मधूनच एखाद्या महारोगी भिकाऱ्याचा पायाशी येणारा हात यांना चुकवत यात्रा जेव्हा डोंगरावर पोहोचते तेव्हा तिथं माणसांच्या गर्दीबरोबरच दुसरीही स्टॉल्सची गर्दी होती. भंडारा, बुक्का, गुलाल इत्यादींची छोटी दुकाने, मिठाईची दुकाने, रसवंतीगृहे, आइस्क्रीमच्या गाड्या यांची गर्दी ! यांच्या गर्दीतून आलेले देवीचे यात्रेकरी गर्दीतच कुठल्या तरी कोपऱ्यात देवीचा पुरणाचा नैवेद्य बनवतात व देवीचे दर्शन घेतात.

□

माघ–पौर्णिमेच्या या यात्रेच्या दिवशी बरेच यात्रेकरी गावोगावहून येतात. त्यामुळे या दिवसाचा धागा पकडून म. फुले समता प्रतिष्ठान आणि श्रीमान गोविंदरावजी कोरगावकर धर्मादाय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने देवदासीप्रथेविरुद्ध मोर्चा–निदर्शनांचा कार्यक्रम आयोजित केला होता. हा मोर्चा दिनांक पंधरा–सोळा फेब्रुवारी रोजी झालेल्या शिबिराचाच एक भाग होता.

मोर्चाला सुरुवात सौंदत्ती गावातून केली. कर्नाटका मुलुख असल्यामुळे घोषणा प्रामुख्याने कानडीतून दिल्या जात. ' बिडवॅडरप्पा बिडवॅडगे देवरगीमक्ळा बिडवॅडरो



लिंब कशासाठी बांधायचा ? – नवस फेडण्यासाठी !



ही मुलं देवदासींची आहेत एवढाच त्यांचा दोष !

(सोडू नका रे सोडू नका, देवाला मुले सोडू नका !), ' देवदासी पद्धत्तीने, धिक्कारा-धिक्कारा (देवदासी पद्धतीचा धिक्कार असो !) ' अशा कानडी घोषणा, तर ' देव मुले मागत नाही, देवाला मुले सोडू नका !' अशा प्रकारच्या मराठी घोषणा देत देत सौंदत्ती गावातून डोंगराकडे जात असताना गावातले लोक कुतूहलाने बघत होते. या लोकांना देवदासी–प्रथा–निर्मूलनासंबंधी पत्रके वाटली. कुंडापाशी गेल्यावर तर घोषणांना जोर आला होता. काही देवदासी धावत धावत मोर्चाकडे आल्या होत्या. त्यांना हा प्रकार नवीन होता. या भागातून माघपौर्णिमेच्या दिवशी देवदासी–प्रथेविरुद्धचा या प्रकारचा मोर्चा प्रथमच निघाला होता. पत्रके वाटताना ' इदं ओदरी (हे वाचा) हे पाठ केलेले शब्द उच्चारले जात. काहींच्या चेहेऱ्यावरचे वाचलेले पटल्यासारख तर काहींचे कुतूहलाचे भाव समाधानकारक होते.

मोर्चा डोंगराच्या जसजसा जवळ आला तसतशा वाढत्या गर्दीबरोबर घोषणाही जोरदार होत होत्या. देवीचा जग डोक्यावर घेऊन जाणारा एक यात्रेकरी मुलगाही मोर्चात सामील होऊन घोषणा देत होता.

देवीच्या नैवेद्यासाठी एखाद्या कोपऱ्यात चाललेला स्वयंपाक, कुठे घुमणारे देवदासी–जोगते, यांच्यातून वाट काढत देवीच्या देवळापाशी मोर्चाची सांगता झाली.

## पत्रकार–कार्यकर्ते

मोर्चाप्रमाणेच शिबिराचा दुसरा भाग होता चर्चेचा. या चर्चेत देवदासीप्रथेचा इतिहास, देवदासींचे पुनर्वसन, देवदासी-प्रथा-निर्मूलन यासाठी प्रयत्न आणि त्यातील अडचणी या विषयांवर प्रामुख्याने भर देण्यात आला. या चर्चेत पुणे, मुंबई, कोल्हापूर, गारगोटी, सातारा येथून आलेल्या कार्यकर्त्यांबरोबरच गडहिंग्लजहून आलेल्या गौराबाई, मैनाबाई, चंदाबाई, राणूबाई आणि यल्लव्वाबाई या पाच देवदासीही होत्या.

अपुरा वेळ, उत्साही कार्यकर्ते आणि विषयाची व्यापक व्याप्ती यामुळे उत्कृष्ट संयोजनाशिवाय चर्चा सुरात होणे अशक्य असते; पण या चर्चेला सूर गवसला आणि चर्चा बरीच कृतीच्या पातळीवर झाली.

देवदासी–प्रथा–निर्मूलनासाठी सध्याच्या देवदासींचे पुनर्वसन करणेही आवश्यक आहे आणि या पुनर्वसनासाठी देवदासींना आर्थिक स्वावलंबनासाठी काही रोजगार मिळवून देणेही आवश्यक आहे. या निमित्ताने पुढे आलेला मुद्दा महत्त्वाचा वाटला. तो असा की, देवदासींना रोजगार किंवा कुठलेही काम द्यायचे तर त्यांना शारीरिक कष्टाची सवय नसते. दुसरे म्हणजे रोजगारामुळे मिळणारी आठ-नऊ रुपये रक्कम देवदासी जोगवा मागून सहज मिळवू शकते. शिवाय देवदासी म्हणून यात्रेच्या वेळी मिळणारा मान, अखंड सौभाग्यवती म्हणून लग्नकार्याच्या वेळी मिळणारा मान याचं अप्रूप ! या कारणांमुळे सगळ्या नाही तरी बऱ्याच देवदासींची वृत्ती काम न करण्याचीच असते. चर्चेत सामील झालेल्या वृद्ध गौराबाईनेही हेच मत मांडले; पण चंदाबाई, राणूबाई, मैनाबाई यासारख्या तरुण देवदासींनी मात्र रोजगाराची शाश्वती असेल तर कुठलेही काम करायची तयारी दर्शविली. वृद्ध देवदासींना शारीरिक कष्टाचे काम शक्य नसते. त्यामुळे त्यांना पेन्शन दिली जावी ही या शिबिरात केली गेलेली मागणीही या दृष्टीने योग्य वाटली.

देवदासी प्रश्नाचा एकंदर आवाका ध्यानात येण्यासाठी देवदासींची एकूण संख्या, वयोगट, जात, काम करण्याची तयारी इ. ची नीट माहिती झाली तर या प्रश्नाच्या सोडवणुकीच्या दृष्टीने निश्चित आराखडा मांडणे सुलभ होईल व त्या दृष्टीने शासनाने देवदासी आयोग नेमण्याच्या मागणीचाही गंभीरपणे विचार केला पाहिजे.

चर्चेत एक मुद्दा प्रकर्षाने पुढे आला. तो मुद्दा म्हणजे पुण्या-मुंबईहून लोक येतात आणि जातात; परंतु याचा त्रास स्थानिक कार्यकर्त्यांना सोसावा लागतो आणि हे 'लोक' म्हणजे प्रामुख्याने प्रसिद्धी माध्यमाशी निगडित पत्रकार. काही पत्रकार येतात, देवदासींच्या मुलाखती घेतात आणि त्यांच्या अपेक्षा उंचावून ठेवतात. शहरात जाऊन या प्रश्नावर मनाला भिडेलसं लिखाण करतात आणि या प्रश्नाचे भांडवल करून स्वतः सामाजिक जाणीव असलेले 'भांडवलदार' होतात. लोक हे वाचतात. वाहवा करतात; पण देवदासींच्याबाबत काहीच फरक पडत नाही. उलट यामुळे त्यांचा अपेक्षाभंग होतो व हा अपेक्षाभंग स्थानिक कार्यकर्त्यांच्या कामात डोंगर उभे करतो. हा आक्षेप बऱ्याच अंशी सत्य आहे आणि या प्रसिद्धीमुळे म्हणा किंवा आणखी कशामुळे म्हणा देवाशी लग्न लावण्याचे प्रकार आता उघडपणे होत नाहीत, त्यामुळे याविरुद्ध कारवाई करणेही अवघड होऊन बसले आहे.

या चर्चेअंती काही योजना पुढे आल्या. एक म्हणजे जनजागरणाचे उद्दिष्ट असलेले देवदासी पुनर्वसन केंद्र उभारणे. या प्रथेच्या मुळाशी असलेली अंधश्रद्धा दूर करण्यासाठी शिक्षणप्रबोधन करणे, सरकारी सोयी-सवलतींची जास्तीत जास्त माहिती व वापर करणे. यासाठी समाजकल्याणखात्याच्या एका अधिकाऱ्यालाही शिबिरात बोलावण्यात आले होते व त्यांनी या प्रकारच्या योजनांची माहिती सांगितली. या उपाययोजना व्यवहारात किती लवकरात लवकर उतरतील तितके चांगले.

चर्चेत इतर कार्यकर्त्यांचा सहभाग बऱ्याच प्रमाणावर होता आणि या चर्चेअंती त्यांना बरीच स्पष्टता आल्याचे जाणवले. कारण देवदासी प्रश्न कोणाही संवेदनाक्षम माणसाला भिडणारा आहे. या प्रथेचे समर्थक फारच थोडे. त्यामुळे या प्रथेच्या निर्मूलनासाठी उभे केले जाणारे प्रयत्न बऱ्याचदा मानवतेपोटी, दयाभावनेने केले जाण्याची शक्यता असते आणि अशा प्रकारच्या कामाचा परिवर्तनासाठी उपयोग नसतो. त्यामुळे इथे आलेल्या कार्यकर्त्यांत या चर्चेमुळे देवदासी-प्रश्नाबद्दलचा दृष्टिकोन निर्माण झाला तरी हा बदल स्वागतार्ह म्हणावा लागेल.

—विद्या कुलकर्णी

# भयंकरच 'मिझरेबल' हं!...

'देवदासींचा प्रॉब्लेम स्टडी करायला जाणार आहेस? आयला, मजा आहे!'

'देवदासींना काय प्रॉब्लेम असणार? अरे, त्यांच्याकडे जाणाऱ्यांना त्याच प्रॉब्लेम निर्माण करून ठेवत असतील! ह्यॅः ह्यॅः ह्यॅ!'

□

'मी सावित्री. मी पाच वर्षांची असताना मला देवदासी केलंय...'

'सावित्रीबाई आणि एक सांगा, देवदासी केलंय म्हणजे काय केलंय? आणि कुणी केलंय?'

'अहो, भक्तांनी केलंय...'

'भक्त म्हणजे कोण?'

'देवी यल्लमाचे भक्त.'

'अच्छा, म्हणजे देवी यल्लमाचे भक्त म्हणवून घेणाऱ्यांनी तुम्हाला देवदासी केलंय. म्हणजे देवी यल्लमा त्याला जबाबदार नाही ना?'

'कोन म्हनतंय? ती का सांगायला गेलीय कुनाला, दारोदारी भीक माग आन् म्हनेल त्या मानसासंग झोप म्हनून?'

'मानूस, म्हणजे बाई यल्लमा देवीचा 'भक्त' म्हणालात ना तुम्ही! बरं, एक सांगा, ह्या भक्तांचं म्हणणं तुम्ही का ऐकलंत?'

'म्या कुठं ऐकलंय? माज्या आईनं मला देवदासी केलंय. पाच वर्षांची असताना.'

'पण आईनं का भक्ताचं म्हणणं ऐकलं?'

'यक तर ती बी देवदासीच व्हती, आन दुसरं म्हणजे तिची परिस्थिती लई 'डेंजर' मधे व्हती, म्हनून तिनं गावातल्या भक्तलोकांचं म्हननं ऐकलं!'

'बरं, तुमचं गाव कोणचं?'

'हेच की खडकलाट.'

'आणि आईचं गाव?'

'ती तिकडं टिप्पणकोट, ईश्वरकोटकडची. आई जलमभर तिकडं भीक मागत राहिली आन् मी हितं!'

'अहो पण बाई, ज्या 'भक्तांनी' तुमच्या आईला तुम्हाला देवदासी करायला लावलं, त्यांनी तुमची जबाबदारी घेतली नाही?'

'घेत्यात की—भीक घालतात ना!'

'उद्या बळजबरीनं झोपायला लावतात म्हणजे जबाबदारी घेतात असं म्हणाल तुम्ही?'

'खरंच हाय त्ये!'

'अहो, खरं काय बाई? उद्या पोरं झाली तर त्यांची जबाबदारी घेतात का?'

'छ्याः त्ये देवदासीचं पाप! ते कसं बरं जबाबदारी घेतील?'

'बरोबर आहे. 'भक्त' ना ते! बरं मग तुम्ही काय करता?' म्हणजे पोरं-बाळं झाल्यावर?'

'काय नाय, पोरगी झाली तर देवदासी करून सोडते, पोरं फिरतात उघडधावर!'

'का? पोरांना शाळेत नाही घालत?'

'काई बी इचारता साहेब तुम्ही!'

'बरं, आता मुलीला देवदासी म्हणून सोडता म्हणजे नक्की काय करता?'

'ह्येच, यल्लमादेवीच्या दर्शनाला न्यायचं, भंडार, खारीक, खोबरं अंगावरती टाकून देवीभोवती पाच वेळा टाकायचं आन् यल्लमाला वाहून टाकायचं!'

'बरं बाई, एक सांगा, तुमच्या आईनं 'भक्तांच्या' सांगण्यावरून तुम्हाला देवदासी केली. तुम्ही काय आणि कसं आयुष्य जगलात हे मी नाही विचारत; पण आता भक्तांच्या सांगण्यावरून तुम्ही तुमच्या पोरीला देवदासी करणार का?'

'नाई!'

'का? वाईट काय?'

'चांगलं काय? आधार नाय, मालक काय दोन दिवस राहतात अन् निगून जात्यात. जवानी काय कसीबी जाते. पोरंबाळं झाल्यावर देवदासीनं जगावं कसं?'

'मालक म्हणजे कोण ?'

'हे काय– समोरच बसले हाईत की !'

'आ ? आपण ह्या देवदासीचे...?'

'मी ठेवलीय तिला !'

'असं होय ! बरं, मग तुमचं लग्न ?'

'ते बी झालंय. ह्या दोगी एक दुसऱ्याला भेटतात की !'

'नाही म्हणजे तिला ह्याबाबत काही...'

'ती कशाला बोंबलेल ? तिच्या पोराबाळांना हे समदं काई घेत्यात, कपडं, साळा, लगीन, खाणं-पिणं.'

'आणि तुमच्या मुलांना ?'

'ती आमची जबाबदारी.'

'बरं मालक, आता तुम्ही इथं हजरच आहात म्हणून विचारतो, उद्या ह्या बाईचं पोट भरत नाही, पोरांची काळजी घेणार कुणी नाही म्हणून हिनं वेश्याव्यवसाय केला तर तुम्हाला चालेल का ? थोडक्यात, ही धंद्याला लागली तर 'भक्तांना' चालतं का ?'

¤

'हं. बाई, तुमचं गाव कोणतं ?'

'टीप्पाणकोट.'

'किती वर्षं झाली तुम्हाला देवदासी होऊन ?'

'पाचव्या वर्षापासून मला देवदासी केलंय बगा.'

'पोरं-बाळं ?'

'हाईत की !'

'बरं, तुमचा भक्त तुमच्या पोराबाळांची काळजी घेतो का ?'

'आता मी काय एकटी देवदासी हाय त्याची ?'

'म्हणजे ?'

'अहो, त्यांच्या चार–पाच देवदास्या हाईत. जसं ऐश्वर्य तितक्या देवदास्या ठेवितात हे भक्त.'

'अच्छा, म्हणजे देवदासी ठेवणं हे ऐश्वर्याचं लक्षण आहे तर !'

'बरं, पोरा–बाळांचं सोडा, तुम्हाला तरी काही साडी-चोळी, पैसे, दागिने...'

'ते सारं करायला त्यांची हक्काची बायको असते की ! आमचा तेच्यावर काई बी हक्क नाय बगा. हे सारे आमच्या जवानीचे लुटेरे आहेत. दोन दिवस नाटक करतात आणि मग देत्यात सोडून !'

'बरं बाई, देवीला वाहिलेली ही देवदासी लग्न करू शकते का ?'

'नाही, तिला कुणी करून घेत नाई, कुणी तिच्याशी लग्न करू देत नाही. कुठं झालं तर रजिस्टर लगीन व्हतं.'

'बाई, मला एक सांगा, तुम्हाला देवदासी होताना आपण काही फार मोठं पुण्य करीत आहोत, हा आपला मान आहे, देवीचा हा आशीर्वाद आहे असं वाटलं होतं का ? आणि आता आठवतंय का ?'

'खरं सांगू का सायब, चार-चार दिवस जेवायला नसायचं, आजारी पडलं तर औषध नसायचं, पदर आला तरी अंगावर कापड नाइ अशी हालत !'

'हो. मग देवदासी झाल्यावर हे सारं मिळालं ?'

¤

'बाई, तुमच्या मुलीचं वय काय ?'

'धा वरीस.'

'तिला सारे देवदासीची मुलगी म्हणूनच ओळखतात ?'

'व्हय.'

'आणि तुम्ही तिला देवदासी करायचं नाही असं ठरवलंय ?'

'व्हय.'

'पण करणार नाही म्हणजे दुसरं काय करणार ?'

'लगीन लावून देणार !'

'कोण तिच्याशी लग्न करणार ?'

'.......................'

'बरं, किती खर्च येतो लग्नाला ?'

'दोन–तीन हजार रुपये.'

'कुठून आणता हे पैसे ?'

'कर्ज काढतो.

'का ? ज्यानं ठेवली असते तो नाही देत ?

'त्याला तेच्या पोरी असतात की लगीन लावायला.'

'बरं, दुसरं असं की समजा, तुमच्या पोरीचं लगीन झालं तर तो तिला लग्नाची बायको म्हणून वागवतो का पुन्हा देवदासी म्हणूनच ?'

'आता मानसाचं काय सांगता येतं का ?

'ज्या भक्तांकडं तुम्ही जाता ते तुमच्यावर जबरदस्ती करतात ? अत्याचार करतात ?'

'हो, काई काई जागी ! देवदासी जवान असली तर !'

'मग देवदासी काय करते अशा वेळी ? बोंब ठोकते ?'

'बोंब कशी ठोकल ? मोठे लोक हाइत. नाय म्हटलं तर काय करतील ह्या भीतीनं हो म्हणते !'

'त्याचे पैसे देतात का ?'

'घेत्यात की, वीस रुपये; पण इज्जत जाते ना ?'

'कोल्हापूर–मुंबईकडे धंद्याला नेतात का ?'

'आज–काल नाही नेत. आमची एकी झालीय !'

¤

'तुमचं नाव ?'

'माला.'

'तुम्हाला जोगतिण म्हणून का सोडलं ?'

'माज्या डोस्कीत किडं पडलं व्हतं म्हनून वयात आल्यावर 'झुलवा' लावून दिला.'

'झुलवा' लावून दिला म्हणजे काय केलं ?'

'नारळासंग लगीन लावून दिलं.'

'अच्छा, म्हणजे तुमच्या गळयातील मंगळसूत्र हे नारळाशी लग्न लावून दिलं म्हणून का ?'

'व्हय.'

'बरं मग पुढं ?'

'च्यार वर्षांनी मुलं झाली.'

'आऽ बरं बरं. असो. किती मुलं झाली?'

'दोन.'

'काय करतात ?'

'खुल्लीच हाईत.'

'बरं मग 'झुलवा' लावून दिलेला नवरा काय करतोय ?'

'त्याच्यावर आमचा हक्क थोडाच ? तो असो वा नसो !'

'त्याचं लग्न झालंय ?'

'होय. त्याला बायको, दोन पोरं हाइत.'

'मग तो तुमच्याकडं येतो का ?'

'येतो, आठवन आली तर !'

'बरं तुम्ही तुमच्या मुलीला देवदासी म्हणून सोडणार का ?'

'सोडनार.'

'का सोडनार ?'

'सरकारी देव आहे. खातं सरकारचं

आहे. सोडावं लागनार, पोटासाठी.'

'नाही म्हणजे जर तुमच्या मुलीला जोगतिण म्हणून सोडलं नाही तर देवीचा कोप होईल असं वाटतं का तुम्हाला ?'

'हो. काही जणांचा विश्वास आहे.'

'बरं. तुमचं सोडा; पण ज्यांना आपल्या मुलीला देवदासी करायचं नाही अशा मुलींची लग्नं कितव्या वर्षी होतात ?'

'हे काय ? ते दहा–बारा वर्षाची असताना !'

¤

'ताराबाई, तुमचं वय काय आता ?'

'आता सत्तर झालं की.'

'तुम्हाला तुमच्या आयुष्यात देवदासी म्हणून जो त्रास सहन करावा लागला त्याचा दोष तुम्ही देवदासी पद्धतीला देता की, आई–वडिलांना ?'

'आई–वडिलांना. त्यांनी आम्हाला देवदासी म्हणून सोडलं नसतं तर असं हाल झाले नसते.'

'बरं, तुमच्या आई–वडिलांनी तुम्हाला जोगतिण म्हणून का सोडलं ?'

'आमच्या घरच्या नऊ म्हशी नऊ दिवसात मेल्या. मला जट आली व्हती.'

'जट आली होती म्हणजे काय ?'

'हे केस बगा की !'

'अहो बाई, महिनामहिना केस धुतले नाइत तर कुणाला पण जट येईल.'

'पण मला जट आल्यामुळं जोगतिण म्हणून सोडलं.'

'जट आल्यामुळं की म्हशी मरत होत्या म्हणून ? बरं, गावात कुणी गुरांचा डॉक्टर नव्हता का ?'

'नव्हता.'

'बरं, तुम्हाला जोगतिण म्हणून सोडल्यावर म्हशी मरायच्या थांबल्या का ?'

'कुठं काय, अजून पडझड चालूच आहे!'

'किती खर्च आला जोगतिण करायला?'

'पंचवीस–तीस रुपये दिले गुरवाला.'

'म्हणजे त्या काळी ! आता जास्त पडत असतील ?'

'तुमी लगीन केलंत ?'

'नाई.'

'मग आता वयाच्या सत्तराव्या वर्षी तुम्हाला तुमचं असं कोण ?'

'....................'

'काही शिल्लक ? जमीन ? पैसा ?

'....................'

¤

'बाई ह्या मुलीचं वय काय ?'

'नऊ वर्स'

'हिची जट वाढलीय. कापली का नाहीत ?'

'हिची आई जट कापायला गेली अन् तिची बोटं वाळली. तवा भक्त लोक म्हणाले–'

'थांबा, जट कापायला गेली म्हणून बोटं वाळली असं तुमचं म्हणणं ! डॉक्टरकडे नेली का हिच्या आईला ?'

'कसं नेनार? भक्तमंडळी नाराज झाली असती !'

'बरं, हिला देवीला सोडल्यावर हिच्या आईची बोटं बरी झाली का ?'

'व्हय झाली की !'

'..................'

'बरं, देवीला सोडायला जो काही खर्च येतो, त्या कर्जावर व्याज किती देता ?'

'महिन्याला पाच रुपये.'

'म्हणजे वर्षाला साठ टक्के व्याज देता ! बरं, दरवर्षी देवीला न्यावं लागतं का ?'

'व्हय.'

'म्हणजे दरवर्षी शंभर–दोनशे रुपये कर्ज काढता ?'

'पोरा–बाळांच्या शिक्षणाला कर्ज मागितलं तर 'भक्त' देतील का ?'

'..................'

¤

'नमस्कार बाई, तुम्ही निपाणीत वेश्या–व्यवसाय करता, हे मला इथल्या काही महिला कार्यकर्त्यांनी सांगितलंय, अर्थात केवळ हीच तुमची ओळख नाही; पण मागे निपाणीत प्रा. सुभाष जोशींनी भरविलेल्या पहिल्या देवदासी परिषदेत तुम्ही भर सभेत हुंबरडा फोडून तुमची दुःखं सर्वांना जाहीरपणे सांगितलीत व सर्वांच्या डोळ्यांना पाणी आणलंत, असं कळलं म्हणून आज तुम्हाला सुभाष जोशींच्या घरीच मुलाखतीसाठी बोलवलंय.'

'नाई साहेब, मला काल संध्याताईंचा निरोप कळला; पन् सध्याकाळी धंद्याचा टाइम असतो ना !'

'हो. मलाही संध्याताई म्हणाल्या की, तिला संध्याकाळी पाचच्या आतच बोलवा' म्हणून आता तुम्हाला बोलवलंय.'

'साहेब, तुमी तिकडं जुन्या मुंबईकडचं का ?'

'हो.'

'यक इचारू का? यकांद्या रांडेला तुमच्या पुन्या–मुंबईकडं कुनी असं घरात घेतलं असतं का ?'

'....................'

'आज आमचे सर आन वहिनीबाई संध्याताई ह्यांचं निपाणीतलं घर, म्हणजे माज्यासारख्या रांडेलासुद्धा सोत्तावं घर वाटावा असा आसरा वाटतो. तुमच्या मुंबई-पुन्याकडं आसं येकबी घर भेटल का ?'

'ते सोडा बाई, घर तर राहू दे; पण असा सुभाष जोशीसुद्धा भेटणार नाही ! बरं आता तुम्ही विषयच काढला म्हणून विचारतो, असं काय केलंय हो ह्या सुभाष जोशींनी इथल्या देवदासींबाबत ?'

'आता मला काय बोलायला तोंड नाय बगा; पन ज्यानं ज्यानं ह्यांचं भाषन ऐकलं, सरांचं म्हननं ऐकलं, त्यांचं कल्यान झालं बगा !'

'अहो, पण परवा एका भाषणात तर सुभाष जोशी सांगत होते की, तुम्हा देवदासींचं जितकं भलं त्या स्वतः करू शकतात तितकं कुणीही दुसरं करू शकत नाही म्हणून !'

'आता ते बी खरं हाय ना, अहो, इथं निपानीत तुमच्या मुंबई–पुन्याकडली मानसं येतात. सर्कशीतल्या वाघ–घोड्यावानी *आमच्याकडं बघतात. आमच्यापैकी बोलना–*ऱ्यांना जत्रेतल्या वस्तूप्रमानं मुंबई–पुन्याकडं मिरवून आनतात आन् पुन्हा ह्याओत तिथंच परत !'

'अच्छा, आणि सुभाष जोशी काय करतात ?'

'आता तुमी बघताहात की, दोन–तीन दीस निपाणीच्या परिसरात हिंडताहात, आता ज्या ज्या बायांनी तुम्हाला आमी आमच्या पोरीला देवदासी करणार नाय म्हणून सांगितलं ते कुनाच्या सांगण्यापायी ? हे सर आन् संध्याताई ! सारे गावोगाव हिंडतायेत कित्येक वर्स, नाय तर ह्ये भाडखाऊ 'भक्त' का कुनाला श्यानपना शिकवायला गेले असते ?'

'अगदी खरं आहे बाई तुमचं म्हणणं बरं, मला आता सांगा, तुम्ही कशापायी ह्या वेश्याधंद्यात पडलाय? अगदी पहिल्यापासून सांगा!'

'आमच्या बानं यल्लमादेवीची थट्टा केली, त्यापायी तेची बोटं झडली.'

'थांबा. बोटं झडली म्हणजे काय?'

'म्हनजे महारोग की काय म्हनतात त्यो......'

'हो, म्हणजे महारोगामुळं बोटं झडली. यल्लमादेवीची थट्टा केली म्हणून नाही, खरं ना?'

'पण माज्या आईनं, मला जोगतिण केल्यावर बाची बोटं परत आली की...'

'......................'

बरं, तुम्हाला भाऊ–बहीण किती?

'आमी दोगी बहिनीच.'

'दुसरी बहीण तुमच्यापेक्षा लहान का मोठी?'

'मोठी.'

'बरं मग तिला का नाही सोडली देवीला?'

'त्याच काय हाय......का............ ...आता......काय सांगावं बगा......'

'हे बघा बाई, असं रडू नका बघू, शांत व्हा, मग सांगा.'..... ......

'आता काय लपवायचं बगा......काय की आमची आई वेश्याधंद्यातली. माजी बहीन तिची लग्नाची मुलगी.'

'अच्छा, म्हणजे ज्या बाची बोटं झडली तो तुमचा बाप नाहीच तर!'

'ते आमच्या आईलाच माहीत–यक होता का धा! ......................'

'हे बघा बाई, तुम्ही रडू नका......... पण मला सांगा, तुम्हाला देवीला सोडल्यावर तुमच्या नसलेल्या बाची बोटं कशी परत आली?'

'......................'

'बरं ते राहू द्या, फुडं काय झालं सांगा!'

'शाळेत शिकत होतो चौथीपर्यंत...'

'हं...न रडता सांगा. मग शाळा का सोडलीत?'

'... पदर आला आन् आईनं धंद्याला बसविली.'

'किती वर्षं झाली बाई, तुम्हाला ह्या धंद्यात?'

'बारा वर्सं झाली बगा–दोन पोरं हाईत आता मला.'

'काय करतात?'

'शाळा शिकतात.'

'तुमच्याबरोबरच राहतात?'

'आनकी कोन हाय त्यांना? सारे त्यांना .. रंडी के– म्हनतात.'

'पोरा-बाळांच्या शिक्षणासाठी ह्या धंद्यातून पैसा मिळतो का?'

'नाय मिळत. मद्रास्याकडून रुपयाला रुपया ह्या भावानं कर्ज काढतो.'

'बाई, उद्या जर तुम्हाला वखारीत काम देतो म्हटलं तर धंदा सोडून त्या कामाला जाणार का?'

'कोन सांगा आगीतून उठून फोफाट्यात पडनार?'

'................'

'............... सारे मजा मारायला येत्यात बगा, आम्ही वेश्या म्हनजे कचरा... कुट बी टाका, आमाला जाळायला लोक तयार हाईतच......माजं सोडा; माज्या प्वारांना बी........तीन लग्नाच्या बायकोची, तशी ही आनकीन दोन...म्हनतंय कुनी ...............................!'

¤

...'बस्स कर यार, बंद कर ती टेप! ती बाई गेले एक मिनिट रडतेय आणि तू टेप चालू ठेवली होतीस तेव्हा. हाऊ क्रुअेल यू आर!'

'थँक गॉड! मुलाखतीच्या आधी तूच काय म्हणाला होतास? आता किमान 'बाई' तरी म्हणालास!'

'काय ऐकायचं का पुढं-देवदासींची मुलाखत म्हणजे माझी मज्जा ना?'

'मला तर काही वेळानंतर ऐकवेना!'

'काय? कुणाचा प्रॉब्लेम करून ठेवलाय कळलं ना?'

'छे:, काय सालं! हे अजून असंच चालू आहे?'

'हो ना! कारण असंच चालू रहावं असे वाटणारे अधिक आहेत!'

'भयंकरच मिझरेबल हं!'

'आयला, टी. व्ही. च्या 'सुंदर माझं घर' मध्ये दाखवा म्हणावं हे सारं!'

—प्रदीप दीक्षित

## जतभागातील देवदासींचे पुनर्वसन

### सौ. लीना मेहेंदळेंची योजना

जत, ता. २४ – जतभागातील देवदासींचे पुनर्वसन करण्याची योजना जिल्हाधिकारी सौ. लीना मेहेंदळे यांनी हाती घेतली आहे.

या योजनेची सुरुवात म्हणून जत, डफाळपूर व संख येथील देवदासींना बोलाविण्यात आले होते. त्यांपैकी दोघींना जत पंचायतसमितीमध्ये बागेत काम करण्याची नोकरी दिली, तर इतरांना ट्रायसेम योजनेखाली पोल्ट्रीचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे. या महिलांना जतला दररोज येण्यासाठी बस-पास देण्याची व्यवस्था केली असून, त्यांना दरमहा दोनशे रुपये अनुदान देण्यात येणार आहे. इतरही देवदासींना उद्योग करावयाचा असेल तर त्यांना एकात्मिता ग्रामीण विकास योजनेखाली सहाय्य केले जाईल. मात्र त्यांनी जोगवा मागता कामा नये, अशी अट जिल्हाधिकाऱ्यांनी घातली आहे.

त्या म्हणाल्या, 'येथील उमराणी गावी तीन मुली देवदासी म्हणून सोडणार आहेत, असे समजले असून त्यांना प्रतिबंध करण्याचे उपाय आम्ही योजले आहेत. यापुढे जे कोणी देवदासी बनण्यास प्रवृत्त करतील व देवदासींचा धंदा सोडण्यास विरोध करतील त्यांच्यावर मुंबई देवदासी संरक्षण कायदा १९३४ अन्वये खटला दाखल करण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत.

जन्मतारखेच्या दाखल्यावरून ज्या देवदासींच्या मुलांना शाळेत प्रवेश देण्याचे नाकारले जाते, त्यांच्या पालकांचा जन्मतारखेविषयी फक्त जबाब घ्यावा व त्यांना प्रवेश द्यावा. तसेच ज्या मुलाच्या बापाचे नाव सांगणे अशक्य असेल, त्याच्या आईचे नाव अगर फक्त नाव व आडनाव घेऊन त्याला शाळेत प्रवेश द्यावा, असे आदेश संबंधितांना दिले आहेत.

देवदासींशी बोलताना त्या म्हणाल्या, 'आपण ज्याला घाबरतो, ते भूत असते, देव नाही. तुम्ही जर देवाला घाबरत असाल तर ते भूत आहे. ते सोडून द्या व कामाला लागा!'

माझ्या या देवदासी-पुनर्वसनाच्या प्रयत्नातील हे पहिले पाऊल आहे. यासाठी मी भरपूर प्रयत्न करून शासनाच्या वेगवेगळ्या योजनांद्वारे त्यांना सहाय्य करून स्वयंपूर्ण करणार आहे. त्यांच्या जीवनाला वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न करणार आहे, असे त्यांनी शेवटी सांगितले. (२५ फेब्रुवारी ८४, कोल्हापूर 'सकाळ' मधून)

## पुस्तके

# ‘माझ्यावर गोष्ट लिहा–रायटर!’

हे मराठी–इंग्रजीची सरमिसळ असलेलं नाव धारण करणारा, विजया काळे यांचा कथासंग्रह हाती आल्यावर, त्याचं मुखपृष्ठ पाहून वाटलेला आनंद, मलपृष्ठावर लेखिकेची केलेली भलावण वाचून काहीसा मावळला. ‘खानदानी कथा’ असा काही एखादा कथालेखनाचा स्वतंत्र प्रकार असू शकतो का? तसा तो असतो, असावा असं मुळीच वाटत नाही. ‘कथा’ ही कथा असावी ती चांगली की वाईट ते वाचकांनी ठरवावं. कथा खानदानी, चाळीतली की झोपडपट्टीतली या गोष्टी रसास्वादाच्या आड कधीच येता कामा नयेत आणि खरा रसिक, जाणकर वाचक त्या आड येऊही देत नाही. दुसरी गोष्ट लेखकाच्या व्यक्तिगत आयुष्यक्रमाचा त्याच्या लेखनाशी संबंध जोडण्याची घाई करणे ही गोष्ट अयोग्य वाटते. (पहा, यांच्या वाटचाला किती दुर्मिळ भाग्य आलं आहे... परदेशच्या वाऱ्या या किती सहजपणे करतात इ. इ.) चरित्रात्मक टीका हा टीकालेखनाचा प्रकार मला ठाऊक आहे आणि आस्वादाला पोषक अशी चरित्रात्मक माहिती अंतिम मूल्यमापनाला उपयुक्त ठरते हेही मी जाणते; पण तिथेही तो प्रवास साहित्यातून चरित्राकडे असा असतो आणि चरित्र अभ्यासण्याचा हेतू अधिक जाणकारीने रसास्वाद हा असतो म्हणूनच लेखकाने व प्रकाशकाने फक्त साहित्यकृती वाचकांसमोर ठेवावी. परिचयात्मक असं काही प्रस्तावनेत, मलपृष्ठावर किंवा अन्य स्वरूपात लिहायचं असेल तर ते साहित्यकृतीसंबंधी असावं,त्यात अनावश्यक तपशील असू नये हे सारं या पुस्तकाच्या मलपृष्ठावरील मजकूर वाचल्यावर प्रकर्षानं जाणवलं म्हणून त्यावर थोडं सविस्तर लिहिलं.

या कथासंग्रहातली एकेक कथा क्रमाने वाचत गेले नि आधी मनात निर्माण झालेली, किंचित प्रतिकूलतेची छटा मावळत गेली· जवळजवळ प्रत्येक कथा नवीन आनंद देत गेली. मग वाटलं ‘इये देशीचिया’ रंगात रंगलेल्या या लेखिकेवर मलपृष्ठावरील मजकुराने ‘लेखिका’ म्हणून अन्याय केला आहे.

या कथासंग्रहात एकूण सतरा कथा आहेत. सगळ्या कथांत महत्त्व आहे ते त्यातील व्यक्तींना, माणसांना! ही माणसं निरनिराळे मनोधर्म घेऊन आलेली आहेत. आपली सुखदु:खं, आशा-आकांक्षा अंत:कोषात हळुवार जपत असलेली आहेत. ती कधी आपल्यातच हरवून जातात, कधी आपलं अस्तित्व दुसऱ्याला जाणूनबुजून काट्यासारखं टोचत रहातात आणि सुन्न करून सोडतात. मानवी मनाचे हे विविध पैलू लेखिकेने इतक्या प्रभावी रीतीने आपल्यापर्यंत पोचवले आहेत की, आपण जणू काही काळ त्या व्यक्तींच्या सहवासातच वावरत आहोत असा भास व्हावा.

आपल्या प्रिय पत्नीच्या चिरवियोगाने ‘भिकारी’ झालेला वृद्ध आवंढे गिळीत आपल्या चिमुकल्या गोड नातीला गोष्ट सांगतो आहे, ‘एक होती राणी’ या करुणार्त कथेत! आपल्या दुर्दैवी, दु:खाने पिंजून मरण पावलेल्या आईची शेवटची इच्छा पुरी करावी, तिला सद्‌गती मिळावी म्हणून आपला इवला जीव पाखडणारा ‘सद्‌गती’ या कथेतला, शंतनु मनाला चटका लावून जातो. ‘नववधू’ ‘जगावेगळं’, ‘सासू’ या तीन या संग्रहातल्या वैशिष्ट्यपूर्ण कथा आहेत मुलाने घरी आणलेल्या आपल्या अमेरिकन सुनेचं मोठ्या मनाने स्वागत, कौतुक करण्याचा निश्चय सासू–सासरे करतात, तिचा नवरा तिला खूष ठेवण्याचा, समजावून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करतो; पण ते परदेशी रोपटं इथल्या मातीत मुळंही टेकवू शकत नाही. रुजणं तर राहिलं बाजूलाच! या ‘नववधू’ कथेत चारही व्यक्तींच्या मनाची घालमेल लेखिकेने अतिशय प्रत्ययकारकतेने चितारली आहे. ‘जगावेगळं’ ही कथा खरोखरच जगावेगळ्या घटना नि व्यक्तींचं चित्रण करणारी आहे. कुणाला ती अवास्तव वाटेल; पण ही कथा उभी करताना लेखिकेने फार गुंतागुंत न करता कार्यकारणसंबंधांचे धागे चांगले जुळवले आहेत. त्यामुळे एरवी कृत्रिम, वेगडी वाटली असती अशी ही कथा एक वेगळं वास्तव आपल्यापुढं उभी करते. माणूस हा प्राणी किती दुबळा नि किती समर्थ आहे याचं चाकोरीबाहेरचं दर्शन इथे होतं. स्वत:च्या वैवाहिक आयुष्याची मधुर स्वप्नं रेखाटणाऱ्या तरुणींच्या कथा आपण खूप वाचतो; पण ‘सासू’ या कथेत नव्या सुनेला लाडाकोडात ठेवू इच्छिणारी, तिच्या हिरव्या चुड्याची नाजूक किणकिण ऐकून सुखावणारी, तिच्या पायातील जोडव्यांच्या ठेक्याने फुलून येणारी, भरल्या डोळ्यांनी तिचं सुख जपणारी प्रौढ स्त्री आपल्याला भेटते. चुडा उतरला नाही तोच नोकरीवर निघालेल्या सुनेला पाहून तिला भडभडून येतं. सून आणि मुलगा यांना काही काळ सोसाव्या लागणाऱ्या विरहानं तिचं काळीज कळवळतं. स्त्रीमनाचं हे अनोखं रूप आणि वास्तवाची अटळता आपल्याला अंतर्मुख करते. शिंपल्यांनी मोती जपावे तसे जीवनातले काही दिवस तरी माणसाला जपता यावेत, अलगद झेलता यावेत, भरभरून हुंगता यावेत; पण आजच्या यंत्रमय आयुष्यक्रमात, आर्थिक विवंचनेच्या, जागेच्या टंचाईच्या काळात भावना ही चीजच कुठे तरी हरवून गेलीय. तडजोड हेच आयुष्य झालंय हे विदारक सत्य, ही कथा फार कोमलतेने आपल्यापुढे मांडते तर ‘सावट’ या कथेत मानवी देह धारण करणारे दुष्टात्मे, सुखाने जगत असणाऱ्या माणसांना कसे भेदरवून सोडतात, एक प्रकारची चमत्कारिक गुलामगिरी कशी भोगायला लावतात याचा नमुना पहायला मिळतो. ‘खंत’, ‘नरवर कृष्णासमान’, ‘आईचं लग्न’, ‘सावळाच रंग तुझा’ या सगळ्या तशा चाकोरीतल्या कथा; पण चांगल्या निवेदनपद्धतीमुळे, कथा फुलविण्याच्या छान जमलेल्या तंत्रामुळे वाचनीय झाल्या आहेत. ‘काळीज’ आणि ‘आई’ या एकच समान धागा असलेल्या कथा आहेत. ‘वळण’, ‘रनिंग हॉर्स’ या दोन कथांत हायर सोसायटीतल्या माणसांची जीवन जगण्याची रीत, आपली प्रतिष्ठा (!) आणि रक्तात रुजलेल्या मूल्यकल्पना या

दोन्हीतील कुतरओढ या सगळ्याचं, सुरेख दर्शन घडवलं आहे. 'न लिहिलेली गोष्ट' ही थोड्या वेगळ्या धर्तीची असूनही मनाला स्पर्शून न जाणारी कथा आहे. श्रीमंता घरच्या एका अपंग मुलाचं चित्रण आणि त्याने 'माझ्यावर गोष्ट लिहा' म्हणून धरलेला आग्रह एवढंच कथाबीज असलेली ही कथा श्रीमंतीचं आणि श्रीमंतीबरोबर येणाऱ्या सुखोपभोगांचं वर्णन याखेरीज वाचकांपर्यंत काहीही पोचवू शकलेली नाही. 'माणूस', 'बिच्चारा काका' या दोन कथांमधल्या व्यक्ती मनुष्यस्वभावाचे दोन नमुने पेश करतात. कठोर व्यवहारी जगापुढे ध्येयवादी, तत्त्वनिष्ठ माणसाला कसं शरण यावं लागतं याचं दर्शन 'माणूस'-मध्ये होतं, तर संसारसुख नशिबी नसलेल्या काकाची केविलवाणी स्थिती 'बिच्चारा काका'मध्ये रंगवलेली दिसते.

हा कथासंग्रह लेखिकेबद्दल खूप चांगल्या अपेक्षा मनात निर्माण करतो. मानवी मनाची स्पंदनं समरसतेने व्यक्त करू शकणाऱ्या या लेखिकेनं यापुढं अधिक मोठं क्षितिज डोळ्यांपुढं ठेवून वाटचाल करावी, केवळ कारुण्य, दुःख, अगतिकता या मानवी आयुष्याच्या एका बाजूऐवजी त्यातील संमिश्रता, अथांगता, गूढता, खुजेपणा आणि थोरवी अशा विविध चित्रणांनी आपलं कथालेखन संपन्न करावं. ते त्या करू शकतील असं वाटतं. पुढील वाटचालीकडे लक्ष वेधणारा हा एक दर्जेदार कथासंग्रह आहे.

□

माझ्यावर गोष्ट लिहा, रायटर !
विजया काळे
श्री विद्या प्रकाशन
पृष्ठसंख्या : १६६;
मूल्य : २७ रु.

## मनस्वी स्त्रीचं प्रत्ययकारी चित्र

'मला हे लग्न मान्य नाही' ही सरोजिनी शारंगपाणी यांची कादंबरी. रखमाबाई विरुद्ध दादाजी खटला ही या कादंबरीची मूळ प्रेरणा. अर्थातच रखमाबाईं-सारखी काळाच्या खूप पुढे गेलेली बुद्धिमान स्त्री हा या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. रखमाबाईंच्या काळातला सामाजिक, राजकीय, धार्मिक संदर्भ लेखन करताना मनात सतत जागा ठेवणं, मनानं तो काळ जगणं आणि कादंबरीचं कलात्मक भान ठेवणं या गोष्टी लेखिकेनं चांगल्या पेलल्या आहेत. त्यामुळे कादंबरी जिवंत वाटते. घटना-प्रसंग, व्यक्ति-मनातील गुंतागुंत यांचा प्रवाह रुक्ष तपशीलाने, वैचारिक चर्चेने कुठे अडवून धरला आहे असं घडलेलं नाही म्हणूनच रखमाबाईंच्या जीवनाशी एक माणूस म्हणून आपण समरस होऊ शकतो. गतकालात होऊन गेलेला एक खटला, त्यामुळे झालेला सामाजिक गदारोळ आणि त्यात सापडलेल्या एका दुर्दैवी स्त्रीचं कणवपूर्ण चित्रण अशी ढोबळ भूमिका घेऊन कादंबरीची उभारणी झालेली नाही. तर काळाच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने जाऊ पहाणाऱ्या तीव्र बुद्धिमत्ता व संवेदनशील मन असलेल्या स्त्रीची होरपळ आणि तिची जीवननिष्ठा वाचकांपुढे उभी करण्याचा हेतू इथे दिसतो. रखमाबाईंच्या जीवन–चरित्रामुळे आलेल्या बेचैनीतून ही कादंबरी निर्माण झाली आहे आणि ती बेचैनीचा अनुभव वाचकांना देण्यात ती बऱ्याचशा प्रमाणात यशस्वी झाली आहे. यातल्या कल्पिताविषयी मतभेद होऊ शकतील; पण चरित्रात्मक कादंबरीत सत्य आणि कल्पिताची भेसळ असणं अपरिहार्यच असतं. रखमाबाई आणि जॉन यांच्यातील नाजूक भावसंबंधांच्या चित्रणाला मुळात आधार नसताना, मानसशास्त्रीय शक्यता वाटल्याने लेखिकेने ते एक वादळ चितारलं आहे; पण त्याविना कादंबरीत काही उणीव निर्माण झाली असती असं मुळीच नाही. मुक्ता–विश्वास प्रकरण तर कृत्रिम, नाटकीच वाटतं. रखमाबाईंचं व्यक्तिचित्रण तर चांगलं आहेच; पण इतर महत्त्वाच्या व्यक्तींचं चित्रणही प्रत्ययकारक आहे. डॉ. सखाराम, जयंतीबाई, धर्माजी, दादाजी, तेलंग या व्यक्तींचे स्वभावविशेष, त्यांच्यापुढील पेच आणि त्यांचे डावपेच कौशल्याने चितारले आहेत. कुटुंबातलं एखादं माणूस चारचौघांपेक्षा वेगळी वाट चोखाळणारं असेल, तर त्याच्या निकटच्या माणसांची जीवनं कशी घुसळून निघतात, कसे ताण निर्माण होतात याचं दर्शन डॉ. सखाराम, जयंतीबाई यांच्या मनःस्थितीतून होतं. उदंड माया करणारी, धीर देणारी माणसं माता–पिता म्हणून लाभली म्हणूनच रखमाबाईंचा निश्चय दृढ होत गेला. या करारी स्त्रीचे अखेरचे दिवस मन गलबलवून टाकतात. एकाकीपण हीच शेवटी 'उंच' माणसाची नियती असते. या एकाकी, असहाय जीवनावस्थेपासून कादंबरी सुरू होते आणि जिवंतपणी भयाण काळोखाच्या गुहेत शिरलेल्या रखमाबाईंच्या चित्रणात पूर्णविराम पावते ती वाचकांना सुन्न करूनच !

–मेधा सिधये

मला हे लग्न मान्य नाही
सरोजिनी शारंगपाणी
श्री विद्या प्रकाशन
पृष्ठे २८४
मूल्य ३५ रु.

विनोदी साहित्य निर्माण करणाऱ्या लेखकाची बुद्धिमत्ता असामान्य असावी लागते व वृत्ती चौकस. कल्पकतेचं नैसर्गिक वरदान त्याला असावं लागतं. श्यामच्या या कथा वाचताना या साऱ्या गुणांचा प्रत्यय आपल्याला येत रहातो. –अभिप्राय 'महाराष्ट्र टाइम्स

काही दिवस श्यामचे, काही राधाचे

लेखक : फिरोझ रानडे
मूल्य : २५ रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# रंगभूमी

## मुं. म. सा. सं. चे

# ‘ रविराज तो, मी रोहिणी ’

## हा सारा अट्टाहास कशासाठी ?

‘ रविराज तो, मी रोहिणी ’ या नावाचे एक नवे नाटक मुंबईच्या साहित्य संघाने रंगभूमीवर आणले आहे. नाटकाच्या नावावरून तसा नेमका विषयाचा अंदाज लागत नाही; पण काव्यमय पद्धतीचे नाव, तशीच काव्यमय प्रेमकहाणी सांगणारे असेल असे वाटत राहते; पण त्याचाही पुढे निरास होतो.

हे नाटक थोरले किंवा पहिले बाजीराव आणि मस्तानी यांच्या जीवनप्रसंगावर आधारलेले आहे. सुमारे एक वर्षापूर्वी हे नाटक कॅ. वासुदेव बेलवलकर यांनी खाजगीत मला वाचून दाखवल्याचे स्मरते; परंतु पुढे अनेक घटना घडल्या आणि कॅ. बेलवलकरांचे नावे संहिता संकल्पना असा शब्द आला. नाट्यलेखक आणि अर्थातच दिग्दर्शक म्हणून पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे नाव आहे.

बाजीराव आणि मस्तानी यांचे प्रेम, नातेसंबंध हा मराठी माणसाच्या कुतूहलाचा, जिव्हाळ्याचा विषय आहे. यावर वि. वा. शिरवाडकर यांनी ‘ दुसरा पेशवा ’ नावाची काव्यमयशैलीत एक नाट्यकृती निर्माण केल्याचे अनेकांना माहीत आहे. मग आता हा विषय नव्याने हाताळण्याचे कारण काय, असा एक प्रश्न सहजपणाने मनात येऊन जातो. तर त्याला निमित्त आहे, बाजीरावांच्या स्मारकाचे आणि त्या निमित्ताने शनिवारवाड्यासमोर उभारलेल्या पुतळ्याचे. थोरल्या बाजीरावांचे स्मारक उभारले जावे आणि आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे त्या व्यक्तीचा पुतळा उभारला जाणे यात गैर काहीच नाही. अशा पराक्रमी व्यक्तीच्या जीवनावर नाटक लिहिण्याचा मोह होणे यातही गैर काही नाही; पण ते नाटक त्या पराक्रमी पुरुषाच्या पराक्रमाला आणि प्रेमाला शोभेलसे व्हायला पाहिजे. मात्र तसे ते अजिबात झालेले नाही !

कॅ. बेलवलकरांनी आपल्या संहिता संकल्पनेत शिरवाडकरांपेक्षा काहीसा निराळा दृष्टिकोन आणि वेगळ्या पद्धतीचा इतिहास तपशील वापरलेला आहे. उदाहरणार्थ महत्त्वाचा भाग म्हणजे मस्तानी ही छत्रसाल राजाची अनौरस मुलगी होती. तिचा आणि बाजीरावाचा विवाह प्रगामी पंथाच्या पद्धतीने छत्रसालाने करून दिलेला होता. तसेच मस्तानीचे पुण्यात–शनिवारवाड्यात येणे हे चिमाजीअप्पाला आणि त्यांच्या मातोश्रींना ( राधाबाईंना ) मान्य नव्हते; पण बाजीरावांच्या पत्नीला मात्र ती घटना वेगळ्या संदर्भात मंजूर होती. अशा काही महत्त्वपूर्ण बदललेल्या तपशीलांसह हे नाटक मोठ्या ताकदीने उभे राह्यला हवे होते, तसे घडले नाही. याचे मुख्य कारण नाट्यलेखक दारव्हेकर एकामागून एक घटना–प्रसंग यांचे दर्शन घडविण्यात, वर्णन–निवेदन करण्यात गुंतून पडले. त्याबरोबरीनेच त्यांना शब्दांचा संवादांचा जो सोस आहे तोही मोठ्या प्रमाणात भागवला गेला. परिणामी झाले असे की, बाजीराव, मस्तानी, चिमाजी, काशीबाई आदी महत्त्वाच्या व्यक्तिरेखांचे सूक्ष्म मनोदर्शन किंवा भावदर्शन पृष्ठपातळीवर तरंगत राहिले. घटना–प्रसंगांच्या साह्याने व्यक्तिमनाचा जो शोध घ्यावा लागतो तसा प्रयत्न अपवादात्मक झाला. त्यामुळे नाट्यप्रयोगात दारव्हेकरांनी रंगवलेला बाजीराव खरोखरच नेमका कसा आहे हे कळणे अवघड होऊन बसले. ऐतिहासिक नाटकात नाट्यलेखकाला लोकमानसातील त्या व्यक्तीची प्रतिमा मोठ्या प्रमाणात उपयोगी पडत असते. लोकमानसातील प्रतिमेचा आधार घेऊन नाटककार त्यात अधिक रंग भरतो, नवे परिणाम देऊन ती प्रतिमा अधिक ठसठशीत नेमकी करतो, करावी अशी अपेक्षा असते ! पण तसे घडले नाही.

मूळ संहिता संकल्पनेत, लोकमानसप्रतिमेत जे काही हाती लागेल, त्या आधारे प्रयोगात ते अधिक स्पष्ट होईल ही अपेक्षा परिपूर्ण न होण्यास एकूण प्रयोगदर्शनच कारणी ठरले. मुळात बाजीरावसाठी दाजी भाटवडेकर आणि मस्तानीसाठी सुहास जोशी ह्या दोन कलावंतांची निवडच चुकीची होती असे प्रामाणिकपणे वाटले. दाजी हे बाजीराव करणार अशा वार्ता नाट्यवर्तुळामध्ये जेव्हा पसरू लागल्या तेव्हाच शंका कुशंकांची भेंडोळी सुटू लागली. त्या शंकांचा अंदाज घेऊन दाजींनी मुलाखतीद्वारा त्यांचे समर्थनही केले. हे सारे गृहीत धरून किंवा ते सारे बाजूला ठेवून प्रयोग पाहणे सुरू झाले, तेव्हा कोणत्याच अर्थाने त्यांचा अभिनय रसनिर्मितीच्या पातळीवर येईना. त्यांचे भूमिकेत दिसणे हे तर सुखाचे नव्हतेच; पण अगदी सोयीपोटी ( म्हणजे साहित्यसंघाच्या सोयीपोटी ) गृहीत धरले तरी त्यांची संवादफेकीची पद्धती कोणताच परिणाम निर्माण करीत नाही हे ध्यानात येत होते. विशेषतः आवाजातील चढउतार, शब्दांना असलेले वजन, ऐतिहासिक नाटकातील सवादांचा वेगळा थाट ह्या सर्वांतून म्हणजेच वाचिक अभिनयातून अनेक भावछटा व्यक्त करणे शक्य होते; पण ते घडले नाही. रंगभूमीवरील हालचाली, मुद्राभिनय ह्या संदर्भात तर त्यांनी इतक्या ढोबळ गोष्टी केल्या की, व्यक्तिरेखा उभारणे दूरच राहिले !

सुहास जोशी ही गुणी कलावती आहे

तिने आत्तापर्यंत केलेल्या भूमिकांच्या आधाराने रंगभूमीवर एक स्वतंत्र प्रतिमा निर्माण केली आहे. त्यामध्ये मस्तानीच्या भूमिकेने अधिक भर पडेल असे वाटत नाही; पण तेही कोणत्याच पातळीवर घडले नाही. तिला या भूमिकेत आव्हानात्मक काय वाटले ते तिचे तिलाच माहीत. तिला दिलेला पोशाख (एका प्रवेशातला नऊ वारी लुगडे नेसल्याचा अपवाद वगळल्यास), ध्वनिमुद्रित गाण्यावर नृत्यात्मक हालचाली करण्याचा तिने केलेला केविलवाणा प्रयत्न; तिच्या आणि बाजीरावांच्या भेटीतील शब्दांची आतषबाजी आदी गोष्टी रंगमंचावर पाहात असताना सुहासची दया येत होती आणि एका वेगळ्या अर्थाने सहानुभूतीही वाटत होती.

चिमाजीअप्पांच्या भूमिकेत नारायण बोडस, राधाबाईच्या भूमिकेत सीमा पोंक्षे, काशीबाई–मीना मळेकर हे कलावंत होते; पण त्यांच्या व्यक्तिरेखांना नाटकात व्यवस्थित रूप नसल्याने जे विस्कळीतपण येते तसे आले, परिणामी त्यांच्या अस्तित्वाचा, अभिनयाचा विशेष परिणाम घडला नाही.

या नाटकात आणखी एक गमतीची गोष्ट ध्यानात येत होती, ती म्हणजे काही पुरुष पात्रे ऐतिहासिक थाटात आवाज लावून साधात पद्धतीने बोलत होती. तर स्त्री-पात्रे सामाजिक नाटकातील वास्तवाला जवळ जाणाऱ्या शैलीत बोलत होती. या मिश्रणामुळे नाटकाचा परिणाम आणखीही दूर जात होता. कधीकधी हास्यास्पदही होत होता,

द. ग. गोडसे यांचे नेपथ्य नेहमीच विचारपूर्वक आणि प्रयोगाला पूरक असे असते, तसे ते यांही नाटकात होते. हे नाटक बहुप्रवेशी बहुस्थळी हिंडणारे होते. ती गरज ओळखून थोडक्या वेळात बदलता येईल असे नेपथ्य होते; पण नेपथ्यात स्थलनिर्देश कोणताही असो. बहुतेक पात्रे रंगमंचाच्या मध्यभागी येऊनच आपला संवाद–व्यवहार करीत असल्याने नेपथ्याचे पूरकपण किंवा साह्यभूत होणे दूरच होते. फक्त रंगमंचाच्या मागचा उघडा भाग आणि त्यासाठी केलेली प्रकाशयोजना परिणामकारी वाटली.

नावाजलेले नाटककार, प्रसिद्ध कलावंत, दीर्घ परिचयी नाट्यसंस्था एकत्र येऊन एखाद्या प्रयोगाने निराशा केली की, प्रश्न पडतो 'हा सारा अट्टाहास कशासाठी ?'

— वि. भा. देशपांडे

विज्ञानेश्वरी

# जंतूंची प्रतिकारशक्ती

पेनिसिलिन व तत्सम औषधे आजकाल कुचकामी ठरत आहेत असे आपण मधून मधून ऐकत असतो. तसेच हल्ली डीडीटीने डास मरत नाहीत असे अनुभवास येते. पुन्हा पुन्हा वापरल्याने डासांत प्रतिकारशक्ती निर्माण झाली आहे असे स्पष्टीकरण देतात. तीच गोष्ट जंतूंची. याचे रहस्य काय आहे? जंतूंच्या एका पिढीने मिळवलेली प्रतिकारशक्ती पुढील पिढ्यांत उतरत गेली काय ?

या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी एक साधा प्रयोग पाहू. इ. कोलाय् (Escherichia Coli) नावाचे जंतू स्ट्रेप्टोमायसिनने मरतात. एका बशीत जंतूंसाठी भरपूर अन्न (उदा. मांसाचा रस्सा) घेऊन त्यावर इ. कोलाय् जंतू खूप मोठ्या प्रमाणावर ठेवले. भरपूर अन्न असल्याने जंतूंची भरमसाठ वाढ होऊन जंतूंनी सर्व बशी भरून जाईल. आता त्या बशीवर पुष्कळसे स्ट्रेप्टोमायसिन ओतले. थोड्याच वेळात सर्व जंतू मरून गेल्याचे दिसून येते; परंतु मुळात जंतू खूप जास्त असतील तर कितीही स्ट्रेप्टोमायसिन घातले तरी बशीत काही ठिकाणी इ. कोलाय् जंतूंचे लहान लहान पुंजके–वसाहती राहून गेल्या आहेत असे आढळते. या छोट्या वसाहतींतील थोडे जंतू घेऊन ते वेगळ्या बशीत मांसाचा रस्सा घेऊन त्यावर सोडले तर थोड्याच वेळात त्यांची झपाट्याने वाढ होऊन सर्व बशी जंतूंनी भरून जाते. आता या नव्या बशीत कितीही स्ट्रेप्टोमायसिन घातले तरी जंतू मुळीच मरत नाहीत. उलट काही वेळा तर स्ट्रेप्टोमायसिनमुळे उरलेल्या जंतूंची वाढ जोरकस होते असाही प्रकार दिसतो.

असे होण्याचे कारण समजून घेणे अवघड नाही. सर्व माणसे तंतोतंत सारखी नसतात तसे सर्व इ. कोलाय् जंतूसुद्धा अगदी एकमेकांसारखे नसतात. प्रत्येक सजीवाचे सर्व गुणधर्म अंतिमत: त्याच्या पेशीकेंद्रात असलेल्या जीन्सवर अवलंबून असतात. जीनमधील रेणूंच्या रचनेत थोडा फरक असेल तर त्या सजीवाचे गुणधर्म वेगळे होतात. साधारण इ. कोलाय् जंतू स्ट्रेप्टोमायसिनने मरतात हे खरे; पण या जंतूत एकच जीन वेगळा असलेले जंतू त्या औषधाला बळी पडत नाहीत. एकंदर इ. कोलायमध्ये अशा जंतूंचे प्रमाण फार कमी असते. या जंतूंची वाढ पेशीविभाजनाने होते. सामान्यत: १० लक्ष ते १०० कोटी इतक्या विभाजनात स्ट्रेप्टोमायसिनला बळी न पडणारा एखादा जंतू आपोआप निर्माण होतो. वरील प्रयोगात सुरुवातीला भरपूर जंतू घेतले होते. त्यामुळे वरील जीनभेद असणारे काही जंतू त्यात असणारच. स्ट्रेप्टोमायसिन टाकल्यावर बहुतेक जंतू मरून गेले; पण त्या औषधाला न जुमानणारे जंतू काही ठिकाणी राहिले, त्यांना मोकळे रान सापडले. स्पर्धा उरली नाही म्हणून त्यांची झपाट्याने वाढ झाली. तेच जंतू दुसऱ्या बशीत घेतल्यावर थोड्याच वेळात त्यांनी सर्व बशी व्यापली. त्यांवर स्ट्रेप्टोमायसिन टाकल्यावर काहीच परिणाम झाला नाही. कारण ते सर्व जंतू स्ट्रेप्टोमायसिनला दाद न देणारेच होते. त्या औषधाच्या सान्निध्याने किंवा सवयीने प्रतिकारशक्ती निर्माण झाली असे नसून इ. कोलायजंतूंत प्रतिकारशक्ती असलेले जंतू आधीपासून म्हणजे स्ट्रेप्टोमायसिनचा शोध लागला त्याच्याही पूर्वीपासून–सूक्ष्म प्रमाणात का होईना, होतेच. औषध वापरल्याने बहुतेक जंतू मरून गेले व ही विशिष्ट जीनरचना असलेले जंतू उरले आणि वाढीला लागले.

पेनिसिलिन, स्ट्रेप्टोमायसिन, टेरामायसिन इ. अँटिबायॉटिक औषधांचा प्रथम प्रथम खूप प्रभाव पडला. म्हणजे प्रतिकारशक्ती नसलेले बहुतेक जंतू मरून गेले. उरले ते

प्रतिकारशक्ती असलेले, प्रथम फार सूक्ष्म प्रमाण असलेले जंतू. ते नंतर स्पर्धा न उरल्याने बेसुमार वाढले. आता त्यांचे प्रमाण किती तरी जास्त झाले आहे. जी गोष्ट जंतूंची तीच डासांची. डीडीटीने मरणारे डास मरून गेले, ज्यांच्यात प्रतिकारशक्ती होती. त्यांचीच प्रजा उरली व भरमसाट वाढली ! ☐

## प्लॅस्टिक वापरण्यातील धोके

सध्या प्लॅस्टिक-युग चालू आहे असे म्हणायला हरकत नाही. पॉलिएथिलिन, नायलॉन, सेल्युलॉइड, अॅक्रिलिक, फेनोलिक,... अशी अनेक प्लॅस्टिके सध्या आपण वापरतो. सुमारे १०० वर्षांपूर्वी जॉन वेस्ली ह्याने सेल्युलॉइड हे पहिले प्लॅस्टिक तयार केले. पायरोझायलिन व कापूर यांपासून सेल्युलॉइड तयार होते; परंतु खऱ्या अर्थाने मानव-निर्मित प्लॅस्टिक १९०९ मध्ये लिओ हेन्री बेकलॅण्डने तयार केले. थोड्याच काळात त्याचे व्यापारी उत्पादन सुरू झाले. त्याचे पेटंट नाव 'बेकेलाइट' असे ठेवण्यात आले. हे प्लॅस्टिक खूप लोकप्रिय झाले. दुसऱ्या महायुद्धानंतर प्लॅस्टिक पदार्थांची खरी चलती सुरू झाली.

आज प्लॅस्टिक-उद्योग हा जगातील एक अत्यंत महत्त्वाचा व वाढता उद्योग झाला आहे. टेरिलिन, नायलॉन, पॉलिएस्टर या सर्वांचा धागे काढून कापड करण्याकडे उपयोग होतो. त्यामुळे तर प्लॅस्टिक उद्योग खूपच मोठा झाला आहे. सध्या सर्व जगात मिळून वर्षाला ८ कोटी टन प्लॅस्टिक निर्माण केले जाते. पैकी पॉलिस्टिरिन, पॉलिव्हिनिल-क्लोराइड (PVC) पॉलिअल्केन या प्रकारातील प्लॅस्टिके ४ कोटी टन, पॉलिएस्टर, नायलॉन इ. कृत्रिम धाग्यांसाठी वापरायची प्लॅस्टिके ३ कोटी टन व स्टीरिन-ब्युटाडिन, पॉलिब्युटाडिन असली रबरे १ कोटी टन असतात. भारतात सुमारे १ लक्ष २० हजार टन प्लॅस्टिक तयार होते. प्लॅस्टिक वापरले जात नाही असे जीवनाचे एकही क्षेत्र नाही! ते खऱ्या अर्थाने सर्वगामी झाले आहे.

१९५९ पर्यंत मानवी आरोग्याच्या दृष्टीने प्लॅस्टिकच्या वापरात काही दोष आहेत हे कोणाच्याच लक्षात आले नव्हते. त्या वर्षी काही जखमी सैनिकांना रक्त देण्यासाठी नेहमीप्रमाणे PVC-प्लॅस्टिकची साधने,नळ्या वापरल्या होत्या. रक्त दिल्यानंतर काही वेळाने त्या सैनिकांना विचित्र रोग झाला व काही करायच्या आत त्यातील बरेच सैनिक मृत्यू पावले ! त्या लक्षणांना 'शॉक लंग' असे नाव दिले होते. प्लॅस्टिकच्या नळ्यांतून दिलेल्या रक्तामधून काही विषारी द्रव्ये सैनिकांच्या रक्तात गेली असावीत असा डॉक्टरांचा अंदाज होता; पण ते प्रकरण तसेच राहिले. पुढे १९७० मध्ये बाल्टिमोरच्या कार्नेजी इन्स्टिटयूटमध्ये प्रयोग करीत असताना हा प्रश्न पुन्हा उद्भवला. तेथे रॉबर्ट डी हान कोंबडीच्या अंड्यातील पेशींवर प्रयोग करीत होते. बशीत भरपूर खाद्यपदार्थ घालून त्यात पेशींची वाढ केली होती; पण एकदम त्यातील पेशी नाहीशा होत आहेत, मरत आहेत असे लक्षात आले. याचे कारण शोधता त्यांना असे दिसले की, बशी PVC-प्लॅस्टिकची होती व तिच्यातील काही विषारी द्रव्य बशीतील खाद्यात मिसळत होते. त्यानंतर १९७१-७२ मध्ये डॉ. रॉबर्ट रुबिन या जॉन हॉपकिन्स इस्पितळातील डॉक्टरांनाही काही रोग्यांना दिलेल्या रक्तामुळे विषबाधा झाल्याचे दिसून आले. रक्त देण्यासाठी वापरलेल्या नळ्या, बाटल्या व इतर वस्तू pvc च्याच होत्या. रक्तात मिसळलेले विषारी द्रव्य म्हणजे रक्त ठेवण्यासाठी वापरलेले थॅलेट प्लॅस्टिसायझर होते असे डॉ. रुबिन यांनी शोधून काढले.

डॉ. रुबिन यांच्या या शोधानंतर दोन-तीन वर्षांतच एक धक्का देणारी बातमी प्रसिद्ध झाली. pvc च्या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना यकृताचा कर्करोग (अँजिओसर्कोमा ऑफ लीव्हर) झाल्याच्या त्या बातमीने साऱ्या जगाचा थरकाप झाला. या भयंकर रोगाचे कारण व्हिनिल-क्लोराइडचे सान्निध्य हेच आहे असेही ठरले. व्हिनिल-क्लोराइड हा वायुरूप पदार्थ PVC करण्यासाठी वापरतात.

प्लॅस्टिक पदार्थांचा कोणत्याही प्रकारे मानवी शरीराशी संबंध आला तरी तो अपायकारक ठरू शकतो. श्वासावाटे सूक्ष्म कण किंवा वरीलप्रमाणे व्हिनिल-क्लोराइड फुफ्फुसात गेल्याने, कातडीला साधा स्पर्श झाल्याने किंवा प्लॅस्टिकच्या डब्या-पिशव्यांतून साठवलेले पदार्थ खाण्याने प्लॅस्टिक-पदार्थांचा आपल्या शरीराशी संबंध येतो. खाज सुटणे, वण पडणे, आग होणे, पुनरुत्पादनविषयक विकृती असे दोष प्लॅस्टिक वापराने निर्माण होऊ शकतात. PVC च्या कारखान्यात काम करणाऱ्या मजुरांना श्वसनसंस्थेचे रोग होण्याची शक्यता असते. व्हिनिल-क्लोराइडने पेशीतील उत्परिवर्तनास (Mutation) उत्तेजन मिळते. त्यामुळे वरील मजुरांच्या बायकांत गर्भहानीचे प्रमाण जास्त असते. काही वेळा शरीराच्या आतही प्लॅस्टिकच्या वस्तू (हृदयातील झडपा, नळ्या) बसविल्या जातात. त्यांच्या दुष्परिणामांचा तपशीलवार अभ्यास अजून झालेला नाही. तरीही अमेरिकेन सरकारने अॅक्रिलोनायट्राइलपासून केलेल्या बाटल्या दारू, शीतपेये फळांचे रस इ. साठवण्यासाठी वापरण्यावर बंदी घातली आहे.

प्लॅस्टिकच्या भरमसाठ वापराचे सर्व दुष्परिणाम कळण्याइतके संशोधन अजून व्हायचे आहे. कदाचित ते इतका बाऊ करण्याइतके गंभीर नसतीलही; पण तसे तपशीलवार संशोधन होईपर्यंत आपण काही खबरदारी घ्यायला हरकत नाही. खाण्याचे पदार्थ-विशेषत: पातळ पदार्थ- साठवण्या-


मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

साठी प्लॅस्टिकचे डबे, वाटल्या, पिशव्या वापरू नयेत. मुले प्लॅस्टिकच्या वस्तू खात किंवा चघळत नाहीत ना याकडे लक्ष द्यावे. बनियन्स, अंडरवेअर्स, ब्रेसियर्स, मोजे इत्यादी अंगाला प्रत्यक्ष लागणारे कपडे नायलॉन, टेरिलिन... अशा प्लॅस्टिक पदार्थांचे केलेले असतील ते वापरू नयेत !

¤

## उपयोग

ग्रीक लोक मोठे ज्ञानपिपासू होते. मात्र ज्ञान केवळ तात्त्विक असले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. व्यवहारोपयोगी ज्ञान खालच्या दर्जाचे असते असे ते मानीत.


विख्यात गणितज्ञ युक्लिड ( इ. स. पू. ३ रे शतक) एकदा वर्गात भूमितीचे एक अवघड प्रमेय शिकवीत होता. तेव्हा वर्गातल्या एकाने विचारले, 'पण त्याचा उपयोग काय ?' त्यावर युक्लिड इतका चिडला की, त्याने जवळच उभ्या असलेल्या नोकराजवळ एक पेनी दिली व त्याला सांगितले, 'त्याला ज्ञानापासून फायदा मिळायला हवाय ! त्याला ही पेनी दे... आणि हाकून लाव.'

शतके लोटली आणि लोकांची ज्ञान-विज्ञानाकडे पहाण्याची दृष्टी बदलली. हायड्रोजन या सर्वात हलक्या वायूचा शोध लागल्यानंतर तो वायू मोठ्या फुग्यात भरून फुगा सोडल्यास तो उंच जातो, हा प्रयोग सार्वजनिक ठिकाणी पॅरिस येथे झाला होता. इ. स. १७८३ मध्ये केलेल्या या प्रयोगाला अमेरिकेचे फ्रान्समधील तत्कालीन वकील बेंजामिन फ्रँक्लिन उपस्थित होते. ते स्वतः शास्त्रज्ञ होतेच व त्यांना विज्ञानाचा प्रसार झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. वरील फुगा सोडण्याचा प्रयोग पूर्णपणे यशस्वी झाला. सर्व लोकांना आनंद झाला व आश्चर्यही वाटले; पण त्यातही एकाने फ्रँक्लिनला विचारले, 'पण याचा उपयोग काय ?' तेव्हा त्यांनी उलट प्रश्न केला, 'महाशय, नुकत्याच जन्मलेल्या मुलाचा काय बरे उपयोग असतो ?'

मायकेल फॅरेडे (१७९१–१८६७) हा फार मोठा ब्रिटिश शास्त्रज्ञ होता. आज सर्वत्र दिसत असलेला विजेचा सर्व उपयोग फॅरेडेच्या विद्युतचुंबकीय प्रवर्तनाच्या शोधामुळेच शक्य झाला आहे. लंडनच्या रॉयल सोसायटीच्या सभागृहात तिच्या सर्व सभासदांपुढे, सरदार–उमरावांपुढे फॅरेडेने आपल्या विद्युतचुंबकीय प्रवर्तनाचा प्रयोग करून दाखवला. तेव्हाही एका सरदारीणबाईने खांदे उडवीत विचारले, 'पण याचा उपयोग काय ?' त्यावर फॅरेडेने तेच उत्तर दिले, 'बाईसाहेब, नुकत्याच जन्मलेल्या मुलाचा काय बरे उपयोग असतो ?'

—भा. रा. बापट

('सायन्स रिपोर्टर' ऑगस्ट, १९८१ वरून)




## सत्तांतरच्या निमित्ताने...

श्री. व्यंकटेश माडगुळकरांच्या 'सत्तांतर' या कादंबरीला साहित्य अकादमीचं पारितोषिक मिळालं आहे.
कादंबरीचा विषय सुचला कसा ? तयारी कशी केली ?
त्याना त्यात काय अभिप्रेत आहे – याबद्दल त्यांच्याशी एक दिलखुलास बातचीत !
जगदीश गोडबोले आणि प्रा. राम बापट यांनी केलेली

**माणूस पुढील अंकात**

आणि,

**चळवळीकडून स्थिरतेकडे**

पहिलं अ. भा. दलित नाट्य संमेलन

# नाट्यपंढरी



## □ दुःख कुणाचे, अश्रू कुणाला ?

सामान्यांनी असामान्य म्हणून भक्तिभावाने डोक्यावर घेऊन नाचविलेला नि असामान्यांनी नतमस्तक होऊन गौरविलेला, मराठी रंगभूमीवरील एकमेव श्रेष्ठ कलावंत म्हणजे रसिकांचे लाडके नटसम्राट बालगंधर्व ! बालगंधर्व हा रसिकांचा ठेवा होता. रंकापासून रावापर्यंत प्रत्येकाची 'मम सुखाची ठेव' होती. कुणी त्यांचे दर्शन सात रुपयांच्या खुर्चीवरून घेत होते, तर कुणी आपले लाडके दैवत पिढातल्या एक रुपयाच्या जागेवरून जिवेभावे न्याहाळीत होते. त्यांच्या वैभवपर्वात, नाटकाखेरीज त्यांचे दर्शन दुर्लभ होते.

पण देवालाही दुःख असते, मग बालगंधर्व तर काय माणूसच ! देवलोकातला शापित गंधर्व. तोही आपले विधिलिखित घेऊनच जन्माला आला होता. सदैव कलावैभवाचीच भव्य स्वप्ने पहात होता. कलेसाठी उधळण करताना कधी पैशांचा हिशोब मांडला नाही. त्यांचे पाय कधी जमिनीवर नव्हतेच. म्हणूनच व्यवहारी जगात, ते 'व्यवहारी अपूर्णांक' राहिले !

ऐनवैभवात असतानाही बालगंधर्वांना— गंधर्व नाटक मंडळीला, लाख-दीड लाख रुपयांचे कर्ज झाले होते. हा हा म्हणता ही बातमी सगळीकडे पसरली. नारायणरावांवर रसिकांचे किती प्रेम, किती जिव्हाळा की, ते कर्ज जणू आपल्याच घरावर आलेली आपत्ति आहे असे प्रत्येकाला वाटत होते. जो तो आपल्यापरी हळहळत होता. त्यात वालचंदशेटजींसारखे (वालचंद हिराचंद) रसिक धनिकही होते. एक दिवस ही धनिकमंडळी सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीत जमली नि बसल्या बैठकीत दीड लाख रुपये जमा केले! हेतू हा की, नारायणरावांचे एकरकमी कर्ज फेडून टाकावयाचे !

पण मित्रहो, नारायणरावांनी ते पैसे स्वीकारले का ? नाही–नाही ! नारायणराव हे रसायनच काही वेगळे होते. तो काही दक्षिणेला, दानाला पुढे सरसावणारा हात नव्हता. ते एवढेच म्हणाले, 'मायबापा, मला धन नको. माझ्यापाशी आहे ते तुमचंच आहे. माझं कर्ज मी फेडीन ! फक्त माझ्यावर व कंपनीवर लोभ मात्र असाच ठेवा!' उगीच नाही, लोकांनी लोकमान्यांसारखे उदंड प्रेम केले बालगंधर्वांवर ? टिळक नि बालगंधर्व ही लोकांची दैवते होती! इथे नकळत आठवण येते, ती भालाकार भोपटकरांच्या अग्रलेखातल्या एका खुमासदार वाक्याची ते लिहितात, 'बासुंदी, बालगंधर्व आणि बाल गंगाधर या तीन गोष्टी महाराष्ट्राला फार आवडतात !'

## □ अखेरची इच्छा !

बालगंधर्व हे वसंत शांताराम देसाई यांचे दैवतच म्हणा ना! त्यांना अनेक वर्षे नारायणरावांचा सहवास लाभला आहे. नारायणरावांवर लिहिताना त्यांच्या हळुवार नि मर्मज्ञ लेखणीचे मोठे लोभस दर्शन घडते. नारायणरावांच्या प्रेक्षकांचे वर्णन करताना ते लिहितात, 'गंधर्व मंडळीचा प्रेक्षकवर्ग इतर कंपन्यांपेक्षा अधिक संपन्न आणि अधिक व्यापक होता. गजांत लक्ष्मीत लोळणारे गुजराथी, भाटिये, खोजे आणि मुलतानी, नामांकित कायदेपंडित आणि आरोग्यपंडित, परगावाहून आलेले पोकी मुशाफीर आणि विश्वविद्यालयातील गुजराथी नि महाराष्ट्रीयच नव्हे, तर मद्रासी विद्यार्थीही अशा प्रेक्षकांनी सदैव तुडुंब भरलेल्या रंगमंदिरात स्त्री–प्रेक्षकांचा भरणा 'डोळ्यात भरण्याजोगा' असे !'

म्हणजेच ज्याला आम्ही आज सर्वधर्मसमभाव म्हणतो, तो गंधर्व–प्रेक्षकांत त्या वेळी वसत होता. त्यातच बालगंधर्व म्हणजे ज्यांचा जीव की प्राण, असे एक रसिकराज होते. त्यांचे नाव– लाला लक्ष्मीचंद ईश्वरदास ! १९२६ सालापासून नारायणरावांची नि त्यांची ओळख होती. पुढे त्याचे मैत्रीत रूपांतर झाले त्यानंतर ते केवळ गंधर्वांची नाटके पहाण्यासाठी पुण्या–मुंबईत मुक्काम करू लागले. इतकेच नव्हे तर गंधर्वांना, पुढे वेळोवेळी मदत करीत पन्नास हजारांचे कर्ज दिले गंधर्वांनी कराचीला आपल्या घरी यावे, पाहुणचार घ्यावा, अशी त्यांची फार इच्छा होती. वारंवार ते नारायणरावांना तसा आग्रह करीत. नाटकातून सिनेमात गेल्यावर (धर्मात्मा) त्यांना तसा थोडी अवधी होता, म्हणून लालाजींच्या इच्छेखातर कराचीला विश्रांतीसाठी जाण्याचे बालगंधर्वांनी ठरविलेही होते; पण अखेरपर्यंत तो योग आला नाही !

लालाजींच्या मृत्यूसमयी (१९४०) त्यांच्या मुलांनी त्यांची अखेरची इच्छा विचारताच, त्यांनी सांगितले, 'नारायणराव बालगंधर्वांचे गाणे ऐकत ऐकत डोळे मिटावेत एवढीच माझी इच्छा आहे. त्यांना आणा!' पण ते घडले नाही. तेवढा अवधीच नव्हता. अखेर ध्वनिमुद्रिकांवरच भागविणे भाग पडले !

'देहावसानाच्या वेळी मुखी रामकृष्ण यावा' हे आपण समजू शकतो; पण कानी नाद 'नारायणा'चा यावा, हे 'मम मनी कृष्णसखा रमला' सारखेच नाही का ?

MANOOS WEEKLY ( Licensed to post without perpayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28


## पाच नवी प्रकाशने

### बलसागर
**श्री. ग. माजगावकर**

तीस रुपये

राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजांचा घेतलेला शोध.

### डॉ. आयडा स्कडर
**सौ. वीणा गवाणकर**

बावीस रुपये

ग्रामीण भागात डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडांनी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

–एक होता कार्व्हरच्या लेखिकेचे दुसरे पुस्तक.

### पूर्णिया
**अनिल अवचट**

बारा रुपये

अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

आवृत्ती तिसरी

### लेक वालेसा
**डॉ श्रीकांत मुंदरगी**

बावीस रुपये

यंदाचे नोबेल प्राईझ विजेता लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण–मराठीत प्रथमच.

### मला निसटलंच पाहिजे
**अनुवाद : श्रीकांत लागू**

वीस रुपय

दुसऱ्या महायुद्धातील एका चित्तथरारक पलायनाची कथा

### राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०